पुणे. वर्ष १७ वे. नोव्हेंबर २०२१. अंक अकरावा.
पृष्ठसंख्या : ३२. किंमत : रुपये ५०. वार्षिक वर्गणी : रुपये ५००

# जलसंवाद

पाणी प्रश्नावर मंथन घडवून आणण्यासाठी
व्यासपीठ उपलब्ध करुन देणारे मासिक
संपादक: डॉ. दत्ता देशकर, श्री.सतीश खाडे














## कव्हर स्टोरी:

**ढगाआडचा तळपणारा तारा**
**श्री. जयाजी पाईकराव, अध्यक्ष, उगम ग्राम विकास संस्था, उमरा**
**तालुका : कळमनुरी जिल्हा : हिंगोली.**

# श्री. जयाजी पाईकराव यांच्या कार्याशी निगडीत काही क्षणचित्रे



जल दिंडीत सुशांत पाईकराव गावकऱ्याना मार्गदर्शन करताना




जल साक्षरता यात्रा हिंगोली येथे



जलदिंडीची रेली



जलदूत ००१



शिवारात पडलेला पाऊस मोजताना गावकरी व विद्यार्थी



जोंधळी गवत व शेतकरी व कार्यकर्ते



पानी फौंडेशन टीमला कयाधूनदीचा पाणलोट क्षेत्र
दाखविताना जयाजी पाईकराव



जेष्ट समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांच्या हस्ते
शिक्षणरत्न पुरस्कार स्वीकारताना विकास कांबळे

# जलसंवाद


भारतीय जलसंस्कृती मंडळ, औरंगाबाद पुरस्कृत

■ नोव्हेंबर २०२१

■ संस्थापक संपादक
डॉ. दत्ता देशकर
कै. प्रदीप चिटगोपेकर

■ वर्तमान संपादक
डॉ. दत्ता देशकर – ०९३२५२०३१०९
श्री. सतीश खाडे – ०९८२३०३०२१८

■ मुखपृष्ठ व सजावट
अजय देशकर

■ अंतर्गत मांडणी व अक्षर जुळवणी
आरती कुलकर्णी

■ मुद्रण –
श्री. जे प्रिंटर्स प्रा. लि, दत्तकुटी १४१६, सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०

■ वार्षिक वर्गणी : ५०० /–
पंचवार्षिक वर्गणी : रू. २०००/–
दशवार्षिक वर्गणी : रू. ३५००
(या मासिकाची वर्गणी www.payyoursubscription.com या वेबसाईटवरून ऑनलाईन भरू शकता)



■ जाहिरातींचे दर : मलपृष्ठ क्र. ४ रू. १५०००. वेष्टण पृष्ठ २ व ३ रू. १०,०००. आतील साधे पान रू. ५०००.
(वर्षाचे पॅनल बुक केले तर २० टक्के सूट मिळेल)



या अंकाचे मूल्य : रू. ५०/–


## अनुक्रमणिका


- **संपादकीय** / ४
- **पर्यावरण शिक्षणाचा वस्तुपाठ...'उगम' चा उपक्रम !!** श्री. सतीश खाडे / ५
- **गवत पुराण – कुरण संवर्धनातून जलसंवर्धन**
  श्री. सतीश खाडे / ९
- **लोकसहभागीय चळवळीतून कयाधू नदीचे पुनरुज्जीवन एक स्वप्न**
  श्री. प्रकाश इंगोले – श्री. विकास कांबळे / १३
- **जयाजी पाईकराव – ढगाआडचा तळपणारा तारा**
  श्री. सतीश खाडे / १९
- **पुस्तक परिचय – कयाधूचे जे पी**
  प्रोफेसर वंदना चक्रबर्ती / २३
- **व्यक्तीगत परिचय : श्री जयाजी पाईकराव**
  श्री. रमाकांत बापू कुलकर्णी / २४
- **कयाधूचे जे पी –** डॉ. दुर्गादास रोडे / २६
- **सामाजिक कार्यवृक्ष संभाराचे दर्शन : पाईकरावांची करामत !**
  श्रीमती मेधा पाटकर / २७
- **जयाजी पाईकराव : उपेक्षीतांचा वाटाड्या**
  श्री मारूती बनसोडे / २८
- **समाज सेवेतील भगीरथ : जयाजी पाईकराव**
  श्री. राम खंदारे / २८
- **मराठवाड्याचा विकास – वास्तव आणि भविष्य – ३**
  डॉ. दि. मा, मोरे /३०
- **२४ x ७ अखंड पाणी पुरवठा न होण्याची कारणे – २**
  डॉ. संजय दहासहस्त्र / ३३

## संपादकीय ...........

पगारदार माणूस सुखी का असतो हा प्रश्न स्वतःला विचारला तर त्याचे उत्तर आहे दर महिन्याच्या पहिल्या तारखेला पगार त्याच्या खिशात पडतो म्हणून. पागर मिळाल्याच्या पहिल्या आठवड्यात खिशात पैसे खुळखुळत असतात. हात जरा सैल असतो. पण उत्तरोत्तर जसजसा महिना पुढे सरकतो तसतसे खर्चावर बंधन येणे सुरु होते व महिना संपत असतांना खिसा पूर्णपणे रिकामा झालेला असतो. पण.. .. ..त्याला खात्री असते की पुढच्या महिन्याच्या पहिल्या तारखेला पुन्हा खिसा गरम होणारच होणार. वकीलाची स्थिती तशी नसते. पैसा खिशात कधी येईल याची हमी त्याला नसते. आणि त्याचा परिणाम त्याच्या खर्च करण्याच्या पद्धतीवर निश्चितच पडतो.

या पार्श्वभूमीवर आपण शेतकऱ्याकडे बघितल्यास त्याची परिस्थिती तर फारच बिकट असलेली दिसून येते. वर्षातून एकदा किंवा जास्तीतजास्त दोनदा खिशात पैसे य़ेण्याची शक्यता. आणि ते येतील याची हमी शून्य. मग दररोजचा रामरगाडा कसा चालवायचा हा प्रश्न त्याला सदैव भेडसावत राहतो. उत्पन्न नसले तरी खर्च मात्र चालूच राहतो. अशा परिस्थितीत नैराश्य येणे स्वाभाविक आहे. या नैराश्याची परिणती आत्महत्येमध्ये झाल्यास नवल वाटू नये. दिवसेंदिवस शेतीतील शाश्वतता कमी होत आहे. त्याचे साठी त्याने निवडलेली पीक पद्धती कारणीभूत आहे असे म्हंटल्यास चुकीचे ठरु नये. त्याने अशा प्रकारच्या पीक पद्धतीची निवड केली पाहिजे की जिचे पासून त्याला सतत उत्पन्न मिळत राहील. शेती चार प्रकारची असू शकते. ते चार प्रकार म्हणजे धान्य शेती, फळ शेती, वन शेती आणि प्रथिन शेती. याही पेक्षा शेती अनेक प्रकारे कसली जावू शकते पण हे चार प्रकार शेतकऱ्याशी अति परिचित असे प्रकार आहेत.

वरील चारही प्रकार एकमेकाला पूरक आहेत. धान्य शेतीपासून धान्य तर मिळतेच पण जनावरांसाठी चाराही मिळत राहतो. शिवाय काही पिकांपासून जमिनीची प्रत सुधारण्यासही मदत होत असते. फळ शेतीपासून फळे मिळतात. शिवाय झाडे एकमेकापासून दूर असल्यामुळे मधल्या जागेर् चाऱ्यासारखे इतर पीकही घेतले जावू शकते. झाडांना पाणी ठिबकने दिल्यास अत्यंत कमी लागते. ते पाणी धान्य शेतीकडे वळविले जावू शकते. वन शेतीपासून लाकूड मिळते. शिवाय हिरडा ब्याहाडा, आवळे, बोरे, चिंच, कवठे यांचेपासूनही उत्पन्न मिळते. शिवाय जनावरांसाठी चाराही उपलब्ध होवू शकतो. काही चंदनाची वा सागवानाची झाडे लावली तर काही वर्षांनंतर चांगले पैसेही मिळू शकतात. प्रथिन शेती तर दररोज उत्पन्न मिळशवून देण्याचा एक राजमार्ग आहे. यात दूध आणि दूधजन्य पदार्थ, मांस, अंडी असे दररोज विकले जाणारे पदार्थ मिळतात. शिवाय जमिनीचे पोत टिकवून ठेवण्यासाठी खतही मिळते.

यात सर्वात महत्वाचा लाभ म्हणजे कोणत्या ना कोणत्या तरी हालचालीपासून सातत्याने उत्पन्नही मिळत राहते. वर्तमान काळ, नजिकचा भविष्यकाळ आणि दूरचा भविष्यकाळ यांची चिंताही ही पद्धती करते. ही पद्धती वर्षभर काम देणारी पद्धती असल्यामुळे शेतीशी संलग्नताही वाढते आणि दीर्घकाळाचे नियोजन करणे त्यामुळे शक्य होते. आज शेतकरी एक पीक पद्धतीकडे झुकायला लागला आहे. ते पीक हातचे गेले म्हणजे फाके पडण्याची पाळीच येते व रोजचे जीवन कठीण होवून बसते. इंग्रजी मध्ये सेकंड स्ट्रिंग टू द बो असा एक वाक्प्रचार आहे. जीवन हे एक युद्ध आहे. हे युद्ध खेळत असता आपल्या धनुष्याला दूसरी दोरी असणे गरजेचे आहे. ती नसेल तर युद्ध हारणे नशीबी येते.

शेतीचा विकास करतांना ती नफ्यात आणणे ही महत्वाची बाब आहे. या पद्धतीने शेती केल्यास दरवर्षी नफा मिळू शकतो. नफ्यातला काही भाग भविष्यातील विकासासाठी वापरला जावू शकतो. हीही एक जमेची बाजू दुर्लक्षून चालणार नाही. आपले शेत, मग त्याचा आकार काही का असेना, या चार प्रकारच्या शेतीत कसे वाटले जावे हेही ठरविणे गरजेचे आहे. आपली कुवत काय आहे, आपली काम करण्याची इच्छा किती आहे, आपल्या घरी या कामासाठी मदत करायला किती लोक आहेत याचा विचार करुन मगच या बाबत निर्णय घेणे आवश्यक राहील. शेती हे आपले उपजीविकेचे साधन आहे. हा आपला व्यवसाय आहे. हा आपल्याला जगवणार आहे. त्यामुळे याबाबत सारासार विचार करुन मगच पुढचे पाऊल उचलावे लागेल. ही चतुःसूत्री शेतकऱ्याला मार्गदर्शक ठरेल. स्वयंसेवी संस्थांनी याबाबत शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन केले तर शेतकऱ्याचे मनात शेती हा आतबट्ट्याचा व्यवहार आहे ही भावना असा नकारात्मक विचार निघून जाईल.

**डॉ दत्ता देशकर**
**संपादक**

# पर्यावरण शिक्षणाचा वस्तुपाठ...'उगम' चा उपक्रम !!

**श्री. सतीश खाडे**

**मो : ९८२३०३०२१८**



२००७ मध्ये जेष्ठ पर्यावरण तज्ञ आदरणीय माधवराव गाडगीळ यांनी भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील दुर्मिळ व दुर्लक्षित परीसंस्थांच्या (Ecosystem) पुनरुज्जीवनासाठी काम सुरू केले. त्यासाठी त्यांनी भरपूर भ्रमंती केली. खूप लोकांना व संस्थांना ते भेटले. त्यांनी पर्यावरण संरक्षण म्हणजे सात प्रमुख घटकांचे संरक्षण व संवर्धन असे सांगितले १. पिकांमधील वाणांची विविधता २. गवताळ भाग ३. गोड्या पाण्यातील जैवविविधता ४. समुद्री स्पंज ५. सह्याद्रीतील दुर्मिळ वनस्पती ६. जंगल परिसर पुनर्निर्माण आणि जैवविविधता ७. पशू विविधता.

गवतावर व कुरणांवर काम करण्यासाठी गाडगीळसर वाशिम व हिंगोली जिल्ह्यात संस्था आणि व्यक्तींच्या शोधात होते त्यावेळी जयाजीराव पाईकराव व त्यांची 'उगम' संस्था याबद्दल माहिती मिळाल्यावर खात्री करून घेऊन त्यांनी उगमवर गवताळ पट्ट्याच्या संवर्धनाचे काम सोपवले. अर्थात या सगळ्या ऐच्छिक गोष्टी असतात पण उगमने हे काम आव्हान म्हणून स्वीकारले. कुरणे ही पीक लागवडीखाली आल्याने गवत कमी झाले. त्यामुळे जैवविविधता कमी होत आहे. परंतु हा प्रश्न केवळ जैवविविधतेच्या ऱ्हासाचा नाही तर शेतीवर ही दीर्घकालीन दुष्परिणाम करणारा आहे. या कुरण पट्ट्यातील गवत जैवविविधता राखूनही शेतकऱ्यांना आपत्कालीन आणि दीर्घकालीन फायदा मिळू शकेल का? याचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि इतर संस्थांच्या विद्यमाने महाराष्ट्र जनुक कोश कार्यक्रमाअंतर्गत हा उपक्रम घेण्यात आला.

पर्यावरण शिक्षण, कार्यानुभव, मूल्य शिक्षण, रचनावादी शिक्षण, गुणांची श्रेणी पद्धत असे एक ना अनेक उत्तमोत्तम धोरणे आपल्या शिक्षणात आणण्याचा प्रयत्न वरिष्ठ पातळीवर होत असतो. पण परीक्षेत कॉपी करणे हे जितके सामान्य झाले आहे तितके सामान्य किंवा ध्येय धोरणाला तिलांजली देणारे वर्तन बहुतांशी शाळा व शिक्षक यांचे असते. शाळेतील मुलांनी त्यांच्या इयत्तेला साजेसे काही ना काही प्रकल्प स्वतः करणे हे शैक्षणिक धोरणाप्रमाणे आवश्यक असते. शहरी व निमशहरी भागात तर शिक्षित पालकच सर्व प्रकल्प पूर्ण करून देतात. (इतकंच काय निबंध ही पालकच लिहितात, घरून चित्र काढून आणायला सांगितले असेल तर पालकच काढतात). मुलांची कल्पनाशक्ती, विचार व चिंतन शक्ती विकसित व्हावी ह्या मूळ उद्देशाला हरताळ फासला जातो, पण पालकांना या ऐवजी मुलांचे मार्क जास्त महत्त्वाचे वाटतात हे दुर्दैव! ग्रामीण भागात मात्र पुस्तकांच्या दुकानात रेडीमेड प्रोजेक्ट विकत मिळतात. मग शाळेचे व त्यांचे साटेलोटे असते. हेच रेडिमेड प्रोजेक्ट शाळेत आणायचे. शिक्षकही त्याला भरघोस मार्क देणार, शिक्षणाधिकाऱ्यांचा ही टक्का सांभाळला की रचनावादी शिक्षण जिंदाबाद!!



पण इथे कळमनुरीमध्ये मात्र सगळे याच्या उलट घडले. यातून मुलांच्या सर्व शक्तींचा छान वापर झाला व त्यातून त्यांचा विकास झाला. या सर्व उपक्रमांचे दोन प्रमुख उद्देश होते, मुलांमध्ये पर्यावरण सजगता व संवर्धन दृष्टी वाढवणे व त्याद्वारेच कुरण संवर्धन व जैवविविधता संवर्धन दीर्घकाळ व शाश्वत व्हावे.

'उगम' संस्थेने यासाठी खूप मेहनत घेतली. विशेषतः विकास कांबळे व धनंजय पडघन या उच्चशिक्षित समर्पित कार्यकर्त्यांनी. त्यांनी पर्यावरण शिक्षण केंद्र, पुणे यांच्याकडून प्रशिक्षण घेतले. त्यांनी प्रौढ व विद्यार्थी हे दोन घटक डोळ्यासमोर ठेवून कामाची आखणी केली. कारण एक कच्च्या मडक्यावर व दुसरे पक्क्या मडक्यावर त्यांना काम करायचे होते. कच्च्या मडक्याला म्हणजे हवे तसे वळवू शकणाऱ्या मनावर म्हणजेच विद्यार्थ्यांबरोबर. त्यांनी शालेय विद्यार्थ्यांकडून करवून घेतलेले पर्यावरणासंबंधित काम खूपच रंजक आणि प्रभाव पाडणारे ठरते. त्यांनी सुरुवातीलाच लक्ष केंद्रित केले अगदी प्राथमिक शाळेतील मुलामुलींवर. सात-आठ पण खूप शिकवण व पर्यावरणीय संस्कार करणारे उपक्रम आखले होते व ते प्रभावीपणे प्रत्यक्षात घडवून आणले. आता पहिली ते सातवीची मुलं ते काय प्रकल्प करणार? अरे पण जे जे त्यांनी केलं व घडलं ते थक्क करणारे आहे. राबवलेले उपक्रम असे होते. १. आपल्या शिवारातील बिया गोळा करणे, २. माझ्या ताटात काय काय आहे? ३. एका एकर मध्ये किती किलो गवत? ४. बीज उगवण क्षमता तपासणे ५. जैवविविधता नकाशा तयार करणे ६. माझ्या गावात पडणारा पाऊस ७. पाटा पद्धती

**प्रकल्प एक: आपल्या शिवारातील बिया गोळा करणे :**

धान्यापासून ते आंब्याच्या कोयीपर्यंत आणि निंबोळीपासून ते सागरगोट्यापर्यंत सर्व प्रकारच्या बिया शाळेत मुलांना आणायला सांगितल्या. मुलांनी यात खूपच छान भाग घेतला. यात मुलांची बिया गोळा करण्यात व शाळेत आणण्यात चुरस लागली. यातून अनेक प्रकारच्या बिया गोळा झाल्या. या प्रकल्पातून असे शिक्षण निर्माण झाले की, जेव्हा मुले बीज शोधायला गेली तेव्हा त्यांचे शारीरिक शिक्षण झाले. जेव्हा मोजायला लागली तेव्हा त्यातून मुलं गणित शिकली. त्यांच्या आकाराबद्दल लिहा, यातून भूमिती शिकले. या बीया कुठे कुठे मिळाल्या, त्या टापूचे नाव भूगोल समजायला लागला. या बीया कधी मिळतात याचे उत्तर शोधताना ऋतू बरोबरच विद्यार्थी वर्गीकरण शिकले. बियांची माहिती घरातून, कुटुंबातून मिळाली यामुळे वनस्पती समजल्या. एकाच बी ला वेगळी नावे असल्याचे समजले, यातून काहीसा भाषेचाही अभ्यास झाला. यातून मुलांचा शिक्षणातला रस खूप वाढला. बीज संकलन करणे विद्यार्थ्यांचा छंद झाला होता. उन्हाळ्यामध्ये विद्यार्थी बिया जमा करीत आणि संकलित केलेल्या बिया पावसाळ्यात शाळेच्या परसबागेत लावत. या प्रकल्पामुळे शाळेत मागे बसणाऱ्या विद्यार्थ्यांचा पुढाकार कमालीचा खुश करणारा होता.

**उपक्रम दोन: माझ्या ताटात काय काय आहे ?**

हा उपक्रम मुलांनी आजी-आजोबा, आई-वडील यांच्याशी चर्चा करून करायचा होता. आजोबा-आजी जेव्हा १५ वर्षाचे होते तेव्हा ते काय खात होते याच्या नोंदी घेतल्या. त्यामध्ये असे लक्षात आले की आजी-आजोबा मऊ ज्वारी, गोल्या ज्वारी, कडू (पिवळी) ज्वारी, कारले, जवस, हडसन, कर्टूले, तरोटा, तांदूळकुंदरा यासारख्या रानभाज्या ते खात होते. आता मुलांचे खाणे काय काय होते ? चॉकलेट, चिप्स, कुरकुरे, मुरमुरे, चटपटी मसालेदार पॅक केलेले, साठवलेले अन्न इ.

जेव्हा विद्यार्थी आणि आजी-आजोबा यांच्या सोबत बसून अन्नातील विविधता यावर विश्लेषणात्मक चर्चा केली तर असे समजले की, आजी-आजोबा रानवनातील खात होते तरी ते १०० वर्षे जगत होते. १०० किलोचे ओझे शेतातून डोक्यावर घरी आणत. हात मोडला तरी फक्त हडसन भाजी करून नीट करीत. जवस चटणी खात होते म्हणून त्यांना सांधेदुखी होत नव्हती, हृदयरोग किंवा रक्तदाब होत नव्हता तसेच पिवळा ज्वारी कडसर असल्याने मधुमेह होत नव्हता तसेच त्यावेळी उपलब्ध असणारे कारले सध्याच्या तुलनेत अनेक पटीने कडू होती. त्यामुळे मधुमेह ऐकायला सुद्धा मिळत नव्हता. याउलट मुले हे दुकानातील जास्त पदार्थ खातात त्यामुळे अन्न खरेदी करून खातात आणि आजोबाच्या तुलनेत मुले जास्त आजारी पडतात यामुळे काही पैसा आजारवर खर्च होतो. आणि मुले हे निवडक पदार्थ खातात त्यामुळे शरीराला आवश्यक असणारे पूर्ण घटक त्यांना मिळत नाहीत. तसेच आरोग्य, वयोमान, शक्ति यावर आहाराने परिणाम केला असल्याचा निष्कर्ष या प्रकल्पातून आला. विद्यार्थ्यांनी आजोबाच्या थाळीतील काही पदार्थ घेणे गरजेचे आहे. अश्या उपक्रमाबाबतची भूक वाढू लागली, शाळा व अभ्यासापासून दूर असलेल्या अनेक मुलं हिरिरीने भाग घेतल्याचे जाणवत होते.

**उपक्रम तीन: एका एकर मध्ये किती किलो गवत ? :**

पुढचा उपक्रम हळूच गवताकडे वळवला. आपल्या शेतातील गवत नाहीसे करण्याच्या मागे आपण लागलो आहोत. पण ते पर्यावरण व अर्थकारण दोन्ही दृष्टीने हानीकारक आहेत हे लोकांना पटत नव्हते, मान्य नव्हते. त्यांना उगमने खूप छान उत्तर शोधले. उगम ने प्राथमिक व माध्यमिक शाळेतील मुलांना घेऊन उपक्रम केला. गवताचे पैशाचे गणित, गवताचे अर्थशास्त्र! यासाठी मुलांना कृती समजून सांगितली व शिक्षकांनी त्याकडे फक्त निरीक्षक म्हणून बघायचे. तीन चार मुलांच्या गटाला गवत असलेल्या शेतातला एक चौरस मीटरचे भाग निवडायला सांगितले. त्यात दाट, मध्यम व विरळ गवत अशा प्रकारचे भाग निवडले. आता निवडलेल्या चौरस मीटर मधील गवताचे वजन करण्यास सांगितले. ते सरासरी ६५० ग्रॅम पर्यंत भरले. एका पेंढीचे सरासरी वजन काढले ते ८००-९०० ग्राम असते. एका एकर मध्ये ४०९६ चौरस होतात त्यामध्ये साडे तीन हजार ते चार हजार होतात. पुढचे काम त्याची बाजारभावाप्रमाणे किंमत काढणे. गवताचा भाव नोव्हेंबरमध्ये आठ रुपये पेंढी त्याप्रमाणे एकरी २८,००० मिळाले, (एका सीजन चे चार महिन्यात) मार्च-एप्रिलमध्ये पेंढीचा भाव १० ते १२ रुपये असतो, त्या वेळी एकरात ३५ ते ४५ हजार रुपये मिळतात. तर जुलै महिन्यात १५ ते १७ रुपये भाव मिळतो तर त्यातून ५२ ते ६० हजार रुपये मिळू शकतात. हे सर्व गणित मुलांनी स्वतः केले. मग त्यांचे पालक व गावातील शेतकरी महिला यांना समोरासमोर बसून चर्चा घडवून आणली. ही माहिती शिक्षकांनी किंवा उगमच्या कार्यकर्त्याऐवजी त्यांच्या मुलांनी स्वयं अध्यायातून मिळाली असल्याने शेतकऱ्यांना त्याची सत्यता पटली. यातून त्यांना पटले की गवतातून इतर पिकांपेक्षा अधिक उत्पन्न मिळते आणि दुष्काळ व अवकाळी पाऊस यातही नुकसान न होता काही ना काही उत्पन्न मिळते. अती पावसाळ्यातले नुकसान, कीड-रोगराई असे काही प्रकार गवता बाबत घडत नाहीत हेही उमगले. यातून बहरू लागली गवताची शेती. यातून विस्तारली कुरणे आणि त्यातून आले पशुधन, दुधदुभते..डेअरी...पोटभर अन्न.. पोटभर अन्न आणि खिशात खुळखुळणारे पैसे!!



**उपक्रम चार: बीज उगवण क्षमता तपासणे :**

सोपा पण खूप महत्वाचा उपक्रम होता. शेतात बियाणे पेरले की पंधरा–वीस दिवसांनी पूर्णपणे समजते की बियाणे दर्जेदार आहे की कमकुवत. चांगली उगवण झाली तर ठीक अन्यथा उगवले नाही तर शेतकऱ्यांचे पूर्ण हंगामाचे नुकसान होते. जिरायती शेतकरी असेल तर पूर्ण वर्ष वाया गेले. त्यासाठी बियाण्यांची उगवण क्षमता पेरण्यापूर्वी तपासले तर हे नुकसान टळू शकते. पण हल्लीच्या ९९ टक्के शेतकऱ्यांना हे माहीत नसते. मुलांना शिकवले व समजले तर ते शेतकऱ्यांपर्यंत जाईल या हेतूने हा उपक्रम राबवला गेला. तसेच विद्यार्थ्यांनी टक्केवारी शिकावी व पिकाची अवस्था समजून घ्यावी हा उद्देश होता. म्हणून मुलांना घरून सोयाबीन, मठ, मूग, गहू, या अशा कडधान्यांच्या बीया आणायला सांगितल्या, त्या शंभर मोजूनच आणायच्या, त्या जर्मिनेशन टेस्ट पेपर मध्ये गुंडाळल्या, चार–पाच दिवस ओलसर परिस्थिती ठेवल्या, तेच पेपर मध्ये चौथ्या दिवशी उघडून पाहून मोड आलेल्या बिया मोजल्या, शंभर पैकी साठ बियांना मोड आलेले असतील तर त्यावरून ६० टक्के उगवण क्षमता आहे आणि असे ७० ते ८० टक्के उगवण क्षमता आहे असे तपासले गेले, अभियानाबाबत व शेतीच्या विविध कृती पैकी महत्त्वाच्या कृती व कौशल्य बाबत मुलांना सजग व अवगत केले गेले, अर्थातच हे कुटुंबातील सर्वांत पर्यंत पोहोचले, त्यामुळे ज्या बियांची उगवण क्षमता चांगली अशीच बी पेरायचे हा संदेश व्यवस्थित रित्या कृतीने पोहोचला.



**उपक्रम पाच: जैवविविधता नकाशा तयार करणे :**

एक खूप महत्त्वाचा पथदर्शी ठरेल असा उपक्रम राबवला गेला तो म्हणजे गावचा जैवविविधता नकाशा तयार करणे. याविषयी शाळेत मुलांसमोर जैवविविधतेचा मुद्दा खूप रंजकतेने मांडण्यात आला. मुलांमध्ये बरीच उत्सुकता निर्माण केली. माझ्या शेताचा नकाशा, मातीचे प्रकार, पाणवठे, ओढे, नाले, पिके, रानमेवा झाडे, जंगलातील झाडे, प्राणी ,पक्षी, जे जे आठवेल सुचेल तसे सर्व नकाशात घेतले. गाव नकाशा वाचायला व त्यात माहिती भरायला मुलं शिकली. नकाशावरचे गाव हळूहळू मनात उतरले. दुसऱ्याच्या शेतात, गावच्या त्या टोकाच्या शेतात कोणते कोणते झाड आहे ते समजले. मग त्यातली काही झाडे आपल्याकडेही असायला हवी असे त्यांना वाटून त्या दृष्टीने त्यांनी ती लावण्यासाठी धडपड केली. रानमेवा कुठे कुठे आहे, काय काय आहे, आपल्यालाही आपल्या शेतात लावायला हवा असे अनेकांना वाटायला लागले. एकाने पाहिलेला पक्षी दुसऱ्यांना अद्याप माहीत नव्हता तर तो पाहण्यासाठी धडपड सुरू झाली. झुडपं, फुलपाखरे, कीटक, सापाचे प्रकार, या सगळ्या बरोबरच सर्वात महत्त्वाचे म्हणजे गवताचे प्रकार, त्यांच्या जागा त्याबद्दल आणखी सविस्तर माहिती .अशा खूप प्रकारे अभ्यास, अवलोकन व ज्ञानप्राप्ती झाली. इतर वेळी अभ्यासात मागे राहणारे शाळा बुडवणारे विद्यार्थी खूप पुढे आले त्यांनी त्यात भरभरून सहभागही दिला. या प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांची इतिहास, पर्यावरण, पक्षी व जैवविविधता मध्ये रुचि निर्माण होऊ लागली. हीच रुचि १० वी पास झाल्यावर कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा हे ठरविण्यासाठी मदतगार ठरू शकते.

**उपक्रम सहा :**

माझ्या गावात पडणारा पाऊस गावामध्ये किती मिलीमीटर पाऊस पडला हे रेनगेज वरुन कळते. मात्र किती लीटर पाऊस पडला हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्षिकासह शिकविण्यात आला. एक मिमी पाऊस एक हेक्टर क्षेत्रावर पडला तर त्यातून किती लिटर पाणी मिळते. गावात असणारा उतार यावरून किती लिटर पाणी वाहून जाते. २.५ मिमी पेक्षा कमी पाऊस पडला तर त्या दिवशी पाऊस पडला नाही असे गृहीत धरतात. ह्या बाबी विद्यार्थ्यांना सांगितल्या. यामुळे गुणाकार, भागाकर, बेरीज व वजाबाकी शिकत होते. तसेच किती दिवस पाऊस पडतो आणि किती दिवस त्याला वापरतो असे अनेक प्रश्न आणि उत्तरे मुले या कृतीतून शोधत होते.

**उपक्रम सात: पाटा पद्धती :**

प्रत्येक विद्यार्थ्याला एक मिश्र पाटा पॅकेट दिले जाते. यामध्ये २२ प्रकारचे खाद्य पदार्थ असतात. हा पाटा पालकाना शेतात लावण्यासाठी सांगतात. पाटा शेतात लावल्याने प्रत्येक महिन्याला खाण्यासाठी वेगवेगळा भाजीपाला मिळतो. आज काल सकाळी पोहे व रात्री तुरीची डाळ अशी दिनचर्या असल्याने रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी होत आहे. मात्र पाट्यातील वेगवेगळ्या भाजीपाल्याचे सेवन करीत असल्याने वाढत असल्याचे निर्दर्शनास आले आहे. तसेच शालेय मुले काकडी, चवळी, वाळूक, मूग, उडीद व कणीस खाण्यासाठी शेताकडे जातात. तिथे त्यांना मधमाश्या, फुलपाखरे, कीटक, पिके, वृक्ष, वेली व पक्षी याचा अभ्यास होवून शेती विषयक आवड निर्माण होते.

विकास कांबळे व धनंजय पडघन हे दोघेही उच्चशिक्षित व समर्पित कार्यकर्ते त्यांनी संकल्पना सुचवल्या, उपक्रमाची धुरा उचलली.. शाळा शिक्षक विद्यार्थी यांना अपेक्षित असणारे किंबहुना त्या पलिकडचे यश या उपक्रमाना मिळाले. विकास व धनंजय त्यांची कल्पकता, चिकाटी व विषयावरील अलोट प्रेम यामुळे हे उपक्रम होऊ शकले. अतिशय नम्र, खूप अभ्यासू व कष्टाळू हे दोन्ही कार्यकर्ते जनसंवर्धन, मनसंवर्धन, जल संवर्धन, तृण संवर्धन या उपक्रमाच्या यशस्वीतेचे मुख्य आधारस्तंभ आहेत, हे खुद्द जयाजीराव सांगतात. हे उपक्रम राबविण्यासाठी विकास कांबळे यांना सह्याद्री शिक्षणरत्न पुरस्कार जेष्ट समाजसेविका सिंधुताई सपकाळ यांच्या हस्ते देण्यात

आला.

कुरण संवर्धनाच्या प्रकल्पातून  निसर्ग संवर्धनासाठी निसर्ग पूरक जीवनपद्धती तसेच समृद्ध निसर्गातूनच  समाजाला शाश्वत समृध्दी मिळू शकेल ह्या विचाराचा वस्तुपाठ  'उगम' ने उभा  महाराष्ट्र व भारताला या निमित्ताने  दिला आहे. आदरणीय गाडगीळ सरांची निसर्गाचे प्रगाढ ज्ञान, वर्तमानातील तसेच भविष्यातील पर्यावरणीय समस्या व त्यावरचे उपाय त्यासाठी  ते सुचवत असलेले  उपक्रम, ते करून  घेण्यासाठीची त्यांची धडपड .....या सर्वांबद्दल गाडगीळ सरांना त्रिवार सलाम !!
त्यांची  कृतज्ञता  कोणत्या शब्दात मानावी बरं !

*****











# गवत पुराण - कुरण संवर्धनातून जलसंवर्धन

**श्री. सतीश खाडे**

**मो : ९८२३०३०२१८**



हे हे सर्व म्हणजे ऐकावे ते नवलच! प्रत्येक मुद्दा नवलाईने भरलेला ....जलसंधारणात धरणे, बंधारे, पाणलोट विकास, तळी, विहीर पुनर्भरण यांची प्रमुख भूमिका आजवर सर्वत्र ऐकलेली व अनुभवली. पण इथे गवताची जलसंधारणात प्रमुख भूमिका हे पहिले नवल!..... लोक त्यांच्या शेतात इतर कोणत्याही पिकाऐवजी गवत वाढू देतात हे दुसरे नवल ! ...गवतामुळे समृद्धी येते हे ही नवल!... याची प्रचिती आधी प्राथमिक शाळेतील मुले घेतात..... ते आपल्या आई-वडिलांना गवतांचे अर्थकारण समजून सांगतात ....इतकं व्यवस्थित सांगतात की पालक ते कृतीत आणतात आणि गवत हेच पीक म्हणून वाढवतात हे तर किती मोठे नवल!... पण हे नवल घडवले आहे जयाजीरावांनी व त्यांच्या उगम संस्थेने! कळमनुरी तालुका, जिल्हा हिंगोली येथे.



यांनी हे नवल सहजासहजी घडलेले नाही. त्यासाठी भरपुर अभ्यास, प्रशिक्षणे, कल्पकता व वेळेची आणि श्रमांची गुंतवणूक करावी लागली उगमच्या कार्यकर्त्यांना. २००८ च्या दरम्यान जगप्रसिद्ध पर्यावरण तज्ञ व पर्यावरणावर कळकळीने व्यापक काम करणारे आदरणीय माधवराव गाडगिळ महाराष्ट्रातील दुर्मिळ परिसंस्थांचे पुनर्जीवन व संवर्धन याविषयी काम करत होते. या उपक्रमात लोकसहभाग मिळवणे गरजेचे होते किंबहुना सगळ्याच परिसंस्था या लोकसहभागाशिवाय संवर्धित होणे केवळ अशक्य होते. त्यासाठी लोकांनी उस्फुर्ततेने भाग घेण्यासाठी त्यावर काम करणे आवश्यक असते. यासाठी लोकशिक्षण हा महत्त्वाचा टप्पा. आता गवताची व कुरणांची परिसंस्था जपली पाहिजे व अन्नसाखळी त्याचे महत्त्व पटविणे हे प्रमुख काम असले तरी ते लोकांची मन त्यासाठी वळवणं हे तितकसं सोपं काम नव्हतं. त्यासाठी त्यांना कुरण संवर्धनाचा व्यावहारीक व त्याही पेक्षा आर्थिक फायदा मनापासून पटणे आवश्यक होते. खरं तर तेच आव्हान होते. हे आव्हान हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी येथील जयाजींनी 'उगम' संस्थेच्या माध्यमातून स्वीकारले आणि त्यात यशस्वीता ही मिळवली.

यासाठी काही संस्थांमधून उगम च्या निवडक कार्यकर्त्यांना गवताच्या शास्त्रीय ज्ञानाबद्दल प्रशिक्षण देण्यात आले. तसेच लोकसहभाग या विषयी काही चर्चा तिथे झाल्या. त्यानंतर प्रत्यक्ष फिल्डवर फिरून माहिती घ्यायची, निरीक्षणे नोंदवायची, लोकांशी चर्चा करायच्या व त्यावर आधारित पुढील उपक्रमांची आखणी करायची. त्याप्रमाणे कार्यकर्त्यांनी जयाजीराव यांच्या मार्गदर्शनाखाली काम सुरू केले. फिल्डवर काम सुरू करताना यासाठी निवडला कळमनुरी तालुक्यातील म्हणजेच उगम च्या कार्यक्षेत्रातील कयाधू नदीकाठचा कुरण पट्टा. अर्थात तो अनेक युगे किनार पट्टा होता पण आता अलीकडे बऱ्याच प्रमाणात गवत नष्ट करून इतर पिकांची लागवड होऊ लागली होती. कयाधू ही पैनगंगेची उपनदी. उगमापासून संगमापर्यंत तिची लांबी ९९ किलोमीटर आहे. पैकी या बारा गावातून वाहणाऱ्या नदीचा १७ किलोमीटरचा भाग कुरण परिसंस्था संवर्धन व विकासासाठी उगमने निवडला. फील्डवर माहिती घेण्याचे काम सुरू करताच मिळालेली माहिती खूप मोलाची पण धक्कादायक होती. नदीकाठच्या बऱ्याच ठिकाणी कुरणांऐवजी शेती होती. गवत नाहीसे झाले होते. त्यामुळे नदीकाठची माती नदीला पूर आल्यावर नदीत ढासळत होती. शेतीत पुराचे पाणी गेल्यावर शेतच्या शेत नदीत वाहून जात होते अन् दर पावसाळ्यात नदीची रुंदी वाढत चालली होती. ढासळलेल्या मातीचा गाळ बंधाऱ्याच्या मागे अडवला जाऊन साठत होता. तिथे पात्र अधिक उथळ होत होते व पाणी साठवणक्षमता व पाणी मुरण्याची प्रक्रिया खूप मोठ्या प्रमाणात कमी झाली होती. बंधारे पाणी कमी व गाळाने अधिक भरू लागले होते. जमिनीची सुपीकता वेगाने संपत चालली म्हणजे आता परिसंस्था वाचवण्याचेच फक्त काम नव्हते तर हा प्रश्न माणसांसाठी ही खूपच महत्त्वाचा व गंभीर झाला होता. पंचवीस-तीस वर्षांपूर्वी पर्यंत नदीकाठी भरपूर गवत होते. कुरणेच्या कुरणे होती. हिंगोली जिल्हा म्हणजे पूर्वीच्या परभणी जिल्ह्याचा पूर्व भाग हा गवताचे आगर होता. १९७२ च्या दुष्काळात व नंतरही काही दुष्काळात पूर्ण मराठवाड्याला गवत हिंगोलीने पुरवले होते. याच मुळे पूर्वी हिंगोलीत पशुधन व दूध व्यवसाय बर्यापैकी होता. तसेच महाराष्ट्र सरकारचे वळू पैदास केंद्र ही हिंगोली जिल्ह्यात आहे.



**जलसंधारणातील गवताची भूमिका :**
**आधी गवताबद्दल महत्त्वाची माहिती पाहू...**

जगातील संपूर्ण भूभाग यापैकी २५ टक्के भागावर गवतांचे राज्य आहे. फक्त मानवाच्याच नव्हे तर सर्व प्राणिमात्रांच्या उत्क्रांतीमध्ये आणि विकासामध्ये गवताचा अनमोल वाटा आहे. गवत माणसाच्या पृथ्वीतलावरील वास्तव्याच्या साडेसात कोटी वर्षे आधीपासून अस्तित्वात आहे. भारतात बाराशे पेक्षा अधिक गवताच्या प्रजाती आहेत, तर महाराष्ट्रात गवताच्या ८१५ प्रजाती आत्तापर्यंत नमूद केल्या गेल्या आहेत. त्यात शंभराहून अधिक पौष्टिक चारा देणारे गवत आहे. काही मोजक्या प्रजाती औषधी म्हणूनही वापरल्या जातात. सिंह ,हत्ती पासून ते उंदरा पर्यंत, तसेच सरपटणारे प्राणी या सर्व प्राण्यांचे भविष्य गवतांनी ठरवले व घडवले. पक्षांचे गवताळ प्रदेशाची तर्कनिष्ठ नाते आहे .अनेक पक्ष्यांचे आश्रयस्थान, अन्न स्रोत व प्रजनन यासाठी गवत व गवताळ प्रदेश यांचा सर्वात मोठा हात आहे. हे कीटक आणि सूक्ष्मजीवांच्या बाबतीतही ते खरे आहे. माणसाच्या ८०% टक्के गरजा गवतच भागवते. आपण खात असलेले सर्व प्रकारची धान्य हे गवतच आहे. बांबू व ऊसही गवताचेच प्रकार आहेत. अगणित सूक्ष्मजीव गवतांच्या मुळांबरोबर वाढतात आणि त्यांच्यामुळे इतर वनस्पती वाढण्यास मदत होते.

अनेक गवत जमिनीवरील माती धरून ठेवण्यासाठी मदत करते तर काही गवत हवेमुळे होणारे जमिनीची धूप थांबवतात. गवत जमिनीची धूप तर थांबवतात. जर गवत नसते तर जमीन आणि मातीचा अमूल्य असा थर पावसाच्या पाण्याबरोबर वाहून गेला असता. त्यामुळे याबाबतीतही पर्यावरण रक्षणाच्या जबाबदारी गवत मोलाची भूमिका बजावते. गवत मुळांपासून फोफावते. ते पूर, धुके व आगीपासून स्वतःचे रक्षण करू शकते. गवत पुरात टिकाव धरते किंबहुना पूर शोषून घेण्यास गवत खूप मोठी मदत करते.

गवत मातीत जमिनीवर पसरते व उंचीलाही वाढते. येथील सर्व प्रकारच्या गवताच्या मुळांची जमिनीची खोली चार पाच इंचापेक्षा जास्त नसली तरी जाळी मात्र भक्कम व घनदाट असते. काही गवताची पूर्ण वाढ झाल्यावरची उंची सात फुटांपर्यंत असते. पाऊस पडताना पाणी गवतावर पडते, जमिनीवर जाताना पाण्याचा वेग खूप कमी होतो, ते पाणी जमिनीत प्रवेश करुन गवताच्या जाळीत जाते व पुढे हळूहळू जमिनीत झिरपते आणि जिरते. पाऊस कितीही तीव्रतेचा वा वेगाचा येवो गवतावर पडणारे पाणी जास्तीत जास्त जिरतेच. पाणी जिरण्याबरोबरच गवतामुळे माती ही घट्ट धरून ठेवलेली असते. त्यामुळे मातीचे ही रक्षण होते. मृदा व जलसंधारण दोन्ही यामुळे साधले जाते. तसेच नदीच्या काठावर व काठावरील शेतजमिनीवर पुराचे पाणी पसरले तरी वरील प्रमाणेच प्रक्रिया घडते, पाणी मुरते ही आणि मातीही वाहून जात नाही. जिरलेल्या पाण्यामुळे भूजलात वाढ होते हे वेगळे सांगायला नकोच. या बरोबरच जमिनीलगतच्या व खालच्या ही पाण्याचा बाष्पीभवनाचा वेग गवतामुळे खूप मंद होतो .त्यामुळे ही पाणी बाष्पीभवना पूर्वीच जमिनीत मुरते.

पण इथे कयाधूच्या काठी काय घडत होते तर कुरणे गवत असलेली जमीन कमी होत होती. त्याची कारणे एकच नाही तर अनेक होती. पहिलं कारण म्हणजे शेतीचे पडत असलेल्या तुकडे व त्यामुळे प्रत्येकाच्या वाट्याला येणारी अल्प शेती. त्यामुळे जी गवताची शेती इतके दिवस पडीक व दुर्लक्षित होती ती करण्याकडे लोक वळले. गवताचा पशुखाद्य म्हणून विचार न करता इतर पिके घेण्यासाठी गवत काढून टाकण्याची प्रत्येक शेतात स्पर्धाच सुरू झाली. इतर पिकात मुख्यत्वे सोयाबीन, कपाशी व मुगाचा समावेश होता. सोयाबीन व कपाशीसाठी रासायनिक खते, कीटकनाशके याबरोबरच मोठ्या प्रमाणात तणनाशकांचा वापर सुरू झाला. यात कुरणे संपू लागली. नांगरणीसाठी ट्रॅक्टरचा वापर सुरू झाला .ते ही गवत संपण्यात कारणीभूत ठरले. यातून हळूहळू पशुधन संपत गेले. पशुधन नाही म्हणून गवताची गरज नाही आणि उलट ही.. गवत नाही तर पशुधन कसे सांभाळायचे? त्यातही ज्या भागात व शेतात गवताचे रान शिल्लक तिथे पावसाळ्यात जेव्हा गवताची वाढ होत असते तेव्हाच गुरे चारण्यासाठी सोडून द्यायची, यातून गवताचे खूप नुकसान व्हायचे. या सगळ्या पार्श्वभूमीवर लोकांना गवताच्या लागवडीकडे वळवणे हे खरंच दिव्य होते. पण उगम च्या कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास व चिकाटी कायम होती. लोकांकडून प्राथमिक माहिती घेणे हा उपक्रमातील कार्यकर्त्यांच्या ट्रेनिंग नंतरचा दुसरा टप्पा होता. पवना, मारवेल, जोंधळी गवता विषयी सखोल माहिती घ्यायची व द्यायची होती. लोकांच्या भेटी वाढू लागल्या तसतशा गवताच्या नवनवीन जाती माहिती पडू लागल्या. थोड्याच अवधीत अशा ३५ नव्या जाती समजल्या. आणखी माहिती घेतल्यावर समजले की मारवेल काळ्या जमिनीत फोफावते. मारवेल इतर कोणत्याही झाडाला व गवताला उगवू देत नाही (डॉमिनंट स्पेसिज) पण मारवेल गवत थोडे जरी खाल्ले तरी जनावरांची भूक भागते. तसेच दूध व दुधाची स्निग्धता ही वाढते. जोंधळी गवत जनावरांना खायला खूप आवडते .सुकलेले जोंधळी गवत सुद्धा जनावरांना स्वादिष्ट वाटते. पवना गवत हलक्या जमिनीत खूप वाढते. पवना गवत खाणाऱ्या गाई-म्हशींचे दूध वैशिष्ट्यपूर्ण असते व त्यात स्निग्धता ही भरपूर. येथे शरीराच्या कमाईसाठी पैलवान पवना दूध व तुपास प्रथम पसंती देतात. 'पवन्याचा पैलवान' असा शब्द प्रयोगही येथे प्रचलित आहे, या वरूनच!! ही व अशी नकळत जैवविविधतेची ही माहिती मिळविण्यात आली.

आता पुढचा टप्पा होता लोकांना गवत संवर्धनात उस्फूर्तपणे खेचण्याचा! या निमित्ताने लोकांशी बोलायला सुरुवात केली तर लोक हसायला लागले, 'गवत काय राखायचे राव?' काहींना गवत राखा असं

का म्हणतात म्हणून संशयही वाटू लागला. नदीकाठी गेले की लोक एक तर अप्रत्यक्ष हाकलून देण्याचा प्रयत्न करायचे किंवा तिथून तेच निघून जायचे. अजिबात सहकार्य करत नव्हते. बारा गावांच्या नदी काठावरून पायपीट करून संवाद करण्याचा प्रयत्न केला तरीही थोडेही यश मिळत नव्हते. मग त्यावर उपाय म्हणून जीपीएस व इतर सॅटॅलाइट इमेजेसने नदी व कुरण पट्ट्यांची मोजमापे व लोकेशन्स मिळून पहिला रिपोर्ट तयार करण्यात आला.

गवता बद्दल विविध प्रकारे सांगूनही लोक किमान ऐकायलाही तयार नव्हते. पण आता उगम ने नवीन उपाय हाताळायचा ठरवला. शाळेतील मुलांमध्ये जाणीव–जागृती उत्सुकता निर्माण करायची. त्यांच्या मनात गवत संवर्धनाचा विषय रुजवायचा. मग यासाठी विविध उपक्रम राबवले गेले. पर्यावरण शिक्षणा अंतर्गत उपक्रम गटागटाने केले गेले. ते उपक्रम आणि त्यांचे यश हा स्वतंत्र लेखाचा विषय आहे. (याच अंकात मुलांच्या उपक्रमांविषयी सविस्तर लेख आहे.) पण वयाला साजेसे विषय व प्रकल्प देऊन मुलांच्या मनात पर्यावरणाची रंजकता व आवश्यकता, निसर्गाला आपला प्रतिसाद हे शिकवले. आपले निसर्गाचे ज्ञान व त्याला प्रतिसाद जीवन व पर्यावरण दोन्हींना समृद्धी देतो, हे चांगलेच रुजले. मग याच विषयांवर मुलांनी पालकांशी गट चर्चेद्वारे भाग घेत संवाद केला. यातून लोकांना गवत व कुरणे यांचे पर्यावरणीय व व्यावहारिक महत्त्व पटले. व्यावसायिक महत्त्व जास्तच पटले. त्यातून लोकांच्या प्रतिसादाला सुरुवात झाली. यात सर्वात महत्त्वाचा उपक्रम ठरला गवतातून मिळणारा नफा व सोयाबीन, कापूस व मठातून मिळणारा नफा यांची तुलना ही मुलांनी केल्यामुळे लोकांना ते जास्त पटले. मुलांबरौबर चर्चा होताना सोयाबीनच्या उत्पन्नाचा हिशोब मांडला. त्यासाठी नांगरणी व इतर मशागत, बियाणे, खते, कीटकनाशके, औषधे, तनाची खुरपणी, कापणी, मळणी यंत्र, शहरापर्यंत नेण्याचा खर्च, हमाली ,दलाली हा सर्व खर्च शेतकऱ्यांकडूनच वदवून घेतला. आता गवतासाठीचा खर्च मांडला. खिसाई (काटेरी झुडपं, झाड झाडोरा काढून टाकणे.) जैविक किंवा काटेरी कुंपणाची मजुरी, गवताची कापणी इतक्याच गोष्टींचा खर्च होता. जेव्हा तुलनात्मक अभ्यास पूर्ण केला तर विश्लेषण असे समोर आले की, सोयाबीन पिकासाठी खूप खर्च येतो आणि ते उत्पादनातून खर्च केला तर एक एकर शेतीतून १५ हजार ते २०००० हजार रुपये मिळतात. यामध्ये शेतकरी खर्च नाही. आणि गवतातून विना खर्च करता व १५००० पर्यन्त निव्वळ उत्पन्न मिळते. शिवाय दुष्काळ, रोगराई, अतिपाऊस यात सोयाबीन व इतर पिके तोट्यात जातात पण गवताला मात्र यापैकी कशाचाही परिणाम होत नाही. हे जेव्हा शेतकऱ्यांना समजून सांगितले तेव्हा सकारात्मक विचाराचे चक्र सुरू झाले.

त्यानंतर उगम कार्यकर्त्यांनी पुन्हा १२ गावांमध्ये पदयात्रा सुरु केली. त्यात आर्थिक व व्यवहारीक स्पष्टीकरण व मांडणीला चांगला प्रतिसाद मिळू लागला. लोकच आता पुढे येऊ लागले .यातून या उपक्रमात ५६५ शेतकरी जोडले गेले. नदीकाठावर शेती असलेले तर जवळ जवळ सर्वच जोडले गेले. आता गवत संपत्ती वाढू लागली. आपल्या शेतात गवत वाढवायचे खरे पण इतरांच्या शेतातल्या गवताची चोरीच्या तक्रारी यायला सुरुवात झाली. मग यावर उपाय म्हणून व काम संघटितपणे करून व्याप्ती व गुणवत्ता वाढविण्यासाठी या शेतकऱ्यांचे महिला पुरुष या सर्वांचा समावेश करून गट बनवले, त्याला नाव दिले 'पार्टीसिपेटरी गॅरंटी ग्रुप' असे ११२ ग्रुप बनवले. या गटाला अध्यक्ष, उपाध्यक्ष वगैरे पारंपारिक अहंकार व गैरसमज निर्माण करणारी पदाधिकारी पद्धत न वापरता 'गवत संवर्धक' व 'सहसंवर्धक' अशी पदे निर्माण केली. 'एकमेकांचे हित संवर्धन' हा मूळ गाभा होता या गटांचा. म्हणजे ही गवताची गट शेती! महाराष्ट्रालाच काय पण भारतातला किंबहुना जगातला ही असा हा पहिलाच प्रयोग!

पर्यावरणाचे आर्थिक मूल्यमापन (इकॉनोमिकल इव्होल्युशन ऑफ एनवोर्मेन्ट) हा जगातील अर्थशास्त्र व पर्यावरण दोन्ही क्षेत्रातील पंडितांचा चिंतन व चर्चेचा प्राथमिकता असलेला मुद्दा आहे. लोकांना समृद्ध पर्यावरणातूनच आर्थिक समृद्धी साधता येते ,याची नवनवीन उदाहरणे तयार करणे, असलेली उदाहरणे लोकांसमोर आणणे हाच पर्यावरण वाचवण्याचा प्रशस्त राजमार्ग आहे. केवळ अशा प्रयत्नांनी थोडेफार पर्यावरणाचे व परिसंस्थांचे रक्षण करता आले तर येईल असे वाटते.

आता या गवताच्या गटशेतीच्या पुढचा टप्पा उगम ने केला. 'ग्रास प्रोटेक्शन कमिटी' व 'जैवविविधता कमिटी' गावागावात स्थापन केल्या. यात त्यांनी शेतकऱ्यांबरोबरच गुराख्यांना स्थान दिले, कारण ते रानोमाळ भटकताना बऱ्याच गोष्टींची त्यांना माहिती असते. औषधी वनस्पतींनी रुग्णांवर उपचार करणाऱ्या वैदूंनाही त्यात स्थान दिले. जाणकार, वयोवृद्ध अशा समजूतदार लोकांची मिळवून ही कमिटी प्रत्येक गावची आहे. आता वर्षाच्या तीनही हंगामात गवताचे पीक घेणे सुरू झाले आहे . गवताचे बी–बियाणे व त्यांचा व्यापार सुरू आहे. इतकच काय स्प्रिंकलर लागलेत बर्याच शेतात! गवताच्या शेतात! शेतात पाणी वाचवून वाचवून गवताचे उत्पन्न घेतले जाते. गायी, म्हशी, बैल यांची संख्या वेगाने वाढते आहे. दूध संकलनासाठी नव्याने केंद्र आता गावोगावी सुरु होत आहेत. बारा गावात उगमचे हे काम सुरू असले तरी आजुबाजूच्या इतर गावातले शेतकरी गवताकडे व पशुपालनाकडे वळले आहेत. समृद्धीने शेतकर्यांच्या घरात पाणी भरण्यास सुरुवात केली आहे. आता



ओढ्यातून व नदीतून पाणी अडवणे ही सुरू झाले आहे. वनराई बंधारे बांधून पाणी अडवणे सुरू आहे. त्यामुळे गवताचा व इतर पिकांसाठी रब्बीत पाणी उपलब्ध होऊ लागले आहे. सुरुवातीला वाळू माफियां थोपलेल्या पाण्यामुळे वाळू काढू शकत नसल्याने ते बंधारे फोडून टाकत असत. त्यामुळे साठवलेले सर्व पाणी वाहून जात असे. मात्र हे लक्षात आल्यानंतर गावकऱ्यांनी बंधाऱ्यावर गस्त घालणेही सुरू केले आहे. त्यामुळे आता बंधारे फुटणे थांबले आहे. तसेच वाळूचोरी ही थांबली आहे. लोकांमध्ये पाण्याविषयी इतकी सजगता आलेली आहे. तिकडे जैवविविधतेत हळू भर पडते आहे. गवताच्या परिसंस्थेत कीटक , सरपटणारे प्राणी विशेषतः जास्त असतात. कीटकांमुळे सरडे, पक्षी आणि बेडूक येतात. त्यामुळे साप येतात. सापामुळे मोर येतात. गवतामुळे ससे, बकऱ्या, हरणं त्यांना खाण्यासाठी कोल्हे, लांडगे येतात. मधमाशा, फुलपाखरे ही दखल घेण्याइतकी वाढत आहेत. आशा नव्हे तर खात्री आहे की लवकरच ही जैवविविधता अधिकाधिक समृद्धतेकडे जात राहील.

**आता जलसंवर्धनाचे काय ?**

७००ते ९०० मिलिमीटर सरासरी पाऊस असताना ही हिंगोलीतील शेतकरी व सामान्य माणूस दारिद्र्यात होती. नदीला पूर येऊन सर्व पाणी वाहून जायचे, ती काठावरच्या शेतातली माती मोठ्या प्रमाणात घेऊन जायची. भूजलाची पातळी ४०० ते ६०० फुटापर्यंत खोल गेली आहे. मानवी विकास निर्देशांकात हिंगोलीचा नंबर महाराष्ट्रात खालून चौथा, पण आता गवतामुळे नदीचे काठ वाचले आहेत. शेती वाचली आहे. पडणारा पाऊस गवतावर पसरतो, जास्तीत जास्त मुरतो आणि कमीत कमी वाहतो. भूजल त्यामुळे हळूहळू वाढते आहे. विहिरींच्या पाणीपातळीच त्याचे द्योतक आहे. ओढ्यांचे व नदीचे अनेक झरे जिवंत होऊ लागलेत. ओढ्यात व नदीत जमिनीतून पाणी पाझरते आहे. गेल्या तीन वर्षात नदी वाहत राहण्याचा कालावधी एक दीड महिन्याने वाढला आहे. हळूहळू वाढत जाऊन ती आठमाही व योग्य व्यवस्थापन झाले तर बारमाही ही वाहू शकेल. त्यातून पाण्यातील परिसंस्था ही स्थिरावत जाईल व तीही एके दिवशी समृद्ध होईल .पण त्यासाठी फक्त बारा गावातच नाही तर कधायू च्या उगमापासून संगमापर्यंत पाणलोट क्षेत्र विकास, गवत कुरण विकास अशी सर्व कामे व्हायला हवीत. कधायू नदी जोवर जिवंत होत नाही तोवर मी मरत नाही इतक्या प्रचंड आशावाद आपल्या कृती कार्यक्रमावर विश्वास ठेवून जयाजीराव व्यक्त करतात. त्यासाठी ते सत्तरीतही लढताहेत. माणसांच्या मनाला कधायू साठी पाझर फुटावा म्हणून जयाजींच्या सत्याग्रहाचे अग्रणी सेनापती आहेत विकास कांबळे व धनंजय पडघन !! या सर्वांना मनःपूर्वक सलाम !!!

जलसंवर्धनासाठी गवताचे महत्व पानी फौंडेशनने उगम कडून जाणून घेतले. व त्यांनी हिंगोली काठील मारवेल गवताची नर्सरी तयार केली. तसेच फौंडेशन कडून करण्यात येणाऱ्या माथ्यावरील कामासाठी गवत लागवड करणे अनिवार्य केले आहे. व मूल्यमापनात मार्क सुद्धा ठेवण्यात आले आहे.

*****



# लोकसहभागीय चळवळीतून कयाधू नदीचे पुनरुज्जीवन एक स्वप्न

**श्री. प्रकाश इंगोले (९३७३९६३०३५) - श्री. विकास कांबळे (७७२२०४८२३०)**

पाणी हे जीवन आहे असे म्हणतात व तिसरे महायुद्ध हे पाण्यामुळेच होणार असेही बोलल्या जाते पाण्यामुळे जीवन मरणाचा प्रश्न निर्माण होणार आहे ही भीती व्यक्त केल्या जाते, पण असे असले तरी प्रत्यक्ष कृतीतून मात्र पाणी वाचवण्यासाठी कोणतीच कृती होताना दिसत नाही. त्यामुळे पाण्यासाठी भांडण तंटे आणि वेळ प्रसंगी युद्ध पेटण्यास जास्त काळ लागणार नाही.

२५०० वर्षापूर्वी रोहिणी नदीच्या पाण्यासाठी शाक्य आणि कोलिया या दोन राज्यात युद्ध होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. नरसंहार होवू नये म्हणून युवराज सिद्धार्थाने गृहत्याग करून युद्ध टाळले होते. आताही आपण पाहतो काही जिल्हातील धरणाचे पाणी दुसऱ्या जिल्ह्यात सोडल्यास नागरिकांत उद्रेक होतो. धरणाच्या पाण्यासाठी राज्या – राज्यातही कलह निर्माण होताना दिसतो. चीन व बांगलादेशातून वाहणाऱ्या ब्रम्हपुत्रा नदीचा कलह तर दोन देशातील कलह आहे. हिंगोली जिल्ह्यात ही पाण्याचा प्रश्न गंभीर आहे, जिल्ह्यातून वाहणारी एकमेव कयाधू नदी ही केवळ पावसाळ्यातच वाहते, जिल्ह्यात निर्माण झालेली ही समस्या ओळखून उगम ग्राम विकास संस्थेच्या वतीने कयाधु नदीला पूर्वी प्रमाणे बाराही महिने कसे  वाहते करता येईल, व जिल्ह्यातील कयाधू नदी काठच्या २०० ते २५० गावांना सुजलाम सुफलाम करता येईल हा उद्देश डोळ्या समोर ठेवून उगम संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव यांनी त्यांच्या गुरुवर्य नर्मदा बचाव आंदोलनाच्या प्रनेत्या मेघा पाटकर तसेच पाणीवाले बाबा डॉ. राजेंद्रसिंह राणा आणि डॉ. व्दारकादास लोहिया ह्यांना कयाधु नदीची सद्यस्थिती दाखवून वरील तीनही व्यक्तींना जिल्ह्यात बोलवून त्याच्या उपस्थितीत वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे.



हिंगोली जिल्ह्याची ओळख तशी शासन स्तरावर सर्वच बाबतीत मागासलेला जिल्हा अशीच आहे. जिल्हातील मानव विकास निर्देशांक कमी असल्याने जिल्ह्यात मानव विकास मिशन, मागासक्षेत्र अनुदान निधी, अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम, एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम  अशा विविध योजनाची अंमलबजावणी करून दुष्काळावर मात करण्याचा प्रयत्न शासनाच्या वतीने केला जात आहे. या सर्वाचे मूळ म्हणजे हिंगोली जिल्ह्यात सिंचनाची व्यवस्था नाही. विशेषतः हिंगोली, सेनगाव औंढा ना. आणि कळमनुरी तालुक्यातील शेती ही पावसाच्या पाण्यावरच अवलंबून आहे. हिंगोली जिल्ह्याची प्रमुख नदी म्हणून ओळखली जाणारी कयाधु नदी ही कोरडीच असते. कयाधू जरी ह्या चार तालुक्यातील गावा शेजारून वाहत असली तरी या नदी काठच्या गावांना बारमाही पिण्याच्या पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागते. कोरड्या पडलेल्या कयाधू नदीला पुनर्जीवित करण्याची संकल्पना ज्यांच्या डोक्यात आली ते उगम ग्रामीण विकास संस्थेचे अध्यक्ष व समाजसेवक जयाजी पाईकराव म्हणतात की, मी जेव्हा टाटा सामाजिक विज्ञान संस्थेतून समाजकार्य शिक्षणाचे पदव्यूत्तर शिक्षण घतले. त्यानंतर कयाधू ग्राम विकास नावाच्या संस्थेतून प्रत्यक्ष समाज कार्यास सुरुवात केली. कयाधू नदी आणि कयाधू हे समीकरण अगदी बाल पणापासून माझ्या जीवनात आल्याचे सांगून जयाजी पाईकराव यांनी सांगितले की, माझे जन्मगाव तेव्हाच्या कळमनुरी व आताच्या औंढा ना. तालुक्यातील कंजारा हे गाव कयाधू नदी काठावर वसले आहे असे सांगून पाईकराव पुढे म्हणाले की, बालपणापासून ते माझ्या युवा अवस्थेपर्यंत मी कयाधू नदीच्या पात्रात पोहायचो त्या वेळी मे महिन्यात नदीच्या पात्रात माझ्या डोक्याच्यावर (म्हणजेच ४–५ फुटाच्या वर) पाणी असायच परंतु हीच कयाधू नदी आता कोरडी पडली आहे. यावर्षीच्या पावसाळ्यात तर कयाधू नदीत गुडघ्यापर्यंत ही पाणी वाहील नाही. ही परिस्थिती भयंकर आहे. या परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रत्यक्ष कृतीची गरज असल्याने उगम संस्थेच्या वतीने कयाधू नदीला पुनर्जीवित करण्याची मोहीम सुरु केली असल्याचे पाईकराव यांनी सांगितले.

उगम ग्रामीण विकास संस्थेच्या वतीने डॉ. राजेंद्र सिंह व डॉ. लोहिया यांचे कार्यक्रम घेतले त्यानंतर प्रत्यक्षात कामाला सुरुवात केली. प्रथम प्रयोग म्हणून कयाधू नदीच्या काठावरील आमदरी व तेलंगवाडी या दोन गावाच्या शिवारातील माथ्यापासून ते पायथ्यापर्यंतचे कयाधू नदीकडे वाहणारे नाले, ओढे पाणलोट विकासाच्या कामातून पुनर्जीवित करून ते वाहते केले. मागील दोन अडीच वर्षा पासून उगम संस्था व



ग्रामस्थांच्या सक्रीय लोकसहभागामुळे पाणलोटाचे कामे पूर्ण झाली त्यामुळे जमिनीतील पाणी जमिनीत मुरून नाले, ओढे वाहते झाले आहेत. हाच प्रयोग कयाधू नदीच्या काठावरील गावामध्ये यशस्वी होऊ शकतो. हे ओळखून कयाधू नदीची सर्व माहिती गोळा करणे गरजेचे असल्याने नदीच्या अभ्यासासाठी इडलगिव्ह (सी. एस. आर.) व उगम संस्थेच्या माध्यमातून दि.२३ एप्रिल २०१७ पासून सर्वेक्षणास सुरुवात केली. ते सर्वेक्षणाचे काम दि.३१ ऑक्टोबर २०१७ रोजी पूर्ण झाले आहे. सर्वेक्षणात सुरुवातीला ३० लोकांनी काम केले त्या नंतर तांत्रिकतज्ञ १५ लोकांनी फेर सर्वेक्षण केले. सलग ७ महिने सर्वेक्षणाचे काम चालले त्यामध्ये नदीचे उगम स्थान असलेल्या वाशीम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील आगरवाडी, कंकरवाडी व सेनगाव तालुक्यातील दाताडा खु., दाताडा बु., कवठा गावापासून सेनगाव शहरासह, हिंगोली, औंढा ना. व कळमनुरी तालुक्यातील नदीकाठचे विविध गावे असे कळमनुरी तालुक्यातील सोडेगाव पर्यंत ८० कि.मि अंतरापर्यंत मोजमाप केल. या नदीला जोडणाऱ्या १५५ गावातील नाले, ओढ्याचे सुमारे ११७७५ कि.मी अंतराचे मोजमाप केले या परिसरातील ओढे, नाले, पाट, पाणंद या जलस्त्रोताची लांबी, रुंदी, खोलीचे मोजमाप व सर्वेक्षण केले. सध्या या जलस्त्रोताची काय अवस्था आहे, किती पाणी वाहत आहे, किती पाणी अडविले आहे ह्या सर्व नोंदी घेण्यात आल्या आहेत.

सर्वेक्षणात प्रामुख्याने सद्यस्थितीत ४० पाणलोट निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे. नदीकाठच्या या १५५ गाव परिसरात किती सिमेंट नाला बांध (CNB), मातीनाला बांध (MNB), सलग समतल चर (CCT) आहेत याच्या गाव निहाय नोंदी घेण्यात आल्या आहेत. जे ओढे व नाले गाळून गेले आहेत, त्याच्या नोदी घेवून, कयाधु पुनर्जीवित करण्याच्या दृष्टीकोनातून या १५५ गावाच्या ११७७५ कि.मी लांबी नाल्याची नव्याने हे जलस्त्रोत वाहते करण्यासाठी माथा ते पायथा संकल्पना राबवून नव्याने किती ठिकाणी सिमेंट नाला बांध, माती नाला बांध, सीसीटी, ग्याबियन, अद्रड स्टकचर कामे करता येतील तसेच सध्या असलेल्या जुन्या स्त्रोतात काय दुरुस्ती करायची ह्या सर्व नोंदी सर्वेक्षणातून घेण्यात आल्या आहेत.

या सर्वेक्षणात प्रामुख्याने नदीकडे वाहणाऱ्या पाणलोट नष्ट झाल्याचे, बुजून गेल्याचे, पात्र अरुंद झाल्याने नदी, नाले व ओढ्याचे प्रवाह खंडित झाले त्यामुळे प्रवाह नदी पर्यंत न वाहता इतरत्र वाहत असल्याचे दिसून आले. सर्वेक्षणात या परिसरात आताच्या परिसरात असलेल्या जुन्या २७६ सिमेंट नाला बांध व जुने ४५४ माती नाला बांध या सर्वाची दुरुस्ती आणि गाळ काढणे आवश्यक असल्याचे दिसून येते. सर्वक्षणातील मुद्यावरून ऐतिहासिक धार्मिक महत्त्व असलेल्या कयाधू नदीची आजची परिस्थिती पाहता आपण सर्वजण या जिल्ह्यातील नागरिक आहोत या नात्याने लाजच वाटते. कयाधू नदीला संपूर्ण भारतात अनन्य साधारण महत्त्व आहे. या नदीचा उगम विदर्भातून जरी झाला असला तरी ही नदी हिंगोली जिल्ह्यासाठी महत्त्वाची आहे, नदीचे नाव कयाधू पडल्याची आख्यायिका सांगितल्या जाते. त्यामध्ये थेट संबंध पुराणाशी जोडला जातो. भक्त प्रल्हादची आई व हिरण्यकश्यपच्या पत्नीचे नाव कयाधू होते. त्या वेळच्या एका प्रसंगामुळे नदीचे नाव कयाधू पडल्याचे जुने जाणकार लोक सांगतात. सर्वात महत्त्वाची संपूर्ण भारत देशात नदीची ओळख म्हणजे राष्ट्रसंत नामदेव महाराजाचे जन्मस्थान नर्सी (नामदेव) हे गाव आहे. नामदेव महाराजाचा ही या नदीशी संपर्क आलेला आहे असे सांगितल्या जाते. आता जर पाहिले तर या नदीच्या अगदी काठावर नर्सी या गावी पुरातन नामदेव महाराजाचे मंदिर आहे. तसेच नामदेव महाराजाला गुरुस्थानी मानणाऱ्या शीख समाजाच्या वतीने नर्सी येथेच भव्य नामदेव महाराजाच्या गुरुव्दाराची उभारणी करण्यात आली आहे. शिखांच्या पवित्र गुरुग्रंथ साहेब या ग्रंथात नामदेव महाराज व नर्शीचा उल्लेख असल्याने हजारोंच्या संख्येने शीख बांधव नर्सीला नामदेव महाराजांच्या दर्शनाला देशभरातून येत असतात. तसेच नर्सी नामदेव येथील नदी पात्रात देशातील विविध ठिकाणाहून मानवी अस्थी विसर्जित केल्या जातात त्यामध्ये अनेकांच्या धार्मिक भावना ही आहेत. अलीकडेच स्वं. बाळासाहेब ठाकरे व स्वं. विलासराव देशमुख यांच्या अस्थी विसर्जित करण्यात आल्या आहेत.

कयाधु नदीच्या तीरावरच जिल्हा मुख्यालयाचे ठिकाण असलेले हिंगोली शहर आहे. १०० ते १५० वर्षा पूर्वीपासून हिंगोलीत कयाधु नदीच्या तीरावर संत खाकीबाबा मठ आहे. याच मठात खाकी बाबाचे वास्तव्य होते. अशी ऐतिहासिक व धार्मिक ओळख असलेली कयाधू नदी सध्या धोक्यात आहे. ही नदी जर वाहण्याची बंद झाली, तर नर्सी नामदेव व हिंगोली शहरासह या नदी काठच्या १५५ गावाची ओळखही नष्ट होण्यास वेळ लागणार नाही.

सर्वेक्षणाचे काम झाल्यावर आता प्रत्यक्षात काय काम करायचे याचा ताळेबंद तयार केला जात आहे. नदी जिवंत करायची म्हणजे नेमके काय करायचे त्याचा एक मंत्र उगमला सापडला आहे. तो म्हणजे पावसाचा पडलेला प्रत्येक थेंब हा जमिनीत मुरला पाहिजे प्रत्येक गावाचं पाणी गावातच मुरलं पाहिजे व जमिनीत मुरून उरलेलं पाणी हे गावाच्या ओढ्यातून, नाल्यातून, पाटातून, पाणंद ह्याच्या माध्यमातून नदी पर्यंत पोहचल पाहिजे. प्रत्येक गावातल, शिवारातल पाणी जेव्हा नदी पर्यंत पोहचले तेव्हा कोरडी पडलेली कयाधू नदी वाहती होईल.

वैद्यकीय भाषेत सांगायचे म्हणजे सध्या कयाधू नदीची व या नदीला पोचणाऱ्या पाणलोटाची एनजीओग्राफी व त्यानंतर एनजीओप्लास्टी करणे गरजेचे आहे. म्हणजेच सध्या या नदीला जोडणाऱ्या पाणलोटच्या रक्त वाहिन्या ह्या ब्लॉक झाल्या आहेत. नदीच्या रक्त वाहिन्या पुन्हा पूर्ववत सुरु करण्यासाठी नदीच्या काठावरील व परिसरातील १५५ गावातून डोंगर-माथ्या पासून ते नदीच्या पायथ्या

पर्यंत पावसाच पाणी अडविण्यासाठी व जमिनीत मुरण्यासाठी जे–जे उपक्रम असतील ते करणे गरजेचे आहे.

कयाधू नदी जिवंत करण्याचे स्वप्न जरी उगमने पाहिले असले तरी संस्थेने एकट्याने काही होणार नाही आणि तसा संस्थेचा काही स्वार्थ ही नाही. आजकाल स्वंय सेवी संस्थेचे काम म्हंटले की केवळ उपक्रम दाखवून फोटो काढून अहवाल सादर केला व निधी हडप करायचा असे समीकरण झाले आहे. म्हणून लोकांचा स्वयसेवी संस्थाच्या कामाकडे पाहण्याचा दृष्टीकोण ही बदलत चाललेला आहे. कयाधू नदी जिवंत करण्यासाठी हा दृष्टीकोन बदलण्याची आवश्यकता आहे. हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्याच्या व जिल्ह्यातील प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक नागरीक विशेषतः या नदी काठावरील व परिसरातील १५० ते २०० गावाच्या प्रत्येक शेतकरी, स्त्री, पुरुष, युवकाची गरज आहे. कयाधू नदी पुन्हा वाहती झाली पाहिजे या नदीला पुन्हा गत वैभव प्राप्त झाले पाहिजे हे जो पर्यंत या गावातील लोकांना व्हावस वाटणार नाही तसेच हे काम आपल आहे या कामाची गरज आहे हे लोकांना कळणार नाही, तो पर्यंत काहीच होणार नाही. म्हणून कयाधू नदी जिवंत करण्यासाठी ही मोहीम लोकचळवळ झाली पाहिजे या मध्ये लोकांचा सक्रीय सहभाग आवश्यक आहे. लोकांनी हे काम संस्थेच आहे. संस्थेला काही तरी मिळत आहे हा दृष्टीकोन बदलून हे काम आमच आहे आणि संस्था ही आमच्या कामासाठी दीपस्तंभ ठरली असून आमच्या भल्यासाठी कार्य करीत आहे. हे जेव्हा होईल तेव्हाच हे स्वप्न प्रत्यक्षात येणार आहे. संस्था गावाच्या कामात व विकासात सहभागी होणार आहे. कयाधू नदीच्या वाहत्या असणाऱ्या मागील २०–२५ वर्षा पूर्वीच्या आठवणी काढून प्रत्येकजणच चिंता व्यक्त करतो. नुसत चिंता व्यक्त करून व गप्पा मारून काहीच होणार नाही. आता प्रत्यक्ष कृती करण्याची वेळ आली आहे.

नुसत सर्वेक्षण करून संस्था थांबणार नाही मागील २–३ वर्षा पासून संस्थेने ज्या कामाला सुरुवात केली आहे ते काम सुरु राहणार आहे. ज्या प्रमाणे संस्थेने सुरुवातीला पथदर्शी प्रकल्प म्हणून आमदरी व तेलंगवाडी येथे काम केले आहे. त्या प्रमाणेच संस्थेच्या वतीने सध्या नदी काठावरील सुरुवातीला सतरा गावामध्ये कामे करण्यासाठी निवड करण्यात आली आहे. तीन क्लस्टर मध्ये हे काम केले जाणार आहे. एका क्लस्टर मध्ये ५ ते ६ गावे असणार आहेत. या कामासाठी विविध पातळ्यावर कामे केली जाणार असून त्यामध्ये खालील प्रमाणे हे काम लोकचळवळ करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहे.

जाणीव जागृती: प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्या अगोदर हे काम आपल आहे आपली गरज आहे हे समजून सांगण्याची संस्था या गावामध्ये कयाधू नदी पुनर्जीवीत करण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून कार्यक्रमाचे आयोजन करून लोकांमध्ये प्रबोधन करून त्यांच्यात हे काम होणे गरजेचे आहे व हे काम आमचे आहे यासाठी जाणीव जागृती करणार आहे.

**गावाच्या कामात संस्थेचा सहभाग :**

लोकांमध्ये जाणीव जागृती झाल्यास त्यांना पटेल की हे काम एका सरकारच किंवा संस्थेच नसून आपल आहे, आपल्या गावाच आहे आणि आपल्या गावाच्या कामात आपण संस्थेचा सहभाग घेऊ, संस्थेची मदत घेऊ तेव्हा खऱ्या अर्थाने ही एक मोहीम होईल व लोकचळवळ तयार होईल.

**महिलाचा सक्रीय सहभाग आवश्यक :**

संस्थेने निवड केलेल्या सुरुवातीच्या १७ गावामध्ये कामाला सुरुवात करीत असताना सर्व प्रथम या मोहिमेत महिलाचा सक्रीय सहभाग घेण्यात येणार आहे. त्याच कारण ही तसेच आहे दुष्काळ आणि पाण्याचा व शेतीचा थेट संबंध महिलांशी आहे. घरातील पाणी भरण्यापासून ते शेतीत काम करीत असतांना पाण्याची काटकसर व नियोजन महिलांना चांगल्या प्रकारे माहित असत. शेतीचा शोध लावणारी महिला कुटुंबासाठी दुष्काळात डोक्यावरून कोसावरून पाणी आणणारी महिला हे काम चांगल्या प्रकारे करू शकेल म्हणून त्या त्या गावातील महिला बचत गट, महिलांचे शेती गट ह्यांना या मोहिमेत सहभागी करून घेतले जाणार आहे.

**सर्व स्तरातील लोकांचा सहभाग व समिती स्थापना :**

हे काम सुरु करीत असताना नदीकाठाच्या व लगतच्या गावामध्ये संस्था या कामात त्या गावातील व परिसरातील प्रत्येकाचा सहभाग व प्रत्यक्ष कार्यक्रामात हातभार लागावा यासाठी तेथील महिला बचत गट, शेतकरी कामकरी महिला, पुरुष, युवक मंडळ, गावस्तरावर स्वयंसेवी संस्था, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, पं.स. सदस्य, जि. प. सदस्य, विविध राजकीय पक्षाचे, विविध जातीधर्माचे पुढारी यांना मोहिमेत सहभागी करून, त्यांच्या समित्या स्थापन करून त्यांच्यावर जबाबदारी सोपवून ही चळवळ पुढे नेण्यात येणार आहे.



**ज्येष्ठ नागरिक व जाणकारांचे मार्गदर्शन :**

सध्याच्या परीस्थिती विविध सामाजिक माध्यमे व दूरदर्शन आदीच्या जाळ्यात माणूस गुरफटला गेल्याने घरातील, गावातील लोकाशी, संवाद बंद झाला आहे. ज्येष्ठ व वयोवृद्ध तसेच जाणकार लोकांशी ही संवाद होत नाही. त्यामुळे गावातील, घरातील जाणकार ज्येष्टाकडे असलेल्या ज्ञानाचा वापर करून घेतला जाईल, पूर्वी आजी–आजोबा अनेक संकटावर तसेच रोगावर तात्काळ उपचार सांगत, गावातील वैद्य आपली जडीबुटी कशी वापरायची याचे ज्ञान आपल्या

मुलाला, नातेवाईकाला देत असत. आजीबाईच्या बटव्यातील अनेक जीन्स आजही गुणकारी ठरतात. परंतु या जाणकार व जेष्टा कडे असलेल्या पारंपारिक ज्ञानाचा वापर व त्याची मदत घेण्यास कोणीच तयार नाही. आपण जेव्हा गावातील पाणी टंचाई साठी एखादा बोअर घेण्यासाठी मशीनचा वापर करतो, (पाणी पाहण्यासठी) पण मशीनने पाहणी करून ही त्या ठिकाणचा बोअर कोरडा जातो. परंतु एखादा जाणकार ज्येष्ठ जेव्हा आपल्या कडे असलेल्या अनुभवावरून व वाहणाऱ्या पाण्याचा अंदाज बांधून अमुक ठिकाणी बोअरला मुबलक पाणी लागेल अस सांगतो तेव्हा तिथे पाणी लागतच. तेव्हा या मोहिमेत प्रामुख्याने गावातील जुन्या, जाणकार वयोवृद्धाची मदत व मार्गदर्शन घेऊन त्या गावात व शिवारात पूर्वी कोणकोणत्या नाले, पाट, ओढे यातून पाणी वाहत होते आणि आता पुन्हा हे आटलेले व बुजलेले पाणलोट कसे सुरु करता येतील त्या दृष्टीने प्रयत्न केले जाणार आहेत.

**प्रशासनातील तज्ञ व भूमिपुत्राचा सहभाग :**

हिंगोली जिल्ह्यातील अनेक भूमिपुत्र जिल्हाधिकारी आणि त्यापेक्षा वरच्या हुद्यावर आपले कर्तव्य बजावत आहेत. तसेच अनेक तज्ञ ही आप आपल्या क्षेत्रात काम करीत आहेत. त्याचा ही सहभाग व मार्गदर्शन ही मोहिमेत यशस्वी करण्यासाठी घेतला जाणार आहे. जसे औंढा ना. तालुख्यातील रहिवाशी असलेले व सध्या जिल्हाधिकारी पदावर कार्यरत असलेले पांडुरंग पोले हे आपल्या गावात जलसंधारणाची मोहीम नाम संस्थेच्या माध्यमातून करीत आहेत. अशा लोकांना कयाधू नदी जिवंत करण्यासाठी सोबत घेतले जाणार आहे.



उगम संस्था वरील प्रमाणे नियोजन बद्ध पध्दतीने कयाधू नदी जिवंत करण्यासाठीच्या कामाला लागली आहे. या सर्वांचा सहभाग व मार्गदशन घेवून जेव्हा लोकचळवळ होईल तेव्हा गावातील लोकांना पाणी वापराच गणित व तंत्र सांगितले जाईल. कारण जो पर्यंत हे पाणी ताळेबंद लोकांना कळणार नाही, पावसाच्या पाण्याच महत्व पटणार नाही. आपल्या गाव परिसरात एवढ पाणी पडतंय आणि आपल्या गावाची पाण्याची गरज इतकी आहे हे करण्यासाठी सुरुवातीला निवडलेल्या १७ गावात व नदी काठच्या इतरही गावात पर्जन्यमापक यंत्र बसविण्यात येणार आहेत. त्या नंतर सरासरी पडणाऱ्या पावसाचा अंदाज बांधून पडणार पाणी आणि गावातील लोकाच्या पिण्याच्या दैनंदिन गरजांसाठी दरडोई किती पाणी लागत, गावातील गुर, ढोर, पशू, पक्षी यांना किती पाण्याची आवश्यकता आहे. गाव शिवारातील शेतीसाठीच्या सिंचनासाठी किती पाणी लागते. हा ठोकताळा काढून त्या भौगोलिक क्षेत्रावर पडणार पाणी आणि गावासाठी लागणार पाणी याच नियोजन केले जाईल. हे नियोजन केल्यानंतर पडणार पावसाच पाणी कस पकडून ठेवायचं याच तंत्र शिकवण्यात येणार आहे. त्यामध्ये पुन्हा पथदर्शी प्रकल्पात वापरलेलं माथ्या पासून ते पायथ्यापर्यंतचे पाणी अडविण्याचे व जिरवण्याचे लूजबोल्डर, शेततळे, CNB, असे विविध उपक्रम घेणे ही आमच्या गावची गरज आहे. आणि ते आपल्याला करावेच लागेल. हे जेव्हा सर्वांना पटेल तेव्हा ते सर्वजण या चळवळीत सहभागी होतील.

**पाणी वापरायच तंत्र शिकविणे :**

पाणी अडविणे व जिरवणे हे सर्वांना माहित झाल्यावर अडविलेले पाणी आणि भूगर्भात असलेले पाणी वापरायच तंत्र सर्वांना शिकवावे लागेल. आपला जिल्हा व आपले गाव हे अवर्षण प्रवणक्षेत्र आहे. त्यामुळे या भागात जास्त पाणी लागणारे ऊस आणि केळी हे पिके घ्यायचे टाळावे लागेल हे समजून सांगून कमी पाण्यावर जास्त उत्पन्न येणारे कोणती पिके आहेत याच मार्गदर्शन करून आपल्याकडे आपल्या विहिरीत, बोअरवेल, शेततळे व अन्य माध्यमातून पाण्याचा अपव्यय टाळून कमी पाण्याचा जास्तीत जास्त वापर करता येणारे ठिबक सिंचन, तुषार सिंचन असे सिंचनाचे नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे शिकविले जाईल.

**संस्थेचे स्वप्न मोठपण अशक्य नाही :**

उगम ग्रामीण विकास संस्थेने कोरडी पडलेली कयाधू नधी पुन्हा वाहती करायचे जे स्वप्न पाहिले आहे हे स्वप्न मोठ असले तरी अशक्य नाही. तरी हा सर्व चाललेला खटाटोप पुढे न्यायचा म्हटलं तर पैसा लागणार आहे. अनेकांचा सहभाग लागणारच आहे. असे असले तरी कोणावर जास्त अवलंबून न राहता संस्थेने सर्वेक्षणात जे जे करायचं आहे ते करण्यासाठी सध्या प्रशासकीय यंत्रणे मार्फत जे जलसंधारण व पर्यावरण संरक्षणाचे कार्यक्रम सुरु केले आहेत. त्या कार्यक्रमात सहभागी होऊन हे करण्याचे ठरविले आहे. सध्या सुरु असलेली जलयुक्त शिवार योजना, ४ कोटी वृक्ष लागवड योजना, मागेल त्याला शेततळे, अशा विविध योजना कयाधू नदी पुनर्जीवन करण्यासाठी दृष्टिकोनातून निवड केलेल्या गावात राबविल्या जाणार आहेत.

**गरजपूर्ण होऊ शकते पण हाव संपत नाही :**

आपण पाहतो की माणसाच्या गरजा ह्या तुटपुंज्या उत्पन्नातूनही पूर्ण करता येतात परंतु माणसाची हाव मात्र मरेपर्यंत संपत नाही हीच अवस्था आता पाण्याची झाली आहे. गरजे पुरत पाणी आताही

उपलब्ध होऊ शकते परंतु शेतकऱ्यांत जी पाण्याची हाव निर्माण झाली आहे त्यामध्ये शेतकरी दरवर्षी आपल्या शेतात नवीन बोअर घेतो. सध्या आपण पाहतो की, जवळपास ८०० – १००० फुट खोली पर्यंत बोअर घेऊन प्रचंड पाणी उपसा सुरु आहे. सध्या वापरात असेलेले पाणी हे मागच्या २००– ३०० वर्षा पूर्वी भूगर्भात साठवलेले पाणी आपण वापरात आहोत. आणि जमिनीची चाळणी करून आडमाप पाणी उपसा सुरु आहे. त्यामुळे दरवर्षी पाणी पातळी खोल खोलच जात आहे. साधारणतः ही भूगर्भातील पाणी पातळी प्रत्येक वर्षाला ५ फुट खाली जात आहे. पण त्या प्रमाणात पावसाचे पाणी जमिनीत खोलवर मुरण्याच, झिरपण्याच प्रमाण नाहीस झाल आहे. आता तर दरवर्षी दुष्काळ पडतो त्यामुळे हे पावसाच पाणी जमिनीत मुरतच नाही. सध्याच्या ज्या पाणी मुरवण्याच्या प्रचलित पद्धती आहेत त्या पाहता आपल्या भागातील जमिनीचा व खडकाचा आणि पडणाऱ्या पावसाचा अभ्यास केला तर फक्त १५ फुट खोली पर्यंतच हे पावसाच पाणी मुरतंय. पावसाच पाणी जमिनीत खोल पर्यंत मुरवायचं असेल तर आपणास प्रत्येक गावातील कोरडे व बंद पडलेले बोअर रिचार्ज करावे लागणार आहेत. हे बोअर पुनर्भरण तसेच विहीर पुनर्भरण या बरोबरच रिचार्ज पद्धतीने आणि एखाद्या सी. एन. बी. जवळ बोअर घेऊन त्या बोअर जवळ शोषखड्डा तयार करून पाणी जमिनीत मुरवल तर पाणी जमिनीत १०० फुटापर्यंत खोल मुरवल जाऊ शकते. बोअर पुनर्भरणातून २००– ३०० फुटापर्यंत खोल जमिनीत पाणी मुरवल जाऊ शकतंय. अशा विविध पद्धतीने जमिनीत खोल पाणी मूरविण्याच्या व भूगर्भातील पाणी साठा वाढविण्याच्या दृष्टीकोनातून ही या मोहिमेतून प्रयत्न केले जाणार आहेत. जेव्हा नदी पुनर्जीवित होईल तेव्हा पाण्याचा उपसा व वापर हा गरजापूर्ण करण्यासाठी होईल लोकांना पाण्याच महत्व समजल्याने आडमाप पाणी उपस्यावर ही अंकुश बसेल.

**अमीर खान पेक्षा डॉ. राजेंद्रसिंहाची प्रेरणा :**

एकूणच सध्या उद्भवणारी दुष्काळी परिस्थिती, त्यामुळे देशातील कानाकोपऱ्यात पाणी वाचवणे, नद्या स्वच्छ करणे, नद्या जोडणे असे अनेक उपक्रम वेगवेगळ्या व्यक्ती व संस्थाच्या माध्यमातून राबविल्या जात आहेत. त्यामध्ये सिनेस्टार अमीर खान यांची पाणी फौंडेशन संस्था  एखाद्या गावाला पाणी संवर्धनात काम केल्यास त्या गावाला लाखापासून ते कोटी पर्यंत बक्षीस देत आहेत. ते बक्षीस मिळणार या लालसेने किंवा ध्येयाने झपाटलेले लोक व ते गाव आपणास बक्षिसाची रक्कम मिळावी यासाठी कामाला लागतात आणि बक्षीस ही मिळवतात, पण जेव्हा बक्षीस मिळतय तेव्हा व त्यानंतर हे काम थांबतंय, हे सर्वच प्रकारच्या बक्षीस योजनाच्या कामाच्या बाबतीत सध्या घडतंय, आपल्या कडील स्वच्छ भारत अभियान अंतर्गतचे निर्मल ग्राम पुरस्कार प्राप्त गाव पहा किंवा महात्मा गांधी तंटामुक्त ग्राम योजनेतील पुरस्कार मिळालेलं एखाद गाव पहा. सुरुवातीला या गावामध्ये ध्येयवेडे होऊन सर्वांनी मिळून काम केल, सर्वांच्या मेहनतीने गावाला पुरस्कार मिळाला. त्या नंतर पुरस्कार मिळाल्यास चार दिवसाचा आनंद संपला की  कामे ही थाबली अशी परिस्थिती पुरस्कार मिळणाऱ्या अभियानात दिसून येते. या तुलनेत डॉ. राजेंद्र सिंहाची संकल्पना जास्त चांगली आहे आणि चिरकाल टिकणारी आणि निरंतर चालणारी आहे. कारण राजेंद्रसिंह पाणी नियोजनापासून ते पाणी वापरापर्यंत सर्वाच्या सर्व हे लोक सहभागातून करीत आहेत त्यामधून जास्त प्रमाणात यश मिळत आहे. आणि त्यांनी केलेले काम चिरकाल टिकून आहे. म्हणूनच उगम संस्थेने डॉ. राजेंद्रसिंहाच्या संकल्पनेचा स्वीकार करून कामाला सुरुवात केली आहे. त्या संकल्पनेवर केवळ उगम संस्थेने पुढाकार घेतला आहे आता संस्था, शासनाचे विविध स्वयंसेवी संस्थाचे, लोकप्रतिनिधी समाजातील सर्व स्तरातील नामवंत, जेष्ठ नागरिक, महिला, युवक अशा प्रत्येक क्षेत्रातील सोबत घेऊन हे काम पुढे नेणार आहे.

**नदी वाहिलीच नाही तर अडवून काय फायदा :**

सध्या हिंगोली जिल्ह्यात उगम च्या वतीने कयाधू पुनर्जीवित करण्याचा जो विडा उचलला आहे. त्यामुळे काहीच्या पोटात दुखण्यास सुरुवात झाली आहे. आमच काम व ध्येय ही मोठे आहे. ते सर्व करीत असतांना अनेकांना वाटत आहे की सध्याच्या परिस्थितीत कोणीही नदीवर बंधारे बांधत आहे, कोणीही नदी खोल करीत आहे याच पद्धतीने उगम संस्थेचे प्रयत्न असतील, पण असे काहीच होणार नाही आम्ही कयाधू नदीच्या पात्रात धक्काही लावणार नाही. हे सर्व प्रथम स्पष्ट करीत आहोत. या वर्षीचा पावसाळा (वर्ष २०१७) चा आपण सर्वांनी अनुभवला आहे. संपूर्ण पावसाळ्याचा जून ते ऑगस्ट महिन्याचा कार्यकाळ आपण पाहिलाच आहे. या तीन महिन्यात कयाधू नदीला एकदाही पूर किंवा नदी दोन्हीकाठ (दुथडी) भरून वाहिली नाही. किंवा जमिनीचा खडा फुटला नाही (जमिनीत पाणी मुरून, नाला किंवा पाटातून ओहाळ वाहणे) हे आपण अनुभवलं आहे. आणि निसर्गाच्या या लहरी पणामुळे आगामी काळातही या हून भयानक काळ येणार आहे. त्यामुळे कयाधू नदीवर बांध किंवा बंधारे बांधून प्रश्न सुटेलच या बाबत शाश्वती नाही. आणि नदीवर बांध बंधारे बांधण्याच काम आम्ही करणार नाही. हे काम सरकार व लोक प्रतिनिधी करीत आहेत त्या कामाला ही आमचा सक्रीय सहभाग व पाठींबा राहणार आहे. वरील परीस्थिती पाहता कयाधू वाहतीच झाली नाही तर हे बांध बांधून भविष्यात कयाधू नदीकाठच्या गावचा पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न सुटेल काय? नाही. केवळ बांध व बंधारे बांधून होणार नाही त्यासाठी सर्व प्रथम आपल्या सर्वांना मिळून नदी वाहती करावी लागणार आहे. जेव्हा नदी वाहील, या नदीला सर्व नाले, ओढे येवून मिळतील आणि वर्षानुवर्षे हे पुढे टिकून राहील यासाठी उगम कायम स्वरूपी उपाययोजनेच्या कामास लागली आहे.

उगम संस्थेने लोकचळवळीतून उभी केलेली ही मोहीम संपूर्ण देशात आदर्श मॉडेल असेल उगम ग्रामीण विकास संस्थेच्या वतीने मागील २०–२५ वर्षापासून पूर्वीच्या परभणी व आताच्या हिंगोली जिल्ह्यात ग्रामीण विकासाच्या कामास सुरुवात केली आहे.

कोणीही उठाव चार नातेवाईक गोळा करावेत व संस्था काढावी या विचाराने संस्थेची सुरुवात झाली नाही. संस्थेचे संस्थापक जयाजी पाईकराव हे मुंबई येथील प्रसिद्ध टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचे विध्यार्थी आहेत. थोर समाजसेविका मेधा पाटकर ह्यांच्या मार्गदर्शनात पाईकराव यांनी १९८१ साली MSW हे समाज सेवेतील पदव्यूत्तर शिक्षण पूर्ण करून समाज सेवेच्या कामाला सुरुवात केली आहे. ग्रामीण भागातील महीला शेतकरी बचत गट व सेंद्रिय शेतीसह शेती विकास आणि ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी ह्यांच्याशी त्यांचा थेट संबध आला. त्यातच मागच्या १०–१५ वर्षात जिल्ह्यात वाढलेलं शेतकरी आत्महत्येचे प्रमाण, शेतकरी कुटुंबातील कर्त्या कुटुंब



प्रमुख्याने आत्महत्या केल्यावर कुटुंबाची झालेली वाताहत, उद्धवस्त झालेल्या कुटुंबाची अवस्था पाहून अस्वस्थ झालेले संस्थेचे अध्यक्ष जयाजी पाईकराव यांनी ओळखले की हे सर्व घडत आहे ते दुष्काळामुळे, नापिकीमुळे आणि दुष्काळाचा थेट संबध पाण्याशी, सिंचानाशी येतो आणि आपल्या जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी, औंढा ना. व सेनगाव भागात सिंचनाची व्यवस्था नाही शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून आहे. याच तालुक्यातून वाहणारी कयाधू नदी कोरडी पडली आहे. म्हणून एकूण निर्माण झालेल्या या परिस्थितीवर कायम स्वरूपी उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनातून मागील अनेक वर्षापासून पाईकराव हे उपाय शोधत होते. त्यांनी संस्थेच्या मार्फत राबविले विविध उपक्रम, विविध शासकीय समित्यावर भूषविलेली पदे या सर्व अनुभवातून त्यांनी कयाधू नदी पुनर्जीवित करण्याचा शोध लावला आहे आणि त्यांना जे ज्ञान मिळाले त्या आधारे प्रत्यक्ष कामास सुरुवात केली आहे. अगदी प्रवाह बरोबर किंवा इतरांची नक्कल करून कयाधू नदी पुनर्जीवित करण्याची लोकचळवळ उभी करण्याच्या दृष्टीकोनातून पावले उचलली नाहीत तर एका वेगळ्या तंत्राने त्यांनी कामाला सुरुवात केली आहे.

आपण पाहतो की काही जणांनी एक गाव, दोन गाव निवडून काम सुरु केले, काही नी नदी खोलीकरण करून तर काहींनी नदी साफ करून, नदीवर बांध बांधून काम केल्याचे आपण पाहतो. पण उगमच्या माध्यमातून जे काम हाती घेण्यात येणार आहे ते कयाधू नदी काठच्या १५५ गावाच्या पाणलोटाचा विकास करण्याचा आहे. या १५५ गावातून व भौगोलिक क्षेत्रातून वाहणारे नदी, नाले, ओढे, ओहळ अशा ८० कि. मि. अंतराच्या नदी काठावरील सुमारे ११७७५ कि. मि. अंतराचे पाणलोट पुनर्जीवित करणे, या सर्व ओढे, नाले, ओहळ यांना जिवंत करणे, वाहत करणे. हे करीत असतानाच या नदी व ओढ्या काठच्या थडीच्या जमिनीची झीज थांबावी, पाण्याबरोबरच मातीही वाहून जावू नये यासाठी त्या भागातील गवत, वृक्ष आणि फळझाडच संवर्धन व लागवड व्हावी, नदीकाठी असलेल्या मारवेल, पवना, जोन्धली, गोंडाळी या गवताच संवर्धन होऊन त्या भागातील दुग्ध विकास वाढावा या दृष्टीने प्रत्यन केले जाणार आहेत. एकूणच या सर्वातून कयाधू नदी काठच्या १५५ गावे व त्या भूभागातील इतर १०० गावे अशा २५५ गावातील ४८ हजार ३३२ कुटुंब आणि त्या कुटुंबाची २ लाख ४२ हजार ५१२ लोकसंख्येच्या पिण्याच्या व सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न मिटवून ही सर्व गावे सुजलाम– सुफलाम व्हावीत, ही गावे स्वयंपूर्ण व्हावीत या गावामध्ये शेती विकसित व्हावी सेंद्रिय शेतीचा विकास व्हावा, सेंद्रिय शेतीसाठी आवश्यक असलेल्या पशुधनात वाढ व्हावी, पशुधन वाढल्यास दुग्धविकास व शेती उत्पन्न वाढावे या भागात महिला व पुरुष शेतकऱ्याच्या दुग्ध उत्पादन कंपन्या, दालवर्गीय बियाणाच्या उत्पादक कंपन्या, राईसमिल, फ्लोअर मिल अशा शेतकऱ्याच्या कंपन्या सुरु व्हाव्यात तर या भागात कुकुटपालन, शेळीपालन उद्योग धंदे वाढावेत असा प्रयत्न राहणार आहे.

उगमच्या वतीने उभी केली जाणारी ही लोकचळवळ दीर्घ कालीन व शाश्वत उपाय योजना राहणार आहे. तंत्र शुद्ध पद्धतीने, पावसाच्या पाण्याचे संवर्धन करून, पाणी जमिनीत खोल पर्यंत मुरवून उरलेलं पाणी साठवून तसेच प्रत्येक ओढा, नाला, ओहळ नदी पर्यंत वाहता करून साठलेल्या पाण्याच योग्य नियोजन हे सर्व लोकाच्या सहभागातून केले जाणार आहे. त्यामुळे पूर्ण भारत देशात हे वेगळ्या प्रकारचे मॉडेल ठरेल. ही प्रकिया येत्या ४ ते ५ वर्षात पूर्ण होवून या भागाचा शाश्वत विकास व संवर्धन होईल ही आशा आहे. त्यासाठी सर्वाचे सहकार्य व पाठबळ आवश्यक आहे.

*****



# जयाजी पाईकराव - ढगाआडचा तळपणारा तारा

**श्री. सतीश खाडे**

**मो : ९८२३०३०२१८**



कयाधू नदी जिवंत केल्याशिवाय मी मरणार नाही ! लोकांच्या मनाला पाझर फुटला तर नदीला पाझर फुटायला वेळ लागणार नाही! कयाधू चे पुर्नजीवन हेच आता माझे जीवनध्येय आहे असे सांगणाऱ्या ....सत्तरी कडे वाटचाल करणाऱ्या तरुणांची ही ध्येयवाणी आहे... त्यासाठी प्रत्यक्षात उतरु शकणारा व्यावहारिक संकल्पना आराखडाही ज्यांनी तयार केलाय.... अगदी बालवयात मजुरीची कामे केली आणि पुढे त्याच व्यक्तीने हजारो माणसांना रोजगार उपलब्ध करून देण्यात मोठी भूमिका बजावली... लहानपणी दिवसभर राबून लाकडाची एक मोळी करून विकणाऱ्या या माणसाने पुढे जैवविविधता राखण्यासाठी लक्षणीय आणि पथदर्शी काम केले .... इतकेच काय रोजगार हमी योजनेतून नदीचे पुनरुज्जीवन करून पूर्ण नदीचे खोरे लोकसहभागातून पाण्याने समृद्ध करता येईल अशी जगातली पहिली पथदर्शी योजना आखून शासनकर्त्यांची त्याला मान्यताही मिळवली.... ...असा हा तळपणारा तारा आहे..... जयाजी पाईकराव !! महाराष्ट्रातच काय मराठवाड्यातही दुर्लक्षित असलेल्या हिंगोली जिल्ह्यातील हा तळपता तारा असूनही अनावधानाने ढगाआड असल्यासारखाच आहे !!

खडकावर बी रुजावे ..त्यावर रोप उगवावे... अनेक प्रतिकूलतेतच या रोपाचा वृक्ष व्हावा, अगदी तसेच जन्मल्यापासून आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, प्रागतिक वैचारीकता अशा सर्व बाबतीत प्रतिकूलता असूनही वंचितांच्या कल्याणासाठी कामांचा ढीग रचणाऱ्या जयाजी रावांचे व त्यांच्या उगम संस्थेचे पाणी व पर्यावरणाचे कामही लक्षणीय तसेच वेगळे ही आहे... विशेषतः कुरण संवर्धन व त्यातून साधलेले जलसंवर्धन !!

जयाजीरावांचा जन्म हिंगोली जिल्ह्याचे (पूर्वीचे परभणी) कळमनुरी तालुक्यातील कंजारा गावात वंचित समूहातील मजुरी करणाऱ्या आईवडिलांच्या पोटी झाला. आजही तो भाग नागरी जीवनापासून बराच दूर आहे. पन्नास व साठच्या दशकातला तो काळ , पण डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा स्फुल्लिंग महाराष्ट्राच्या व भारताच्या कानाकोपर्यात पोहोचला होता, त्या स्फुल्लिंगामुळे व जयाजींच्या आई–वडिलांच्या तीव्र इच्छाशक्तीने ते शिक्षणाच्या वाटेवर आले. नांदेडच्या बोर्डींग स्कूलमध्ये शिकत असतानाच गोड स्वभाव, हुशारी व मेहनतीची तयारी यामुळे शिक्षकांची मने जिंकत त्यांची वाटचाल झाली. शाळेच्या पाचवी सहावीच्या उन्हाळी सुट्टीमध्येच पैसे कमवण्यासाठी धडपड सुरू करावी लागली होती. त्यासाठी बरेचदा मजूरीच्या कामावर जायचे तर कधी दिवसभर खपून लाकूडतोड करुन मोळी बांधून विकायची. नंतर काही सुट्ट्यात गावोगावी व गल्लोगल्ली फिरुन आईसफ्रुटी(खेडे गावात त्याला गारेगार म्हणत) विकण्याचा व्यवसाय ही केला. पुढे त्या पुढच्या टप्प्यात दहावीच्या सुट्टीत तर लाऊड स्पीकर भाड्याने देण्याचा व्यवसाय ही केला. समाजाची गरज व त्यावर व्यावहारिक उपाय हे शालेय जीवनातच त्यांना उमगले होते हे आवर्जून नोंद घेण्यासारखे ! .पुढे कॉलेजला एनसीसी व एनएसएस दोन्ही मध्येही भाग घेणारे एकमेव विद्यार्थी ,अभ्यास ,समुहिक उपक्रम ,समाजसेवा तीनही बाबतीत आघाडीवर. कॉलेज काळात रक्तदान शिबिरांचे मोठ्या प्रमाणात आयोजन केले. त्यातून रक्तदात्यांची सूची बनवण्याची कल्पना राबवली. या व इतर अनेक सामाजिक उपक्रमांचे उत्तम वार्तांकन करून स्थानिक वृत्तपत्रात देणे या व अशा चमकदार कामामुळे समाजातील अनेक प्रतिष्ठितांची त्यांची वाहवा तर मिळालीच पण त्यांचा सहवास व मार्गदर्शनही मिळू लागले. यात होते आदरणीय नरहर कुरुंदकर ,डॉ. व्यंकटेश काब्दे , प्राचार्य गो..रा. म्हैसेकर सर. त्याच काळात युक्रांद व राष्ट्र सेवा दल यांच्या उपक्रमांतही जयाजीराव सहभागी होत. यातूनच ते नांदेडच्या स्थानिक वृत्तपत्रांचे पत्रकार ही बनले.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर आंदोलनाची दाहकता पत्रकार म्हणून त्यांनी अनुभवली. त्यातून त्यांना जाणवले की अस्मितेच्या प्रश्नांपेक्षा आर्थिक रचनाच समाजाची प्रगती करु शकेल. त्यातूनच पुढे मुंबईतील T.I.S.S.( Tata Institute of Social Sciences) येथे शिक्षणासाठी प्रवेश घेतला. TISS मधून पदव्युत्तर शिक्षण घेणारे ते मराठवाड्यातले पहिले विद्यार्थी. त्यासाठी कॉलेजला डिपॉझिट म्हणून त्यावेळी पंचवीस हजार रुपये भरावे लागले ,ते भरले डॉ.काब्दे डॉ. वानखेडे अशा सारख्या लोकांनी !! एका विद्यार्थ्याने समाजधुरीणांच्या मनात मिळवलेल्या विश्वास व आदराची ही पावतीच नव्हे काय ! TISS मध्ये प्राध्यापक म्हणून त्यांना मार्गदर्शन लाभले मेधाताई पाटकर आणि डॉ. पानवलकर अशा विभूतींचे .

जयाजीरावांनी कोर्सच्या शेवटच्या वर्षी चा प्रकल्प केला मुंबईतील चेंबूर मधील कुप्रसिद्ध लाल डोंगर वस्ती वसाहतीत. जयाजीराव यांनी त्या झोपडपट्टीतील लोकांबरोबर काम करून त्यांना मुंबई महापालिकेकडून रस्ते,पाणी आणि शौचालय, रेशन कार्ड अशा सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या. अभ्यासक्रमाचा भाग म्हणून काम न करता प्रत्यक्षात उपयोगिता साधणारे हे काम त्यांना 'बेस्ट स्टुडंट' म्हणून पारितोषिक देऊन तर गेलेच पण आयुष्यातला पहिलाच न भुतो न भविष्यती असा सत्कार त्या झोपडपट्टीवासीयांकडून त्यांना मिळाला. शिक्षण संपल्यावर उत्तम सरकारी किंवा खासगी नोकरीची संधी सोडून

ते स्वतःलाच दिलेल्या वचनाला जागून कंजारा या त्यांच्या गावी समाज सुधारण्याचा संकल्प घेऊन परतले. त्यांच्या बरोबरीचे काही लोक सरकारी नोकरीत जाऊन पुढे समाज कल्याण खात्याचे सचिव या पदापर्यंत पोहोचले.यावरून जयाजीरावांच्या त्यागाचे मूल्य लक्षात यावे.

**कयाधू प्रतिष्ठानच्या माध्यमातून केलेली कामे :**

संकल्प केल्याप्रमाणे उत्तम पगाराच्या व वलयाच्या नोकरीच्या अमिषाला बळी न पडलेल्या जयाजीरावांनी १९८४ मध्ये नांदेड मधील प्रतिष्ठितांबरोबर कयाधू ग्राम विकास प्रतिष्ठान ची स्थापना केली. तिचे फिल्डवर चे सर्व काम जयाजीराव पाहू लागले.त्या प्रतिष्ठाणचे ते सचिव ही होते. कळमनुरी या तालुक्याच्या ठिकाणी खोके वजा लाकडी फळ्यांचे ऑफिसमधून लोककल्याणाच्या कामांना सुरुवात झाली. बालवाड्या, महिलांना आरोग्य व रोजगार मिळून देणे अशा कामांना सुरुवात झाली. १९८५ च्या दुष्काळात जयाजीरावांच्या प्रयत्नातून दोन महत्त्वाची कामे घडली. प्रचंड दुष्काळ, शेतात काही नाही, हाताला अजिबात काम नाही.उपासमार मोठ्या प्रमाणात सुरु होती. अशावेळी शासनाने रोजगार हमीची तरी कामे सुरु करायला हवी होती. पण कुणीच याकडे लक्षच देत नव्हते. मग पाईकराव पती पत्नीने गावोगाव सायकलवर फिरुन मोर्चा काढण्याचे नियोजन लोकांना सांगितले. ठरल्या दिवशी संपूर्ण तालुक्यातून माणसां मोर्चाला आली. हजारो माणसांच्या मोर्चामुळे रोजगार हमी योजनेचे काम सुरू झाले .

दुसरे महत्त्वाचे काम म्हणजे या दुष्काळाला समर्थपणे तोंड देण्यासाठी १० गावात 'कॅथॉलिक रिलीफ सर्व्हिसेस नांदेड' या सामाजिक संस्थेकडून 'कामासाठी अन्न' फुड फॉर वर्क हा प्रोजेक्ट कयाधू प्रतिष्ठाणला मिळाला. या प्रकल्पांतर्गत स्वतःच्याच शेतीतील कामा पोटी बल्गर गहू व गोडेतेल मिळायचे. थोडे न थिडके अडीच लाख मनुष्य दिवसांसाठी हे अनुदान मिळाले, त्याचा हजारो लोकांनी फायदा घेतला. यात विहीर दुरुस्ती ची व विहिरीतील गाळ काढण्याची कामे झाली. तसेच शेतीच्या बांधबंदिस्तीची व पाणी संबंधीची कामे झाली. यातून पाणी संवर्धन उत्तम झाले व पुढच्या पावसाळ्यात अनेकांची शेती उत्तम पिकली. हा प्रकल्प तसा मोठा होता. त्यांच्या पद्धतीने घेतलेल्या मेहनतीमुळे हा पहिलाच मोठ्या प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी झाली होती. दाण्या दाण्याचा न् तेलाच्या थेंबा थेंबाचा हिशोब चोख ठेवला होता.

पुढे नंतर इतर अनेक कामा बरोबरच पाणी टंचाई हेच सर्व समस्यांचे मूळ आहे आणि पाणी उपलब्धता हेच अनेक समस्यांवर उत्तर आहे हे जयाजीरावांनी पुरेपूर जाणले. मग त्यासाठी शास्त्रोक्त पद्धतीने काम करायचे करायचे मनात आले. त्यासाठी तज्ज्ञांची मदत घेणे त्यांना आवश्यक वाटले. यासाठी त्यांनी मराठवाड्यातील समविचारी समाज कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन 'मराठवाडा इको ग्रुप' स्थापन केला. त्यात जयाजीरावां बरोबरच रमाकांत बापू कुलकर्णी (परभणी) एच.डी. कुलकर्णी, विश्वनाथ तोडकर (उस्मानाबाद,) एकनाथराव आव्हाड (बीड) यांचा समावेश होता. पुण्याच्या 'अफार्म'चे डॉ. मुकुंद घारे सरांच्या मार्गदर्शनाखाली विविध प्रशिक्षणे झाली व त्यातून विविध पाणलोट क्षेत्र विकासाची कामे झाली. ती शास्त्रोक्त पद्धतीने झालेली कामे आजही सुस्थितीत व जलसंधारण याबाबतचे उत्तम रिझल्ट देत आहेत. तीस वर्षापूर्वी दोन कोटी रुपये पाणलोट क्षेत्रासाठी कयाधू प्रतिष्ठणला मिळाले. त्यातून सोनवडी गावातील लघु पाणलोट क्षेत्राचे विकासाचे काम झाले. त्यातून तेथील दारिद्र्य व पाणी दुर्भिक्ष कायमचे हटले. या कामात DROP संस्थेचे अजित फडणीस यांची बरीच मदत झाली. तसेच 'ऑक्साफेम' चे राज्य समन्वयक अनिल शिदोरे व विनिता ताटके यांचा मराठवाड्यातील पाणी व लोकहितासाठी काम करणाऱ्या संस्थांना सहाय्य देऊन सक्षम करण्याचा कसोशीने चा प्रयत्न होता, हे इथे नमूद करायलाच हवे.

या अशा अनेक यशस्वी उपक्रमांमुळे जयाजीरावांना शासनाच्या विविध उपक्रमांच्या समित्यावर नियुक्त करण्यात येउ लागले ,आज ते अशा एकवीस समित्यावर नियुक्त आहेत.

**उगम संस्थेच्या माध्यमातून कामे :**

पुढे उगम संस्थेच्या माध्यमातून त्यांनी कळमनुरी तालुक्यातील तेलंगवाडी व औंढा नागनाथ तालुक्यातील आमदरी येथे ही दोन लघु पाणलोट क्षेत्र विकासाचे काम करून तेथील चार गावात पाण्याची व पैशाची समृद्धी निर्माण केली आहे. या कामांच्या काळातच त्यांच्या संस्थेत सिव्हिल इंजिनिअर, एग्रीकल्चर ऑफिसर, आरोग्य अधिकारी यांची नेमणूक झाली. त्यांच्या माध्यमातून वंचितांसाठी सर्वांगीण सेवेचे काम आजही सुरू आहे.

**कुरण संवर्धनातून जलसंवर्धन :**

वर चर्चील्या गेलेल्या कामांपेक्षा वेगळे पण फार महत्वाचे काम ही जयाजीरावांनी त्यांच्या उगमच्या माध्यमातून केले आहे ते म्हणजे कुरण संवर्धन व त्यातून जलसंवर्धन, जैवविविधता संवर्धन आणि लोकांचे अर्थ संवर्धन !!

२००८ मध्ये आदरणीय शास्त्रज्ञ, पर्यावरण तज्ञ माधवराव गाडगीळ यांनी भारतातील विशेषतः महाराष्ट्रातील दुर्मिळ व दुर्लक्षित परीसंस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी काम सुरू केले. त्यासाठी त्यांनी भरपूर भ्रमंती केली, खूप लोकांना, संस्थांना ते भेटले. त्यांनी पर्यावरण संरक्षण म्हणजे आठ प्रमुख परीसंस्थांचे संरक्षण व संवर्धन असे सांगितले.१ जंगले २.कुरणे ३.स्थानिक पिके (बियाणे )४.पशु ५. गोड्या पाण्यातील जलचर ६.समुद्रातील जलचर ७. इ.

जगात व महाराष्ट्रातही एकूणच अनेक ठिकाणी कुरणे असलेली जमिन पीक लागवडीखाली आल्याने गवत कमी झाले .त्यामुळे जैव विविधता कमी होत आहे. परंतु हा प्रश्न केवळ जैवविविधतेच्या ऱ्हासाचा नाही तर शेतीवरही त्यामुळे दीर्घकालीन दुष्परिणाम करणारा आहे. या कुरण पट्ट्यातील गवत विविधता राखूनही शेतकऱ्यांना आपत्कालीन आणि दीर्घकालीन फायदा मिळू शकेल का याचा अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासन, राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग आणि भारतीय विज्ञान शिक्षण व संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाराष्ट्र जनुक कोष' या कार्यक्रमाच्या अंतर्गत हे काम करायचे होते. गवतावर व कुरणांवर काम करण्यासाठी माधवराव गाडगीळ वाशिम व हिंगोली जिल्ह्यात संस्था आणि व्यक्तींच्या शोधात होते, त्यावेळी जयाजी पाईकराव व त्यांची संस्था उगम याबद्दल माहिती मिळाली. मग त्यांच्या विषयी खात्री करून घेऊन त्यांनी 'उगम' वर कुरण परिसंस्था संवर्धनाचे काम सोपवले. अर्थात ह्या सगळ्या ऐच्छीक गोष्टी असतात. पण तरीही उगम ने हे काम आव्हान म्हणून स्वीकारले. जयाजीराव यांनी या कामाची उत्तम आखणी व सुरुवात केली.. पुढच्या टप्प्यात उगम

मधील कार्यकर्ते विकास कांबळे व धनंजय पडघन यांनी काम पुढे नेले.

जयाजीराव कॉलेज जीवनापासूनच सामाजिक कामात होते. आजवर तीस वर्षे लोकांमध्येच वावरत असल्याने लोकमानस त्यांना चांगलेच ठाऊक होते. परिसंस्था पर्यावरण व त्यांचे रक्षण हे मुद्दे लोकांना भावणारे नाहीत. त्याऐवजी कुरण राखण्यात त्यांचा आर्थिक फायदा काय आहे हे पटवण्यात जर यश मिळाले तरच कुरण संवर्धन होईल याबद्दल त्यांना खात्री होती आणि ते खरेच होते.

यासाठी पाच वर्षे मुदतीचा कार्यक्रम आखला गेला. त्यात विविध उपक्रमांचा समावेश होता यात जयाजीराव व त्यांच्या संस्थेतील लोकांनी याची शास्त्रीय माहिती तसेच काय काय काम करता येऊ शकते याचे प्रशिक्षण घेतले. शेतकरी, पशुपालक, शेळी मेंढीपालक व मुख्य म्हणजे विद्यार्थी या सर्व घटकांचा प्रबोधनासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले व त्यासाठी कल्पकता ही वापरली गेली. हे प्रबोधनासाठी केलेल्या उपायांचा वापर व त्याचा उहापोह याच अंकात स्वतंत्र लेखात केला आहे जरूर तो लेख वाचावा.तसेच ह्या कुरण जवळ संवर्धनाचे उपक्रमात खूप महत्त्वाची भूमिका बजावली ती प्राथमिक शाळेतल्या पहिली ते सातवीच्या मुलांनी !! ती कशी बजावली याविषयीच्या रंगतदार माहितीसाठी आणखी एक स्वतंत्र लेख ही याच अंकात लिहिला आहे, दोन्ही लेख आपल्या माहीतीत नक्की मोलाची भर घालतील हे नक्की

लोकसहभागातून कुरण संवर्धन व त्यामुळे घडलेले जलसंवर्धन हा महाराष्ट्र, भारत व जगाला मार्गदर्शक असा प्रकल्प ठरला आहे . त्या कामाने सामाजिक कामाला विविध आयाम दिले आहेत. यातले टप्पे थोडक्यात वर्णन करायचे झाले तर आधी मन संवर्धन त्यातून ज्ञान संवर्धन... तण संवर्धन.... मृदा पाणी संवर्धन ...कुरण संवर्धन... पशुसंवर्धन.... जैवविविधता संवर्धन...!! संवर्धनाची अशी मोठी साखळी निर्माण झाली आहे .हा जैवविविधता व दुर्मिळ परिसंस्था टिकवण्याचा महामार्ग जयाजीराव यांनी सामान्य माणसांना बरोबर घेऊन तयार केला आहे आणि तो दीर्घ काळ टिकणारा आहे.

**प्राण्यांच्या पाण्यासाठी हौदांची निर्मिती :**

जैवविविधतेच्या संवर्धनाच्या चर्चांमधून रानातल्या जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय करण्याच्या गरजेचा प्रश्न समोर आला. साधारणतः पाण्याच्या स्त्रोताच्या जवळ मनुष्य वस्ती असते किंवा पाण्याचे स्रोत गावात किंवा गावाच्या अगदी जवळ असतात. वन्यजीव बऱ्याचदा रात्री पाणी पिण्यासाठी येत असतात. त्यामुळे त्यांना गावातली कुत्री वस्ती जवळ येऊ देत नाहीत.त्यामुळे हरीण, ससे ,मोर ,कोल्हे या व अशा वन्यप्राण्यांचे पिण्याच्या पाण्याचे हाल होतात. यावर उपाय म्हणून रानात ,डोंगरात पाण्यासाठी हौद बांधण्यात आले. यासाठी लोकांचा सहभाग मिळवला. कोणी शेतातली जागा दिली तर कोणी रोज त्या हौदात पाणी सोडण्याची जबाबदारी उचलली. अनेकांनी हौद बांधताना श्रमदानही केले. असे पहिल्या टप्प्यात १५ गावात १५ हौद लोकांच्या मागणीवरून बांधून घेण्यात आले. त्या हौदावर दिवसा पाळीव प्राणी, चरायला गेलेली गुरे व रात्री वन्य प्राणी पाणी पितात. दिवसा पक्षीही खूप मोठ्या प्रमाणात पाणी पिण्यासाठी हजेरी लावतात .यासाठी जर्मनीतील 'टेरेडस' या संस्थेने काही प्रमाणात आर्थिक मदत केली होती. संवेदनशील जयाजीरावांनी व त्यांच्या उगम ने गवत, पशू ,माणसं याबरोबरच वन्य प्राण्यांचेही संवर्धनास या निमित्ताने हातभार लावला आहे.

**सेंद्रीय शेतीतून जलसंवर्धन :**

सेंद्रिय शेतीच्या पुनर्जीवन चळवळीचे उद्गाते व गाढे अभ्यासक औरंगाबादचे डॉक्टर डॅनियल अलेक्झांडर यांच्या आवाहनाला व सहकार्याला प्रतिसाद देऊन जयाजी रावांनी १९९५ मध्ये हिंगोली सारख्या मागास जिल्ह्यात सेंद्रिय शेतीची चळवळ सुरू केली रुजवली व आता तर ती चांगलीच फोफावली आहे. हरितक्रांतीने धनधान्याच्या मुबलकतेचा वर दिला पण त्याचबरोबर कीटकनाशके, हायब्रिड बियाणे व रासायनिक खत वापराचा शापही दिला हे कालांतराने सिद्ध झाले. ऐंशी–नव्वदच्या दशकात डॉक्टर डॅनियल यांच्यासारख्या अभ्यासकांनी हा विरोधाभास पुढे आणला .सेंद्रिय शेतीचे महात्म्य आता सर्वच गाऊ लागले आहेत पण १९९५मध्ये हिंगोलीतील दरिद्री शेतकर्यांच्या गळी उतरवणे खरंच खूप मोठे आव्हान होते, पण तेही जयाजींनी लीलया पेलले असे म्हणावे लागेल. त्यांनी यासाठी महिलांचे गट उभारले, त्यांना सेंद्रीय शेतीचे महत्त्व पटवले आणि प्रशिक्षण ही दिले. यापुढे जाऊन सेंद्रिय मालाला छोट्या–छोट्या बाजारपेठा तयार करण्यासाठी मदत केली. हिंगोली शहर व तालुक्याच्या गावी सरकारी कर्मचाऱ्यांच्या वसाहती मध्ये जाऊन सेंद्रिय शेतमालाचा प्रसार व विक्री केली व हळूहळू या वसाहतीमध्ये किंवा समोरच बाजार भरणे सुरू केले. या सर्वांमधून एक छान खरीददार व विक्रेते यांची साखळी उभी राहिली. सेंद्रीय शेतमालाची चळवळ हिंगोलीत आज चांगली स्थिरावली आहे असे म्हणता येईल. सेंद्रिय शेतीचा जलसंवर्धनाची घनिष्ठ संबंध आहे. सेंद्रिय खत म्हणजे कुजलेले बायोमास. यामुळे जमिनीवर आच्छादन राहते, बाष्पीभवन कमी होते. बायोमास मुळे जमिनीची पाणी धारण क्षमता वाढलेली राहते. या दोन्हीमुळे तुलनेने सेंद्रिय शेतीला पाणी बरेच कमी लागते. तसेच असलेल्या पाण्याचे बाष्पीभवन कमी प्रमाणात होत असल्यामुळे पिकाला दिलेले पाणी बराच काळ पुरते. तसेच गांडूळ व गांडूळ खताच्या वापराने जमिनीत गांडूळांची संख्या वाढते. त्यांच्या वर खाली जमीन पोखरत जाण्यामुळे जमीन नैसर्गिक रित्या भुसभुशीत होते .यामुळे जमिनीची पाणी शोषण्याची व क्षमता वाढते. भरपूर पाऊस आला तरी पाणी वाहणे ऐवजी जमिनीत मुरते. हे अप्रत्यक्ष का होईना जलसंवर्धनाचेच काम आहे .

सेंद्रिय शेतीचे प्रशिक्षण आजवर दहा हजार व्यक्तींनी घेतले आहे. सेंद्रीय शेतीमालाच्या उत्पादन, विक्री बाजार या शाखेत मात्र पाचशे महिला गेली दहा वर्षे कार्यरत आहेत.

**मोठे स्वप्न... आवाक्यातली संकल्पना... व्यवहारिक उत्तर ...**

चार पाणलोट क्षेत्र विकासाची यशस्विता, ३१७ हेक्टरचे लोकसहभागातून कुरण संवर्धन, त्यातून साधले जाणारे जलसंवर्धन आणि यातून १५ गावांची जलसमृद्धी या सर्वांमुळे जयाजी रावांचा सत्तरीतही तरुणांना लाजवेल असा उत्साह सळसळला. ..त्यांनी स्वप्न पाहिलं आणि संकल्प केला की ९९ किलोमीटर लांबीची पूर्ण कयाधू नदीचे पुनरुज्जीवन करण्याचा ! तेही नदीपात्रात कोणतेही काम न करता !! नदीच्या ११ उप नाल्यांच्या पाणलोटात काम करून झरे पाझरु द्यायचे ...त्यातून ओढे–नाले पाण्याने खळखळत राहतील.... ते सर्व नदीला येऊन मिळतील... आणि नदी ही बारा महिने वाहत राहील.... पाणलोटात जास्तीत जास्त पाणी जिरल्याने व साठवल्याने पुराची

तीव्रताही खूप कमी होईल, असे अनेक फायदे... यासाठी पूर्ण पाणलोट क्षेत्रात तीन लाख हेक्टरवर काम करणे आवश्यक आहे .या आणि अशा कामांचा व इतर माहितीसाठी चा अभ्यास सर्व्हे यानिमित्ताने केला गेला. जयाजी रावांच्या शब्दाला इतकी किंमत व आदर की 'इडलगिव्ह' या कंपनीने केवळ या प्रकल्पच्या पूर्व सर्वेक्षणासाठी सीएसआर निधी दिला. सर्वे किंवा अभ्यासासाठी सीएसआर ने पैसे खर्च करणे हे दुर्मिळ उदाहरण आहे. याच दरम्यान जयाजीराव यांची एका समारंभात राजेंद्र सिंहजी यांची भेट झाली असताना त्या चर्चेत त्यांनी नदी पुनरूज्जीवनावर काम करण्यापूर्वी नदीची परिक्रमा करण्यात करावयास सांगितले. जयाजीराव यांनी ही सूचना शिरसावंद्य मानत दहा दिवसांची आपल्या कार्यकर्त्यांसह पदयात्रा केली. नदीच्या काठावरच नाही तर नदीच्या पाणलोट क्षेत्रात असलेल्या १५४ गावात त्यांच्या नेतृत्वाखाली शंभरपेक्षा अधिक कार्यकर्त्यांनी लोकांची भेट घेतली. त्या प्रत्येक गावातील प्रमुख नागरिक, शेतकरी यांना सोबत घेऊन शिवारफेरी करत गावातील नाल्यांची लांबी, रुंदी, खोली ,विहीर, बोअरवेल ,खडक या सर्वांच्या नोंदी घेत सखोल अभ्यास केला. या सर्वांची मांडणी पुन्हा करून नव्याने आराखडा तयार केला. या जलदिंडी मुळे केवळ सर्व्हेच नव्हे तर जनतेमध्ये कयाधू नदीच्या आजारपणाची कारणे व त्यावरील सामान्यांनी व इतरांनी करावयाचे उपचार यावर प्रबोधन करण्याची संधी साधली गेली. प्रत्येक गावात या जलदिंडी चे स्वागत व निरोपाला गावातील सर्वच लोक सहभागी झाल्याने काही प्रमाणात भावनिक बंधही तयार झाले.तसेच महत्त्वाचे म्हणजे ऐकिवातल्या बाबी, कागदावरच्या बाबी, प्रत्यक्षात असलेल्या बाबी काही ठिकाणी जुळलेल्या दिसल्या तर काही ठिकाणी विसंगती सापडली. नदीपात्रातील वाळू चा व मातीचा अनधिकृत उपसा, नदीपात्रातील बोरवेल्स ठिकठिकाणी येणारे गावचे सांडपाणी, इतर कचऱ्याची नदीत लावलेली विल्हेवाट, नदीतले शेतीचे अतिक्रमण या आणि अशा अनेक गोष्टींची ही नोंद या निमित्ताने झाली. त्याचा नियोजनाच्या अजुकतेत नक्कीच फायदा झाला. या जलदिंडी ची दखल तत्कालीन जिल्हाधिकारी तसेच हिंगोलीचे तत्कालीन खासदार राजीव सातव यांनीही घेतली.

या अभ्यासातून माहिती पुढे आली की पूर्ण कयाधू नदीच्या पुनरूज्जीवनाला साडेतीनशे कोटी रुपयांपर्यंत खर्च येईल. आता हे पैसे कोणत्याही माध्यमातून उभे करणे केवळ अशक्य. शासकीय निधी, सीएसआर किंवा इतर कोणत्याही माध्यमातून ते शक्य नाही. पण ज्या माणसाने चौथीत असताना पैसे कमवण्यासाठी आईस कांडी विकण्याचा व्यवसाय केला, कॉलेजच्या अभ्यासक्रमासाठी प्रोजेक्ट करता करता शेकडो कुटुंबांना मुंबईतले राहणे व जगण्यासाठीचे मार्ग मिळवून दिले, रोजगार हमी योजना, सेंद्रीय शेती, पाणलोट क्षेत्र विकास यातून हजारोंना रोजगार मिळवून दिला त्याच्याकडे इतक्या वर्षांच्या अनुभवाने असे काही व्यावहारिक उत्तर तयार होतेच. मनरेगाच्या(महात्मा गांधी ग्रामिण रोजगार योजना) माध्यमातून गावोगावच्या लोकांना किंवा मजुरांना हाताला काम देता येईल. त्यातून त्याच्या गावचा पाणलोटाचा विकास करता येईल. असा एकत्रित सर्व पाणलोटाचा विकास पूर्ण करून पूर्ण कयाधू च्या पाणलोटाचा विकास साधता येणे शक्य आहे. एका परिषदेत त्यांनी मांडलेला हा मुद्दा मनरेगा चे महाराष्ट्र राज्याचे सचिव माननीय नंदकुमार साहेबांनी ऐकला .त्यांना तो खूपच भावला . त्यांनी या कल्पनेला उचलून धरले. त्यासाठी शासकीय धोरणात काही त्रुटी दूर केल्या व काही कलमं नव्याने टाकले. आता कयाधूच्या भूमिपुत्रांचे कष्ट, शासनाचे अर्थ सहाय्य आणि जयाजीराव व त्यांचा उगम टीमचे नेतृत्व आणि व्यवस्थापन यातून जगातला पहिला शाश्वत ,भव्य-दिव्य मोठी उपलब्धी देणारा, कयाधू नदी पुनरुज्जीवनाचा प्रकल्प लवकरच सुरू होणार आहे. हे यशस्वी होणारच !! कयाधू ला पाझर येणारच .....माझ्या हयातीतच माझी प्रतिज्ञा पूर्ण होईलच !! जयाजींची पस्तीस चाळीस वर्षाची वाटचाल पाहता त्यांना ओळखणाऱ्या हे अजिबात अशक्य वाटत नाही.

**जमीन अधिकार अंदोलन व अनिक फायनान्स :**

समाज समृद्धीसाठी ची एक महत्त्वाचे मोठे काम जयाजीरावांनी त्यांच्या समविचारी कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन करून ठेवले ते पाण्यासंबंधी नसले तरी शेतीसंबंधी व तिच्या अर्थकारण याविषयी आहे ते नमूद करायलाच हवे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विनंतीवजा सूचनेनुसार १९४७ मध्ये शेवटच्या निजामाने हैदराबाद स्टेट मधील गावांची गायराने वंचित समाजाला कसण्यासाठी मालकीहक्क सहित देण्याचे फर्मान काढून ते गावातल्या तत्कालीन कारभाऱ्यांना अंमलबजावणी करण्यास सांगितले. पण हे हस्तांतर इतके सोपे नव्हते. प्रस्थापित लोक गायरान चा ताबा त्या वेळी कुणालाही द्यायला तयार नव्हते. गायरानाचा ताबा त्यावेळी मिळवण्यासाठी बराच संघर्ष करावा लागला. पुढे तो ताबा वंचितांना मिळाला पण तरीही ते कसत असलेल्या जमिनी चाळीस-पन्नास वर्षानंतरही त्यांच्या नावे होत नव्हत्या. त्यामुळे अनेक शासकीय अनुदाने, सोयी-सवलती मिळण्यापासून ही हे लोक वंचित होते. ते पुन्हा स्थानिक सावकार व इतर मोठ्या शेतकऱ्यांवर अवलंबून होते. यातून खूप शोषण त्यांचे होते. हा प्रश्न मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातील अनेक गावांमध्ये होता. या विषयावर विश्वनाथ तोडकर( उस्मानाबाद ),रमेश भिसे (परभणी), एकनाथराव आव्हाड (बीड ),यांच्या सोबतीने जयाजीराव यांनी काम उभे केले व हिंगोली सहित अनेक जिल्ह्यातील गावांच्या या जमीन अधिकार आंदोलनातून वंचितांना मालकी हक्क मिळवून दिले. इतकच नाही तर ह्या जमीन धारकांना पीक कर्ज व इतर व्यवसाय कर्ज मिळण्यासाठी बँकेला समांतर अशी 'अनिक फायनान्स कंपनी लिमिटेड' काढली . या कंपनीतून बचत गटाच्या माध्यमातून वंचित घटकांना भांडवल कर्ज रूपाने उपलब्ध करून दिले आहे. शिस्तबद्ध व नियमांना बांधील राहून संस्था चालवल्याने संस्थेची उलाढाल दहा वर्षात पंधरा कोटी वर गेली आहे.

जयाजीराव यांच्या पत्नी सौ सुशीलाताई या लौकिकार्थाने दहावी शिकलेल्या असल्या तरी लग्न झाल्यावर त्यांनी महिला सबलीकरणासाठी अनेक शिबिरांमधून स्वतः प्रशिक्षणे घेतली. त्यातून एक बाणेदार, स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची , जयाजीराव यांच्या विचार व समाज कार्यासाठी एक भक्कम कार्यकर्त्याची व प्रसंगी नेतृत्वाची ही निर्मिती झाली, हे मुद्दाम नमूद करायलाच हवे. सौ सुशीला ताई एक उत्तम वाचक असून कवयत्री ही आहेत. त्यांचा 'रानभाज्या' हा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला आहे. इतकेच काय त्यांचे चिरंजीव सुशांत हे ही TISS मधून प्रशिक्षण पूर्ण करून हिंगोली जिल्ह्यातच समाज कल्याण च्या कामासाठी उगम च्या माध्यमातून आपले आयुष्य वेचायला सिद्ध झाले आहे.

समाजसेवेचे व्रत दुसऱ्या पिढीने पुढे नेणे याची दुर्मिळ उदाहरणे आहेत पण या दुर्मीळतेतही जयाजीराव आहेतच !!
ढगाआडच्या ताऱ्याचे तळपणे लोकांच्या दृष्टीस पडावे म्हणून हा लेखप्रपंच !!

*****

## पुस्तक परिचय – कयाधूचे जे पी

**प्रोफेसर वंदना चक्रबर्ती**

'कयाधूचे जे पी' हे पुस्तक काळमनूरच्या श्री. जयाजी पाईकरावांची आत्मकथा सांगणारे एक अत्यंत वाचनीय पुस्तक आहे. डॉक्टर दुर्गादास रोड्यांनी शब्दबद्ध केलेल्या आत्मकथा लेखनात एक सहजता आढळुन येते जी मनाला भावते. कुठल्याही प्रसंगाच्या वर्णनात भडकपणा दिसत नाही. सामाजिक परिवर्तनाच्या कार्यात स्वतःला झोकून दिलेल्या कार्यकर्त्याने स्वतःच्याच वैयक्तिक आणि कार्यात्मक प्रवासाचे अवलोकन ह्या पुस्तकात केले आहे. स्वयंसेवी क्षेत्राशी निगडित असलेल्या वाचकांसाठी तर हे पुस्तक दिशादर्शक ठरेलच, पण ह्या उपर सामाजिक परिवर्तनामध्ये रुची असलेल्या प्रत्येक व्यक्तीला हे पुस्तक नक्कीच वाचावेसे वाटेल.

पाईकरावानी शिक्षणासाठी केलेली धडपड व त्यांचा 'मोळीविक्या ते लाऊडस्पीकरवाला' हा प्रवास हृदयाला स्पर्श करून जातो. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत प्रवेश घेताना आलेल्या अडचणी आणि त्यांच्या वागण्याबोलण्यातून व्यक्त होणारा  प्रामाणिकपणा व समाजकार्याविषयी प्रचंड ओढ, पाईकरावांना मदत करण्यासाठी अनेकांना प्रवृत्त करतात. त्यांनी जोपासलेला मित्रपरिवार हीच त्यांची खरी समृद्धी. प्रत्येकवेळी कठीण परिस्थितीवर मात करण्यासाठी त्यांच्या समवेत माणसं उभी राहताना दिसतात. त्यांचा लोकसंग्रह निश्चितच जबरदस्त आहे.

आयुष्याच्या प्रत्येक पडावात पाईकरावांनी स्वतःला झोकून देऊन काम केलं. टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत क्षेत्रीय अनुभवासाठी पाईकराव लालडोंगरीवर जात होते. तेथे स्थलांतरित लोकांच्या वस्तीत अतिक्रमण नियमित करण्याला प्राधान्य देऊन मूलभूत गरजा तेथील रहिवाश्यांपर्यंत पोहोचवायच्या आव्हानात्मक कार्यात पाईकरावांचा मोठा सहभाग होता. विद्यार्थीदशेतील हा अनुभव पुढे त्यांना मराठवाड्यात काम करीत असताना कामी आला. समाज सेवेच्या विद्यार्थ्यांना विद्यार्थी दशेत काय साद्ध्य होऊ शकते ह्याचा बोध वर्तमान काळातील विद्यार्थ्यांना पाईकरावांच्या पुस्तकातून निश्चितच मिळेल.

'कयाधूचे जे पी' ह्या पुस्तकामध्ये त्यांच्या खाजगी आयुष्यातील सुशीलताईं बरोबरचा प्रवास ही तितकाच रुचकर आहे. सुखदुःख वाटून घेणारी, कौटुंबिक जबाबदाऱ्या पेलणारी, समाज सेवेला प्राधान्य देणारी सहचरिणी पाईकरावांना लाभली ही मोठी भाग्याची गोष्ट आहे. गरिबी, नवजात शिशु गेल्याचे दुःख, कुटुंबापासुन लांब राहण्याबाबत खेद व इतर अनेक समस्यांना तोंड देत पाईकराव अभ्यासातही लक्ष देत होते. पदवी घेतल्या नंतरही आपल्या शिक्षणाचा उपयोग मराठवाड्याचा मागासलेपणा दूर करण्यासाठी करायचा निश्चय पाईकराव विसरले नाहीत.

पाईकरावांच्या कार्य जीवनाचा प्रवास या पुस्तकात अतिशय विचारपूर्वक आणि प्रामाणिकपणे मांडला आहे. समाज सेवेच्या विद्यार्थ्यांसाठी हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो. समर्थपणे उभी असलेली संस्था कधीतरी गैरसमज, संशय, अविश्वासाने ग्रासली जाते व संस्थेच्या प्रवर्तकालाच संस्थेतुन बाहेर पडावे लागते. पण एवढ्या मोठ्या धक्क्यानेही पाईकराव खचत नाहीत. नव्या जोमाने नवी कामे हाती घेतात आणि लोकांच्या मदतीने पूर्वीपेक्षाही सशक्त संस्था उभ्या करतात. संस्था परिपक्व होतात, त्यातील कामाचा व्याप वाढतो, संस्थेला जोडलेली माणसेही विकसित होतात. ह्या प्रवासाचा तपशील वाचकाला खरोखरच गुंग करून टाकणारा आहे.

कयाधू ग्राम विकास प्रतिष्ठान, माहेर, उगम ग्रामीण विकास संस्था, आणिक फिनान्शिअल सर्विस, महिला बँक, बचत गट, इत्यादीच्या माध्यमातून पर्यावरण, शेती, महिला सक्षमीकरण, स्वच्छता व सामाजिक विकासाचे उल्लेखनीय कार्य पाईकराव  करीत आहेत. समाजासाठी कार्य करायला इच्छुक असलेले नाना क्षेत्रातले विविध देशातले लोक पाईकरावांकडे अनुभव घेण्यासाठी येतात. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या MSW व MA च्या विद्यार्थिनी उगम ग्रामीण विकास संस्थेत ग्रामीण विकासाचा अनुभव घेण्यासाठी दोन आठवडे राहून गेल्या. हा अनुभव त्यांना खूप काही शिकवून गेला.

मला खात्री आहे की ग्रामीण समाजाचा अभ्यास करणारे, समाज सेवेत रुची असलेले, स्वयंसेवी संस्थांशी निगडित किंबहुना एकंदरीतच सामाजिक विकासाविषयी चौकस असलेले लोक या पुस्तकाचे स्वागत करतील व हे पुस्तक आवर्जुन वाचतील.

पाईकरावांचे कार्य जोमाने चालू आहे. आता त्यांची पुढची पिढी समाज सेवेचे शिक्षण घेऊन त्यांच्या कार्यात समरस झाली आहे. मराठवाड्याचा मागासलेपणा दूर करण्यासाठी त्यांनी राबविलेल्या नानाविध प्रकल्पांना व भावी योजनांना यश मिळो अशी मी मनोभावे कामना करते.

# व्यक्तीगत परिचय : श्री जयाजी पाईकराव

**श्री. रमाकांत बापू कुलकर्णी**

**मो : ९८८१७००३३२**

काही माणसाचं कर्तुत्व एवढ बहुआयामी असतं की त्याला शब्दात बांधताना शब्दच थिटे पडतात तसाच काहीसा अनुभव मला हे लिहताना आला. पाईकरावांचा आणि माझा परिचय साधारण १९८८ पासूनचा. पाईकराव तेंव्हा कयाधू या संस्थेचे सर्वेसर्वा होते. निदान मलातरी एवढेच माहिती होते. कळमनुरी हिंगोली रोडवर कळमनुरी पासून चार पाच किलो मिटर अंतरांवर कयाधू संस्थेच्या ऑफिसची इमारत होती. तिथूनच त्याच काम चालत असे. पाईकरावांची कयाधूसंस्था अशीच या संस्थेची ओळख होती.

जमिनीवर अत्यंत चांगलं काम करणारा सामाजिक कार्यकर्ता म्हणून त्यांची ओळख होती, आजही ती ओळख तशीच अबाधित आहे. ग्रामीण विकासामध्ये त्यांनी संस्थेला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले होते. त्यावेळी मी परभणी जिल्ह्यांत नुकतेच सामाजिक कार्यकर्ता म्हणून कामाला सुरुवात केली होती. पाईकरावांची कयाधू संस्था परभणी जिल्ह्यातच असल्याने त्यांच्या संस्थेच्या दोन कार्यक्रमाला मी आवर्जून उपस्थित होतो. त्यावेळी मी प्रथमच पाईकरावांना पहिले. जमिनीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्याचे मूर्तिमंत प्रतीक असेच ते मला भासले. १९९० – ९१ मध्ये अफार्म चे डॉक्टर घारे यांच्या मार्गदर्शनाखाली मराठवाडा इको ग्रुपची स्थापना झाली. या ग्रुपमध्ये मी आणि पाईकराव आम्ही दोघेही होतो. या ग्रुप अंतर्गत पाणलोट क्षेत्र विकासासाठी कामे करणे आणि मराठवाड्याचा दुष्काळ कृती कार्यक्रमातून घालवणे हे उद्दिष्ट घेऊन आम्ही कामाला लागलो. या काळात पाईकरावानी त्यांच्या कार्यक्षेत्रा मध्ये अत्यंत उत्कृष्ट काम केले. पाईकराव म्हणजे उत्साहाचा वाहता झरा असं म्हटलं तर ते चुकीचं होऊ नये. पाणलोट क्षेत्र विकासाचा त्या काळात त्यांनी ध्यास घेतलेला होता. ग्रुपच्या बैठकांमध्ये त्यांनी केलेल्या कामाची अत्यंत उत्साहात मांडणी करायचे. .

कयाधू ही पाईकरावांचीच संस्था बहरात असताना अचानक एक दिवस पाईकरावांनी कयाधू संस्था सोडली हे कानावर आले. एवढ्या नावारूपाला आलेल्या संस्थेचा कारभार स्वतःच्या हाताने इतरांकडे सोपवून पाईकराव बाहेर पडले पण ते थांबले नाहीत. जमिनीवर सातत्याने लोकांमध्ये काम करण्याचं व्यसन जडलेला हाडाचा सामाजिक कार्यकर्ता, कधीच स्वस्थ बसणार नाही, तसे पाईकराव ही स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी खऱ्याअर्थाने स्वताची उगम नावाची संस्था सुरू केली. अल्प कालावधीतच त्याने संस्थेचं बस्तान बसवले आणि उगमचे पाईकराव हे नवीन नामाभिधान महाराष्ट्रातील स्वयंसेवी जगताने त्यांना बहाल केल. महिला बचत गटांच अत्यंत उत्कृष्ट काम त्याने माविम सोबत केलं मराठवाड्याचे ते प्रमुखही झाले. मागासजाती जमाती भटके विमुक्त व आदिवासीच्या अजिविकेचा मुद्दा असेल, बचत गटाच्या माध्यमातून महिलांना कुटूंबातल्या निर्णय प्रकियेच्या मुख्यप्रवाहात स्थान मिळून देणं असेल. पाणलोट क्षेत्र विकास असेल, जल साक्षरता असेल किंवा कयाधू नदीच्या खोऱ्यातील पारंपारिक स्थानिक गवतांच्या जातीचे जतन व संवर्धन त्यांनी अगदी मन:पूर्वक केले आणि त्याबद्दल स्वयंसेवी जगदाला भरभरून सांगितले. असे अनेक प्रकल्प साकारत असताना कयाधू नदी चा ध्यास त्यांनीकधीच सोडला नाही. ओसंडून वाहणारा उत्साह आणि कुठल्याही परिस्थितीत हसतमुख राहण्याचं वरदान निसर्गानेच त्यांना बहाल केलं होतं

सेंद्रिय शेती हा त्यांचा हातखंडाचा विषय सेंद्रिय धान्य आणि भाजीपाला निर्मिती तर त्यांनी लोकांना करायला लावलीच पण त्याच बरोबर त्याच्या मार्केटिंगची सोय करण्यासाठी त्यांनी सेंद्रिय धान्य व भाजीपाल्याचा आठवडी बाजार भरवायला सुरुवात केली. रानभाज्या दशपर्णी गांडूळखत हे त्यांच्या नित्याच्या बोलण्याचे विषय, रानभाज्यांची ओळख ग्रामीण आणि निमशहरी समाजाला व्हावी यासाठी ते रानभाज्यांचे प्रदर्शनही भरवत .

त्यांच्या सहवासात येणारा माणूस त्यांच्यापासून कधीच तूटला नाही. हे त्यांच्या स्वभावाचे वैशिष्ट्य त्यांना फोन करून नमस्कार असं म्हणावं तर समोरून सप्रेम नमस्कार हे अत्यंत उत्साही आणि आनंदी असं वाक्य कानावर पडत आणि आपुलकीचा एक वेगळा धागा ते आपल्याशी जोडून जातात. संभाषण संपताना तो समोरचा माणूस केंव्हाच त्यांचा होऊन गेलेला असतो. हे त्यांच्या स्वभावाचे वेगळेपण आहे म्हणूनच ते कदाचित माझे खूप जवळचे मित्र झाले. त्यांच्या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात त्यांनी मला प्रमुख पाहुण्या पैकी एक बनवले आणि आमचं नातं अधिकच दृढ करून टाकलं.

पाईकराव म्हणजे उत्साहाचा वाहता झरा असं म्हटलं तर ते चुकीचं होऊ नये हाच अनुभव आम्ही दुष्काळ हटवू माणूस जगवू या पदयात्रेमध्ये घेतला आणि अनुभवला. पाईकराव यांची संस्था पॅक्स प्रोग्रामची सहभागी संस्था नसतानाही त्यांनी त्यांच्या हिंगोली जिल्ह्यातील दहा दिवसाच्या पदयात्रेचे स्थानिक नियोजन त्यांनी स्वयंप्रेरणेने स्वीकारले होते. एखाद्या कार्यक्रमाची जबाबदारी पाईकराव स्वीकारतात तेव्हा त्याच नियोजन भव्य दिव्यच असते आणि ते नियोजन पूर्णत्वात उतरवण्यासाठी ते जीवाचं रान करतात, हे त्याच्या रक्तातच आहे .

अशावेळी किती पदरमोड करावी लागेल याचा ते कधीच विचार करत नाहीत. याचा अनुभव आम्हाला या पदयात्रेत आला. दहा दिवसाच्या मुक्कामाची आणि पदयात्रेची नुसती व्यवस्था त्यांनी स्वतःकडे घेतली नाही तर या पदयात्रेच्या मुक्कामात वेगवेगळ्या गावी वेग वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा त्यांनी सपाटा लावला होता. प्रत्येक कार्यक्रमात वेगळेपण कसे आणता येईल याचा त्यांनी जणू ध्यासच घेतला होता. म्हणूनच त्यांच्या प्रत्येक गावात काहीतरी वेगळा कार्यक्रम आम्हाला पाहायला आणि अनुभवायला मिळाला. गिरी नावाच्या लोककलावंतच्या कार्यक्रमाचे आयोजन करून गाव सभेसाठी संपुर्ण गावच उपस्थित राहील याची व्यवस्था त्यांनी केली होती. त्याच बरोबर सत्यपाल महाराजांसारख्या दिग्गज कलावंतांला एका गावात निमंत्रित करून त्या दिवशीच्या गावसभेला पंचक्रोशीतील अडीच ते तीन हजार लोक उपस्थित होतील अशी व्यवस्था केली. सत्यपाल महाराजांनी पदयात्रा का ? व कश्यासाठी याची उत्कृष्ट पार्श्वभूमी आधीच तयार करून ठेवली होती. त्या तीन हजार लोकांसमोर पदयात्रींचा प्रतिनिधी म्हणून मला विचार मांडण्याची संधी पदयात्रींनी दिली. ३००० लोकांसमोर मी भरभरून बोललो .

एका गावात गांधी विचाराचे आणि सर्वोदयाचे मोठे नेते आदरणीय गंगाप्रसादजी अग्रवाल यांनाच पाईकरावानी निमंत्रित केले होते. गंगाप्रसाद अग्रवाल म्हणजे सर्वोदय आणि गांधीविचाराचे राज्यव्यापी व्यक्तिमत्व होते. त्यांनी पदयात्रेमध्ये दोन दिवस उपस्थिती लावली. त्याच आमच्या सोबत पदयात्रेत चालणं ऐतिहासिक तर होतेच, पण त्याच्या भाषणातूनमिळालेल्या ज्ञानाने आम्हाला अधिकच समृद्ध केले.

हिंगोली जिल्ह्यामध्ये वेळोवेळी गावोगावी पदयात्रीमध्ये सहकुटुंब सहभागी हेतून त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीचं वेगळेपण दाखवून दिले.

या दहा दिवसाच्या कालावधीत त्यांनी बचत गटाच्या महिलांच्या साह्याने आमची गावोगावी चोख व्यवस्था केली होती प्रत्येक कामात लोकसहभाग घेण्याच्या त्यांच्या पध्द्तीने पाईकरावांनात्यांच्या कार्यक्षेत्रात असलेली लोकमान्यता आम्हाला पहायला आणि अनुभवायला मिळाली .

हिंगोली जिल्ह्यातील आमची दुष्काळ हटवून माणूस जगवू ही पदयात्रा अत्यंत देखण्या पद्धतीने आणि उत्कृष्ट पूर्वनियोजनानी अक्षरशा गाजवली.

सामाजिक कार्यकर्त्याला कार्यक्षेत्रामध्ये लोकमान्यता असं हे त्यांच्या कामाचं फलित पण प्रशासकीय यंत्रणेने मध्येही त्यांना तेवढीच मान्यता असणं हे पाईकरावांच्या कामकरण्याच्या पध्द्तीतलं वेगळेपण आहे. उगम ही संस्था जरी पाईकरावांची आहे तशी ती प्रशासनातील कलेक्टर कचेरी, जिल्हा परिषद, पंचायत समिती, यांची सुद्धा आहे. सर्व स्तरावरच्या प्रशासकीय यंत्रणेला आपलं करण्याचे अफलातून तंत्र पाईकराव यांनी आत्मसात केलेल आहे. शासकीय प्रकल्प उगमसंस्थेला मागावे लागत नाहीत. प्रशासकीय यंत्रणा त्यांना आपल्याला हे काम करायचं आहे म्हणून बोलावून घेते. हे त्यांच्या संबंधातले वेगळेपण आहे आणि ते त्यांनी लीलया जपलं आहे.

कयाधू नदीच्या अंगाखांद्यावर वाढलेल्या पाईकरावांना कयाधू नदी संदर्भात काहीतरी करावं हे तेव्हापासून डोक्यात होते..

कयाधू खोऱ्यामधील १०० गावामधून पाईकराव आणि त्यांच्या टीमने पदयात्रा काढली, तेही फक्त लोकलवक्षभागातून गावोगावी राहण्या जेवणाची व्यवस्था तिथल्या स्थानिक लोकप्रतिनिधींनी व स्वयंसेवी कार्यकर्त्यांनी. कयाधू नदीच्या पुनरुज्जीवनाचा महायज्ञ त्यांनी सुरूकेला आहेच. त्याचा पहिला टप्पा म्हणून या नदीखोऱ्यातील शंभर गावाच्या सूक्ष्मपाणलोटा मधून झालेली शासकीय कामे त्यांची आवाजही स्थिती याचा आंखोदेखा हाल कागदावर उतरवला .. त्याची दुरुस्त होऊ शकणारे दुरुस्त करताच येणार नाहीत असे व सुस्थितीत असलेले अशी वर्गवारी करून प्रशासनाला सादर केली. पुनरुज्जीवन पक्रिये संबंधातल्या बारीक सारीक गष्टींचा अभ्यास करून त्यांनी डी. पी. आर. बनवला असल्याने तो अंत्यत शास्त्रशुधद व तंत्रशुद्ध पध्द्तीने तयार झाला आहे. रोजगार हमीचा नवीन कायदा आणि तो राबवण्याच्या संदर्भात प्रशासनाची बदलेली भूमिका लक्ष्यात घेऊन कयाधू खोऱ्यातील सुक्षपाणलोटाची सर्वकाम रोजगार हमीच्या माध्यमातून करण्याचे आणि त्याला आवश्यक तो लोकसहभाग मिळवण्याचे नियोजन केलेले आहे . कुशल कामासाठी लागणारी यंत्रसामुग्री आणि ते पूर्ण कृशकणारे दातेयांची ते भेट घेत आहेत आणि त्यासंदर्भातलं वेळापत्रक तयार करण्यात सध्या ते गुंतले आहेत. एका अर्थानं कयाधू नदी पुनरुज्जीवनाच्या कामात ते पूर्णपणे बुडालेले आहेत असं म्हटलं तर ते अतिशयायोक्तीचें होऊ नये.

कयाधू नदी पुनरुज्जीवनासाठी ४० स्वयंसेवी संस्था त्यांच्यासोबत आहेतच तसेच शंभर गावातील लोकप्रतिनिधी रोहयोची यंत्रणा जलसंपदा आणि पाटबंधारे ग्रामीण विकास यंत्रणा या सर्वांचा अत्यंत चांगला मेळ त्यांनी घातला आहे कयाधू नदी पुनरुज्जीवन ही नुसती चळवळ नसून खऱ्या अर्थाची सर्वसमावेशक लोकचळवळ बनते आहे. त्यात लोक, स्वयंसेवी संस्था, प्रशासकीय यंत्रणा आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांचा सुरेख मेळ जमला आहे त्याचं एकमुखी नेतृत्व पाईकराव करतात यातच सर्व काही आलं.

उगम संस्थेच्या या उंचावत जाणाऱ्या यशाच्या आलेखामध्ये सौ. सुशीला पाईकराव आणि त्यांची टीम यांचा सिहांचा वाटा आहे . सुशीला ताई उच्चशिक्षित नसतीलही तरी कुठल्याही सामाजिक विज्ञान शास्त्राची पदवी घेतलेल्या धारका इतकंच त्याच अनुभवातून घेतलेलं शिक्षण आणि कार्यकर्त्यांच्या खाद्याला खांदा लावून केलेली प्रशिक्षण आणि त्यांचं केलेलं जमिनीवरच काम त्याच अनुभव विश्व अधिक समृद्ध आहे, हेच अनुभवायला मिळत. एकूणच उगमच यश या जोडगोळीचं तर आहेच परंतु त्यापेक्षा जास्त ते उगमाच्या टीमचं आहे. ही उगमाची टीम घडविण्यासाठी पाईकरावांनी घेतलेले कष्ट आणि केलेले संस्कार वादातीत आहेत. कयाधू नदी पुनरुज्जीवनाच्या प्रक्रियेमध्ये जिथेकुठे मला खारीचा सहभाग देता येईल तो मी द्यायला येईन असा शब्द मी पाईकरावांना दिला आहे. तेव्हा ते म्हणाले बापू तुम्हीतर या प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहेत. खरं तर मी याप्रक्रियेसाठी कांहीही केलेले नाही, पण माणसं जोडा त्यांना आपलस करून टाका आणि प्रक्रियेचा भाग बनवा हे तंत्र वापरणं हे त्याच्या स्वभावाचे आणि कार्यपद्धतीचे वेगळे वैशिष्ठ अधोरेखीत झाल्या शिवाय राहात नाही .

# कयाधूचे जे पी

डॉ. दुर्गादास रोडे

पैनगंगा नदीची उपनदी म्हणून ओळखली जाणारी 'कयाधू नदी' महाराष्ट्राच्या हिंगोली जिल्यातील औंढा, कळमनुरी, सेनगाव व हिंगोली या तालुक्यातून वाहते. ही हिंगोली जिल्ह्यातील मुख्य नदी असून जिल्ह्याची जीवन वाहिनी आहे. या कयाधू च्या काठावरच 'कंजारा' हे कळमनुरी तालुक्यातील गाव. या छोट्याश्या गावात साधारणतः १९५६ साली राजाबाई व पुरभाजी पाईकराव यांच्या पोटी जन्म झालेले जयाजी पाईकराव. आजोबांचा या नदीच्या पात्रास ते आडवून त्याचा डोह तयार करणे, त्या डोहात बोरु व अंबाडी भिजवायला घालायची व त्या पासून 'ताग' तयार करायचा हा छोटासा व्यवसाय. आजोबा भर मे महिन्यात हा व्यवसाय करायचे. यावेळी जयाजीचे वडील व आजोबा सोबत या ठिकाणी बालपण गेले. कयाधू नदीच्या पाण्यात तासान तास पडून राहायचे हा जयाजीचा छंद. त्यामुळे कयाधू नदीशी नात्याची घट्ट वीण बालपणापासूनच राहिली. पुढे 'नायलॉन' ने बाजारात चांगलेच हातपाय पसरवले तागाच्या व्यवसायात गदा येवून उद्योगच बंद झाला. पुढे या कुटुंबाचा उदरनिर्वाह मोलमजुरीवरच होऊ लागला. पुरभाजी पाईकराव यांना जयाजी खूप शिकून मोठा व्हावा असे वाटायचे. त्यासाठी त्यांनी त्याला गावच्या शाळेत घातले. गावात ६ व्या इयत्तेपर्यंतच शाळा होती. परंतु पुरभाजी पुढेही त्यांना शिक्षणासाठी नांदेड ला ठेवले. वडिलांच्या इच्छेचे सोन करायचे या जिद्दीने उन्हाळ्याच्या सुट्टीत पडेल ती कष्टाची कामे करून वर्षभरात शिक्षणासाठी रक्कम जमा करायची. या प्रमाणे जयाजीने आपले पदवी पर्यंतचे शिक्षण घेतले. पुढे विवाहाच्या बंधनात अडकूनही शिक्षण घेण्याचा ध्यास त्यांनी सोडला नाही. आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असूनही तिची चिंता केली नाही.

भाग्य आपल्या हातात नसले तरीही निर्णय आपल्या हातात असतात. भाग्य निर्णय बदलू शकत नाही परंतु निर्णयामुळे आपली परिस्थिती बदलु शकतो. निर्णयासाठी संघर्ष करत संधीची वाट बघावी लागते. अन अशा प्रतिकूल परिस्थितीत जयाजींना संधी आली. ती एका दिवशी वर्तमानपत्राला आलेल्या जाहिरातीमुळे. मास्टर ऑफ लेबर सर्विसेस च्या कोर्ससाठी ते मुंबई ला गेले. या कोर्स ला त्यांना प्रवेश नाही मिळाला. परंतु अपघाताने TISS ला प्रवेश मिळाला. या प्रवेशासाठी अंगी असलेली जिद्द व चिकाटी व प्रामाणिकपणा हेच कारणीभूत ठरले.

TISS चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना शासकीय नोकरीही मिळाली. ही नोकरी जर त्यांनी केली असती तर मंत्रालयात सचिव राहून आज ते सेवा निवृत्त झाले असते. परंतु ते ध्येयवेडे आहेत. ध्येयाने प्रेरित माणसे वेडी असतात, तीच ध्येय गाठू शकतात.

'कयाधू' ग्राम विकास प्रकल्प व उगम (मु. उमरा ता. कळमनुरी जि. हिंगोली) प्रकल्पाने त्यांनी आपली नाळ ग्रामीण भागाशी अजूनही जोडून ठेवली आहे. ग्रामविकासात शेतकरी, मजूर यांच्या दुपटीने 'पाणीसाठे' अत्यंत महत्वाचे आहे. यासाठी पाणी अडवा – पाणी जिरवा या माध्यमातून जयाजी पाईकराव यांनी कार्यक्षेत्रात क्रांती घडवली आहे. मुळात ते राहतात ते 'उगम' हे सर्वासाठी एक मॉडेल मधून डौलात उभे आहे. पाईकराव यांच्या कतृत्वाने ही संस्था कळमनुरी पर्यंतच मर्यादित राहिली नसून स्वबळावर मराठवाडा नव्हे तर राज्य आणि देशपातळीवर व्यक्ती, संस्था व संस्थेची जाळे या सोबत जोडल्या गेली आहे. शासकीय समित्यावर अशासकीय स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी म्हणून पाईकराव शासनस्तरावर सहभागी आहेत. 'एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन' कार्यक्रमामुळे ते हिंगोली जिल्ह्यातील सर्व साधारण व्यक्ती ते शासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्या पर्यंत जोडल्या गेले आहेत.

'कयाधू' नदीबाबत मनात घर करून राहिलेल्या बांधिलकीतून नदी ही परीसंस्था असून तिचा एकात्मिक दृष्ट्या विचार हाती घेतला आहे व त्यातून तिच्या पुनरुज्जीवनाचे स्वप्न उराशी बाळगून कार्यरत झालेले आहेत. कयाधू खोऱ्यातील दोन नाल्याचा सूक्ष्म पाणलोट क्षेत्र विकासाची ज्यात माथा ते पायथा ही संकल्पना त्यांनी काटेकोरपणे राबविली आहे. यातूनच शासनाने त्यांना 'जलयोद्धा' म्हणून गौरविले आहे. जिल्ह्यातील ५० जलदुतापैकी ३० दुत हे उगमचे आहेत. या कार्यात त्यांनी जल पुरुष डॉ. राजेंद्रसिंग यांच्याशी समन्वय ठेवून त्यांचे मार्गदर्शन तर घेतलेच आहे. तथापि त्यांचे कडून कौतुकसही पात्र ठरले आहेत. जयाजी चा कयाधू नदी लोकसहभागिय शाश्वत चळवळीचा मार्ग सोपा नसून खडतर निश्चित आहे. ही चळवळ खऱ्या अर्थाने मार्गी लावायची झाल्यास प्रत्येकाच्या अंत:करणात पाझर जो पर्यंत दरवळत नाही तो पर्यंत नदीला पाझर फुटणार नाही. खोऱ्यातील २०० गावातील जवळपास २ लक्ष लोकांच्या अंत:करणास पाझर फोडण्याचे काम यासाठी प्राधान्याने करावे लागणार आहे. कयाधुची लांबी जरी ९०० किमी असली तरी तिच्या जलवाहिन्या त्यावर ३ लक्ष हेक्टर उपचार करण्याची गरज आहे. हे एकट्या दुकट्याचे नक्कीच काम नाही. याची रास्त जाणीव या कयाधुच्या जेपीस ( जयाजी पाईकराव) आहे. कयाधू च्या पात्रात भर उन्हाळ्यात तीव्र उन्हात राबून काम करणारी जयाजींची अगोदरची पिढी, त्याचेच अनुवंशज म्हणून कयाधूचे ऋण फेडण्यास निघालेल्या श्री जयाजी पाईकराव यांचा मार्ग सरळ नाही. तरीही या संघर्षाच्या खडतर मार्गात आपली मशाल घेऊन ते पूर्ण करण्याचे उदिष्ट साध्य करण्यास तयार असलेल्या जेपींना सलाम ....!

# सामाजिक कार्यवृक्ष संभाराचे दर्शन :

# पाईकरावांची करामत !

श्रीमती मेधा पाटकर



सामाजिक कार्य करत असतांना, अनेक चढ उतारातून जात असताना अनुभवांचा डोंगरच उभा राहतो. या सगळ्यांची एक गाथा बनणे आवश्यक असते, ते अन्य कार्यकर्त्यांच्या बिरादरीला विचारासाठी मोलाचेही ठरते ! मात्र कार्य टिकवण्याच्या, पुढे नेण्याच्या धकाधकीत बालपणीच्या जडणघडणीपासून कार्यउभारणीपर्यंतचे सारे टिपणे अशक्यच होते आणि म्हणूनच एळाद्या साथी - सहयोगीनेच हे कार्य केल्यास एक व्यक्तित्व व कर्तृत्वही पुढे येते.

कयाधू नदीकाठी जन्मलेल्या, बागडलेल्या.... एका दलित - बौध्द कुटुंबात वाढलेल्या, कष्टानेच कतृत्व घडवलेल्या जयाजी पाईकराव यांच्या जीवनपटावर पुस्तिका तयार करण्याचे कार्य केले आहे ते डॉ. दुर्गादास रोडे यांनी. अर्थात बालपणातील मातापित्यासह शेतीशी, कष्टाच्या मजुरीशी, शिक्षणाशी तसेच दलितत्वापलिकडे माणूसकीविषयीच्या समानतेशी नाते जोडत पुढे - पुढेच जात राहिलेल्या जयाजी भाऊंच्या कार्याचा त्यांनी मांडलेला आलेख हा वर्णनातूनच विश्लेषण उपजत हा सिध्दांत साबित करणारा आहे.

हिंगोली तालुक्यातील, बौध्द समाजातील पहिला मॅट्रिक, पहिला पदवीधर झालेला जयाजीभाऊ हा टाटा सामाजिक विज्ञान संस्थेत पोहोचला व आमच्यापुढे विद्यार्थी म्हणून समोर आला, पाईकराव हेच त्यांचे नाव प्रचलित. व त्यांच्या भडभडून बोलण्यातून वाहणारा आत्मविश्वास व स्पष्टवक्तेपणा हीच त्यांची ओळख. बघताबघता ते एक सामाजिक बांधीलकीसह कार्यरत, यशस्वी विद्यार्थीम्हणून ओळखले जावू लागले. वंचितांविषयी संवेदना हाच त्यांचा ठेवा. शिवाजीनगर या गरीब वस्तीमध्ये कार्य करताना त्यांची विषमते विरूध्दची भावना जागृत असल्याचे जाणवले व इंग्रजी भाषेवर प्रभूत्वाची गरज नाही हे त्यांनी दाखवूनही दिले. त्याच काळात समाजकार्य शिक्षणाचा उपयोग ते सर्व प्रकारची वंचना भोगणाऱ्या मराठवाड्यातील शेतकरी - शेतमजूरांसाठीच करणार हे स्पष्ट दिसत होते. ते मनस्वीपणे मांडतही होते.

त्यानंतर त्यांनी नांदेडच्या अनेक मान्यवरांची साथ घेवून जी समाजिक संस्था उभी केली, माहेर चे कार्य पत्नी सुशीलासह पुढे नेले, त्यावरूनही त्यांची क्षमता व संर्वांगी सामाजिक विकासात महिलांचे स्थान व योगदान याची प्रचिती अनेकांना आली. अर्थात त्याच संस्थेच्या कार्यकाळात त्यांनी काही भोगलेही व डॉ. रोडे यांनी ते लपवले नाही, हे ही विशेष. पण त्याही पेक्षा पाईकरावांनी उभारलेले कार्य स्त्रियांच्या बचत गटापासून ते कयाधू नदीच्या पुनरूज्जीवन व नैसर्गिक जैविकतेच्या, विविधतेच्या संरक्षण व संवर्धनापर्यंत पुढे गेले आहे, हे मोलाचे. एका सामाजिक संस्थेद्वारे याहून अधिक कार्य ते काय काय होणार, असा आचंबा वाटण्याजोगा त्यांचा कार्यप्रपंच डॉ. रोडे यांच्या सखोल, तपशीलवार लेखनातून पुढे येतो. सामाजिक संस्थांची आज देशात व महाराष्ट्रातही रेलचेल आहे. कार्यासाठी मोठे फंडींग हेही अनेक क्षेत्रातून उपलब्ध होते, ते संस्थांनाच. मात्र काही संस्थाच लोकसहभाग, लोकसंघटनांचा आधार घेवून पुढे जातात, तेव्हाच कार्य फळाला येते व दातेही त्यांच्यावर विश्वास दर्शवतात. पाईकरावांना अनेक समित्यांवर नियुक्त करणाऱ्या राजकीय व शासकीय पदाधिकाऱ्यांनाही याचमुळे त्यांचा आधार घ्यावा व द्यावा, हे पटल्याचे दिसून येते.

कयाधू सारख्या बालपणाची सखी असलेल्या नदीच्या संदर्भातील त्यांचे कार्य हे खरोखरच वाखाणण्यासारखे. दुष्काळ व पूर दोन्ही भोगणाऱ्या महाराष्ट्रात व विशेषत: मराठवाड्यात जलनियोजनाची कास धरताना, मोठ्या धरणांद्वारा समस्या सुटणए शक्य नाही, हे जाणणारे पाईकराव व त्यांचे साथी यामुळेच माथा ते पायथा, विकेंद्रीत जलसंधारण, नदीखोऱ्याच्या एककाचा सर्व संसाधनांसह, गवतापासून बीजसंचयापर्यंत विचार करून हाती घेतलेले कार्य हे जलबिरादरी सारख्या मंचासह पुढे गेले व जात आहे.

या साऱ्यामागे असलेली दृष्टी व त्यातून उभी राहिलेली पाईकराव पतीपत्नींच्या कार्याची दृष्टी ही निश्चितच आजच्या परिस्थितीत, मूल्यहिनता भोगणाऱ्या राजकारणातून निर्माण होवू शकत नाही, म्हणून सामाजिक परिवर्तनाचे व्रत घेणाऱ्या युवाशक्तीला प्रेरणा देईल व खऱ्या मार्गाचा पर्याय पुढे ठेवले, यात शंका नाही.

डॉ. दुर्गादास रोडे यांनी लॉकडाऊनमध्ये स्वस्थ बसला, मेहनतीने एका कार्यकर्त्याच्या निमित्ताने हिंगोलीसारख्या अंतर्गत भागातही उभारलेला झेंडा दूरवर फडकवण्याचा निर्णय घेतला व अंमलात आणला, हे स्तुत्यच ! आज बाजारी वृत्ती - प्रवृत्ती व लोभ - उपभोग सर्वत्र पसरत असताना, असे कार्यच दिशादर्शक ठरावे हे मानणाऱ्या बुध्दिजीवींनी असे लेखनकार्य तरी पुढे न्यावे, हीच सदिच्छा.

*****

## जयाजी पाईकराव : उपेक्षितांचा वाटाड्या



**श्री . मारुती बनसोडे**

उगम संस्था कळमनुरी जि. हिंगोली या संस्थेचे संस्थापक मा.जयाजी पाईकराव दादा हे उगम संस्थेच्या माध्यमातून हिंगोली जिल्ह्यात शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी, विधवा, निराधार, परित्यक्ता, एकल महिलांना न्याय देण्याचे काम गेली ३० वर्ष करीत आहेत महिलांचे प्रश्न बेरोजगारांचे प्रश्न विशेषतः पाणी, रोजगार, आरोग्य, शिक्षण, याबाबत प्रबोधन, प्रशिक्षण व प्रत्यक्ष गाव पातळीवर प्रचंड काम संस्थेनी केले आहे. २००२ मध्ये पाईकराव दादा हॅलो मेडीकल फाऊंडेशन अणदूर या संस्थेत कांही कामा निमित्त आले होते त्यांच्या सोबत नॉर्वेचे गेस्ट आले होते. एलीझाबेत व अन्य एकजन त्यांना घेऊन ते परिवर्तन सामाजिक संस्थेच्या नळदुर्ग येथील कार्यालयात आले होते.त्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला जयाजी पाईकराव दादा यांचे समाज कार्यातील योगदान हे अत्यंत महत्वाचे आहे. मराठवाड्यातील सर्व स्वयंसेवी संस्थाना दिशा देण्याचे काम्दादानी केले आहे. मुंबईत मंत्रालयात एक NGO ची मिटिंग होती. सोशल ऑडीट च्या संदर्भात MREGS च्या संदर्भात सोशल ऑडीट करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एका NGO ची नियुक्ती करावयाची होती यात उस्मानाबाद जिल्ह्यात परिवर्तन सामाजिक संस्थेची निवड केल्याचे शासनाचे पत्र आले हि एक चांगली संधी दादांमुळे मिळाली .

मराठवाड्यातील आठही जिल्हया मध्ये कार्यरत असलेल्या तळागाळातील लोकांसाठी काम करणाऱ्या संस्थांचे बीसेफ नावाचे नेटवर्क ची संकल्पना मी मांडली व दादांच्या सहकार्याने पुढे ती कार्यान्वीत झाली सर्व जिल्ह्याच्या ठिकाणी NGO च्या मिटिंग संपन्न झाल्या जयाजी पाईकराव दादा हे आज पर्यन्त जे काम केले आहे. ते अत्यंत प्रेरणादायी आहे. उपेक्षितांना न्याय देण्यासाठी सातत्याने ते काम करीत आहेत DFID PACS प्रकल्प. दुष्काळ हटवू माणूस जगऊ या मोहिमेत ही त्यांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. जयाजी पाईकराव दांदाच्या कामावर एक स्वतंत्र संशोधन करण्याची गरज आहे. त्यांच्या सामाजिक कार्याचे अनेक पैलू आहेत. त्यांच्या कुटुंबात ४ जण MSW झालेले आहेत शास्त्र शुद्ध समाज कार्य करण्यात पाईकराव कुटुंबाचे मोठे योगदान आहे हे नव्याने या क्षेत्रात येणाऱ्या कार्यकर्ते मंडळीना नक्कीच प्रेरणादाई आहे म्हणूनच मी म्हणतो की जयाजी पाईकराव दादा हे उपेक्षितांचे वाटाडया आहेत.

## समाज सेवेतील भगीरथ : जयाजी पाईकराव



**श्री. राम खंदारे**

अंदाजे १९८७ वर्ष असेल पाईकराव साहेब आमच्या हातमाली गावात ओळखीचे एक दोन जण घेऊन आले गावातील काही प्रतिष्ठित माणसे जमा केली त्यावेळी मी २० वर्षाचा मुलगा होतो परंतु गावात माझी एक प्रतिष्ठित नागरिक म्हणून त्यावेळी सुद्धा गणना होत होती. म्हणून या मिटींगला मलाही बोलविण्यात आले तेथे गेल्यावर साहेबांविषयी चार चांगल्या गोष्टी त्यांच्यासोबत आलेल्या व्यक्तीने सांगितल्या ते ( एम ए एस डब्ल्यू ) शिकले आहेत त्यांनी समाजसेवा करण्याची इच्छा बाळगून कामाला लागले आहेत हे शिक्षण मला माहीत नव्हते नंतर पाईकराव साहेब हात मला नेहमी नेहमी येऊ लागले काही छोटे-मोठे उपक्रम राबवू लागले जसे जमेल तसे सहकार्य मी करू लागलो कारण माझे शिक्षण चालू होते नंतर मी बीए झालो पूर्वीच डिप्लोमा इन ग्रीकल्चर झालो होतो मराठी शिकण्याची आवड होती परंतु परिस्थितीमुळे मी पुढे शिकू शकत नव्हतो कारण मराठी हिंगोलीला नव्हते व नांदेड सारख्या ठिकाणी मी शिकू शकत नव्हतो मला एक दिवस हातमालीला पाईकराव साहेबांसोबत त्यांच्या अर्धांगिनी सौभाग्यवती सुशिलाबाई पाईकराव आल्या होत्या त्यांनी मला तुम्ही एरव्ही तरी आम्हाला सहकार्य करताच की मग आमच्या प्रत्यक्ष कामात सहभागी व्हा पूर्णवेळ काम करा आम्ही तुम्हाला तुमचे घर धकविन्या पुरते मानधनही देऊ अशा पद्धतीने वहिनींनी मला सांगितले ही गोष्ट मला फारच पसंत पडली आणि मी लागलीच त्याक्षणी होकार दिला उद्यापासून त्यांच्यासोबत कामावर गेलो त्यांची काम करण्याची पद्धत मला चांगली आवडली ते लोकांत मिसळत मनातील विचार कृतीत कसा आणावा त्यांचे नियोजन करीत व नियोजनाप्रमाणे काम करीत त्यामुळे कामे यशस्वी होत हळूहळू कामाचा चांगलाच जम बसला साहेबाचे नावही सर्वतोमुखी झाले थोडाबहुत ग्रामीण विकास ही दिसू लागला त्यांनी महिला बचत गट, अंगणवाडी चालवीने, शेतकऱ्यासाठी योजना राबविणे, पाणलोट क्षेत्राची कामे करणे, महिला बँक चालविने, इत्यादी अनेक क्षेत्रात काम करणे व प्रत्येक क्षेत्रात त्यांच्या कामाचा आणि त्यांचा लौकिक झाला त्यांनी आतापर्यंत सेंद्रिय शेती किमान पाच हजार एकर केली आहे शेतकरी गट स्थापन केले आहेत तसेच किमान दहा हजार हेक्टर क्षेत्रावर पाणलोट विकासाची कामे केली आहेत पर्यावरण पूरक काम म्हणून पाच लाखापर्यंत वृक्षारोपण केले आहे एल बी एस, सी सी टी

माती नालाबांध सी एन बी ग्यबीएन स्ट्रक्चर, शेततळे, अर्दन स्ट्रक्चर हे पाणलोट ची कामे हजारोच्या संख्येने केली आहे अजूनही ही कामे चालू आहेत.

**ही विविध कामे करत असतांना त्यांनी मला अनेक पदावर नियुक्त :**

केले प्रथम माझी कार्यकर्ता म्हणून निवड केली त्या नंतर कृषी सहाय्यक, कृषी अधिकारी, पाणलोट सचिव, माहिती संशोधन सहाय्यक, डेअरी सचिव, सेंद्रिय कृषीतज्ञ, एस एच जी मध्ये रिसोर्स परसन, पाणलोट क्षत्र विकासात रिसोर्स परसन, सेंद्रीय कृषी विकासात रिसोर्स परसन, आणि वेगवेगळ्या प्रशिक्षणा मध्ये मास्टर ट्रेनर म्हणून मी कामे केलेली आहेत या योगाने भारत भर प्रशिक्षण घेतलेली आहेत व अनेक जिल्ह्यात रिसोर्स परसन म्हणून प्रशिक्षण देलेलीही आहेत या सर्व कामातून मी तावूनसुलाखुन ही निगालो आणि अशा पद्धतीने माझी त्यांच्या सानिध्यात राहून जडण घडण झाली माझ्या सारखे अनेक जन सुधा घडले आता त्यांनी कामाचा नवीनच ध्यास घेतलेला आहे तो म्हणजे कयाधू नदीचे पुनरुज्जीवन करणे त्या दिशेनेही त्यांनी काम करण्यास बऱ्याच वर्षापासून आरंभ केलेला आहे तो त्यांचा ध्यास तडीस जाण्यास फार वर्ष लागणार नाहीत कारण त्या दिशेने त्यांची वाटचाल चालू आहे मी त्यांच्यासोबत गेली ३५ वर्षापासून आहे त्याच्या सोबत राहील यामुळे समाजसेवा म्हणजे काय हे कळले मिळणाऱ्या मानधनातून माझा घरचा शेतीचा विकास झाला असे त्यांच्या सोबत राहील यामुळे जगातील अनेक देशातील नागरिकांचा त्यांच्यासोबत सहवास त्यांच्या सोबत राहण्याचा योग आला त्याचबरोबर भारतातील अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या लोकनेता सोबत अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या समाजसेवका सोबत, सहवास लाभला त्यांचे आचारविचार जवळून पाहता आले या प्रत्येकाला त्यांच्या जीवनात समाज उपयोगी कामे करण्यात शेकडो संकटे उभी राहिली पण ते डगमगले नाहीत व हातचे काम सोडून दिले नाही आणि शेवटी त्या प्रत्येकांना त्यांच्या कामात यश आले या गोष्टी मी जवळून पाहिल्या आहे त्यामुळे मी सुद्धा जीवनात संकटांना कसे सामोरे जायचे ते त्यांच्यापासून शिकलो मी पाईकराव साहेबांन पासुन फारच महत्त्वाच्या गोष्टी शिकलो आता त्यांच्या हातून कयाधू नदी पुनरुज्जीवन व्हावी हीच आता माझी त्यांच्याकडून अपेक्षा आहे व माझ्या सारख्या लाखो लोकांची हीच इच्छा आहे अपेक्षा आहे तेव्हा या कयाधू नदीचे पुनरुज्जीवन करण्याचा ध्यास घेतलेला आहे तो या भगिरथा कडून पूर्ण व्हावा व त्यासाठी त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

*****

राजाबाई पाईकराव



पुरभाजी पाईकराव



## मराठवाड्याचा विकास - वास्तव आणि भविष्य - ३

**डॉ. दि.मा मोरे, पुणे**

**मो : ९४२२७७६६७०**



अशा सर्व उपक्रमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत असते. अशा उपक्रमाला लागणाऱ्या रस्ते, रेल्वे, विमानतळे, वीज, पाणी, यासारख्या पायाभूत सोयी बदललेल्या काळात राज्याच्या सर्व भागात कमी-जास्त प्रमाणात उपलब्ध झालेल्या आहेत आणि गरजेप्रमाणे उपलब्ध करतापण येतात. या कारणास्तव सेवाक्षेत्राचा विस्तार वर उल्लेख केलेल्या कांही निवडक शहरांभोवतीच करण्यासाठी कसलेही समर्थन देता येत नाही. राज्यकर्त्यांच्या मनांत आले आणि त्याला लोकप्रतिनिधींनी विरोध केला नाही आणि म्हणून या सेवांचे केंद्रीकरण झालेले आहे आणि आजपण त्यामध्ये भर पडत आहे. राज्याचा विकास म्हणजे चार-दोन शहरांचा विकास नाही तर राज्याच्या सर्व भागांचा विकास होणे अभिप्रेत असते. विकासामध्ये पुढे असणाऱ्या प्रदेशांनी पुढेच जावे आणि मागासलेल्या ग्रामीण भागाने मागेच रहावे हे न्यायोचित ठरत नाही. यातूनच विकासाचा अनुशेष निर्माण होत असतो. मराठवाड्यासारख्या प्रदेशात औषधाला पण आयटी कंपनी निर्माण करण्यात आली नाही. या प्रदेशातील जनतेने आणि लोकप्रतिनिधींनी तशी मागणीपण केली नाही. विकासामध्ये समन्यायीपणाची दृष्टी राज्यकर्त्यांमध्ये दिसून येत नसेल तर जनतेने निमूटपणे सहन करावयास नको. सद्यस्थितीत विकासाचा प्रचंड असा असमतोल निर्माण झालेला आहे. मराठवाडा प्रदेशाच्या बाबतीत जे घडलेले आहे, तशीच परिस्थिती विदर्भ, कोंकण, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्राचा पूर्वेकडील (सोलापूर, सांगली, सातारा, नगर इ.) भागातपण घडलेली आहे. एकाही बँकेचे वा विमा कंपन्यीचे मुख्यालय राज्याच्या मागासलेल्या भागात नाही. कांही वर्षांपूर्वी गडचिरोली या जिल्ह्यामध्ये विद्यापीठ उघडण्यात आलेले आहे. विकासाची सुरुवात होण्यास फार उशीर झालेला दिसतो. ७-८ वर्षांपूर्वी मराठवाड्यामध्ये महाराष्ट्रासाठी तांत्रिक विद्यापीठ उघडण्याच्या प्रस्तावाला गती प्राप्त झाली होती. या तांत्रिक विद्यापीठाचे मुख्यालय जालना जिल्ह्यात निश्चित करण्यात येत होते. राज्याच्या उर्वरित भागातून (प्रामुख्याने पुणे परिसरातून) या प्रस्तावाला विरोध करण्यात आला. शासनाने हा प्रस्ताव रद्द मागे टाकला. मराठवाड्यासारख्या मागासलेल्या भागात विद्यापीठासाठी गुणवत्ताधारक प्राध्यापकवर्ग मिळणार नाही असेही कारण पुढे करण्यात आले. विकासामध्ये मागे पडलेले प्रदेश कायमचे मागासलेलेच राहावयास हवेत, अशा विचाराला खतपाणी घालावयास नको. दुर्दैवाने तसे घडत असते. नुकतेच (जानेवारी २०२१) उस्मानाबाद येथे वैद्यकीय महाविद्यालय उघडण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतल्याचे कानांवर आले. याच तत्वाने किमान सर्व जिल्ह्यांच्या ठिकाणी, मागासलेल्या भागांना प्राधान्य देऊन वैद्यकीय महाविद्यालये उघडण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या पिछाडीवर असलेल्या कुटुंबातील मुलांना वैद्यकीय शिक्षण घेण्याची संधी त्यांच्याआर्थिक आवाक्यात येते. आयटी कंपन्यांच्या बाबतीतपण असेच घडावयास हवे. अशा शैक्षणिक उपक्रमातून रोजगार निर्मिती पण होते आणि स्थानिकांना त्याचा लाभ होतो.

मराठवाड्यामध्ये पर्यटनाचा विकास घडवून आणण्यासाठी अनुकूलता आहे. वेरुळ, अजिंठ्यासारखी जगप्रसिध्द निर्मिती मराठवाड्याच्या औरंगाबाद जिल्ह्यात आहे. मराठवाड्याचा मांजरा नदीच्या उगमास्थानाजवळील परिसर जास्त उंचीवर (८०० मीटर) आहे. या ठिकाणचा सुर्योदय आणि सुर्यास्त अल्हाददायक असतो. म्हणूनच या परिसराच नामकरण मांजरसुंभा (सुंदर सुबह / सकाळ) असे करण्यात आलेले आहे. अशा भागाचा विकास हा पर्यटनाला चालना देत असतो. हा परिसर सिताफळाच्या डोंगरासाठी प्रसिध्द आहे. या परिसरातील गावरान अंबापण त्याच्या आगळ्या-वेगळ्या चवीसाठी प्रसिध्द आहे. याच परिसरामध्ये खजाना विहीर नावाची अद्भूत निर्मिती आहे. ही विहीर प्रवाही पध्दतीने जवळपास हजार एकर क्षेत्राला सिंचनाची सुविधा उपलब्ध करते. पर्यटनाच्या दृष्टीने अशा ऐतिहासिक वैभवशाली परिसराचा विकास करण्यात आलेला नाही.

धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने पण मराठवाडा फार सधन आहे. तुळजापूर (देवी), माहूर (देवी), परळी वैजनाथ (ज्योतीर्लिंग), नांदेड (गुरुद्वारा), हिंगोली (संत नामदेव), जांब, जिल्हाः जालना, (समर्थ रामदास), औरंगाबाद (बीबीका मकबरा, पानचक्की, छत्रपती शिवाजी महाराज पुराणवस्तु संग्रहालय, औरंगाबाद लेण्या इ.) अशा अनेक ठिकाणांचा उल्लेख करता येईल. मराठवाड्यामध्ये अनेक ठिकाणी इतिहासाची आठवण करुन देणारे भुईकोट किल्ले आहेत. देवगिरीचा भुईकोट-वजा-डोंगरी किल्ला जगप्रसिध्द आहे. जायकवाडी, माजलगांव, मनार, पेनगंगा यासारख्या शेकडो जलाशयांचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास करणे ही काळाची गरज आहे. अशा उपक्रमातून स्थानिक स्तरावर रोजगार निर्मिती होऊन शेतीवरील भार कमी होतो.अशा रोजगारांचा स्थानिक बेरोजगार तरुण-तरुणींना लाभ होतो.

जायकवाडी धरणाच्या खाली कर्नाटक राज्यातील कावेरी नदीवरील कृष्णाराजसागर धरणाच्या पायथ्याला विकसित केलेल्या वृंदावन गार्डनच्या धर्तीवर 'संत ज्ञानेश्वर उद्यान' विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. करोडो रुपये त्यामध्ये खर्च करण्यात आले.

एक पर्यटनस्थळ म्हणून आणि स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करुन देणारे केंद्र म्हणून विकास करण्यामध्ये शासन आणि परिसरातील लोक कमी पडले असे म्हणावयास हरकत नाही. या पर्यटनस्थळावर तीन उपक्रमांचा संगम होतो. जायकवाडी जलाशय, पैठणचे नाथ मंदीर आणि संत ज्ञानेश्वर उद्यान ही ती तीन स्थळे आहेत. लगतच गोदावरी नदीचे विस्तीर्ण पात्र पण अनेकांना मोहित करते. याचा फायदा करुन घेण्यामध्ये पैठणचा परिसरकमी पडला असेच म्हणावे लागते. अशा उपक्रमास स्थानिक लोकांचापण पाठिंबा आणि सहभाग आवश्यक असतो.


मराठवाडा प्रदेश जसा पाणी उपलब्धतेच्या बाबतीत तुटीचा प्रदेश आहे, तशीच गत या प्रदेशामध्ये विकासाचे सेवाक्षेत्र विकसित करण्यामध्ये झालेली आहे आणि म्हणून हा भाग विकासामध्ये मागे पडलेला दिसतो. शासनस्तरावर राज्यातील विकासाचा जिल्हानिहाय आढावा घेतला जातो आणि आर्थिक व सामाजिक विकासाचा लेखाजोखा मांडला जातो. सोबतच्या तक्त्यामध्ये २००४–०५, २०१३–१४ आणि २०१८–१९ या तीन वर्षांचेआर्थिक चित्र मांडलेले आहे.

**जलसंवाद हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. दत्ता देशकर यांनी श्री.जे. प्रिंटर्स प्रा. लि, दत्तकुटी १४१६, सदाशिव पेठ पुणे – ४११०३० येथे ऐ – २०१, व्यंकटेश मीराबेल अपार्टमेंटस, पॅनकार्ड क्लब जवळ, बाणेर हिल्स, पुणे – ४११०४५ येथे प्रसिध्द केले.**

**संपादक डॉ. दत्ता देशकर**

e-mail - dgdwater@gmail.com
**मासिकाची वेबसाईट** - www.jalsamvad.com

Jalsamvad monthly is owned, Printed & Published by Datta Ganesh Deshkar, Printed at Shree J Printers Pvt. Ltd., 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune - 411030 & Published at A/201, Mirabel Apartments, Near Pan Card Club, Baner, Pune - 411045.
Editor - Datta Ganesh Deshkar



**तक्ता क्र.१**
**जिल्हानिहाय दरडोई उत्पन्न :**

| अ.क्र. | जिल्हा | वर्ष | | |
|---|---|---|---|---|
| | | २००४–०५ | २०१३–१४ | २०१८–१९ |
| १ | मुंबई(नगर आणि उपनगर) | ६३,५९९ | १,८८,७३९ | ३,२५,९५४ |
| २ | ठाणे | ५४,९६७ | १,७३,१५० | २,७५,५३८ |
| ३ | रायगड | ४२,८९६ | १,३२,११२ | २,१६,३३१ |
| ४ | रत्नागिरी | २८,१७५ | ९०,२२६ | १,६७,४६३ |
| ५ | सिंधुदुर्ग | ३०,५०१ | १,०३,७४२ | १,८४,२२८ |
| | कोकण विभाग: | -- | -- | २,८४,२४३ |
| ६ | नाशिक | ३३,८७९ | १,१०,७१७ | १,६६,९७१ |
| ७ | धुळे | २३,५६९ | ८५,७०६ | १,२९,०४२ |
| ८ | नंदूरबार | १७,८४३ | ५६,५२१ | ८५,५०९ |
| ९ | जळगांव | २६,४०४ | ८१,७४१ | १,२३,३९४ |
| १० | अहमदनगर | २५,२१७ | ८६,८३२ | १,५४,५६४ |
| | उत्तर महाराष्ट्र | २५,३८२.४ | ८४,३०३.४ | १,४२,७१८ |
| ११ | पुणे | ५२,११५ | १,७१,६३६ | २,५७,४८३ |
| १२ | सातारा | २९,४७१ | ९३,५११ | १,६०,१३१ |
| १३ | सांगली | २९,४२८ | १,०३,५८८ | १,६९,४७५ |
| १४ | सोलापूर | २६,७१७ | ८८,८२१ | १,६२,५८२ |
| १५ | कोल्हापूर | ३५,०१९ | १,१९,७८३ | १,९३,०७३ |
| | पुणे विभाग (पश्चिम महाराष्ट्र) | -- | -- | २,०६,८९५ |
| १६ | औरंगाबाद | ३३,८३८ | १,०७,७८४ | १,५५,३४९ |
| १७ | जालना | १९,६७१ | ७७,२५१ | १,०५,६४० |
| १८ | परभणी | २०,१५७ | ७१,४२६ | १,११,२३७ |
| १९ | हिंगोली | १७,३२० | ५३,७८० | ८९,७१४ |
| २० | बीड | १९,५४६ | ६५,३६९ | ९९,२१५ |
| २१ | नांदेड | १९,३१३ | ६७,६५४ | १,१६,१८० |
| २२ | उस्मानाबाद | १८,४३५ | ७०,६६३ | १,०७,०५८ |
| २३ | लातूर | २०,६९६ | ८०,३५२ | १,२३,२६९ |
| | मराठवाडा | -- | -- | १,१८,६०४ |
| २४ | बुलडाणा | १८,८०३ | ६७,७३० | ८९,७५५ |
| २५ | अकोला | २३,६३८ | ७९,८२९ | १,३५,७५७ |
| २६ | वाशिम | २०,६०९ | ८१,५६८ | ८७,३९१ |
| २७ | अमरावती | २४,०६२ | ७९,९४५ | १,२७,८६५ |
| २८ | यवतमाळ | २०,८४६ | ६६,२८७ | १,०६,७४३ |
| | मरावती विभाग (पश्चिम विदर्भ) | -- | -- | १,११,००२ |
| २९ | वर्धा | २७,९६८ | ८६,९४९ | १,४९,३८९ |
| ३० | नागपूर | ४१,६९२ | १,२३,६१० | २,२५,३९० |
| ३१ | भंडारा | २५,५०४ | ७५,७६४ | १,२३,६६७ |
| ३२ | गोंदीया | २०,६२५ | ६८,६६५ | १,१८,६०३ |
| ३३ | चंद्रपूर | ३१,६८९ | ८९,९०२ | १,४५,०४१ |
| ३४ | गडचिरोली | १७,२५६ | ५८,६०३ | ८९,९५४ |
| | नागपूर (पूर्व विदर्भ) | -- | -- | १,६८,०८९ |
| | महाराष्ट्र | -- | -- | १,९१,७३६ |

**तक्ता क्र. २**

**जिल्हानिहाय वेगवेगळ्या क्षेत्रातील विकासाचे प्रमाण**

| अ.क्र. | जिल्हा: | २००४–०५ | | | | २०१३–१४ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राथमिक क्षेत्र (शेती आणि इतर अनुषंगिक) | उद्योग | सेवाक्षेत्र | एकूण: | प्राथमिक क्षेत्र (शेती आणि इतर अनुषंगिक) | उद्योग | सेवाक्षेत्र | एकूण: |
| १ | मुंबई (नक्षर आणि उपनगर) | २.८ | २१.० | २६.९ | २२.५ | ३.१ | १८.० | २७.५ | २२.१ |
| २ | ठाणे | ३.४ | १५.९ | १३.६ | १३.२ | २.५ | १५.८ | १४.१ | १३.३ |
| ३ | रायगड | २.१ | ४.४ | २.१ | २.८ | १.६ | ४.१ | २.१ | २.५ |
| ४ | रत्नागिरी | २.३ | १.४ | १.२ | १.३ | १.४ | १.७ | १.१ | १.३ |
| ५ | सिंधुदुर्ग | १.८ | ०.४ | ०.७ | ०.७ | १.८ | ०.५ | ०.६ | ०.७ |
| | कोकण विभाग: | १२.४ | ४३.१ | ४४.४ | ४०.५ | १०.४ | ४०.१ | ४५.३ | ४०.० |
| ६ | नाशिक | ८.४ | ५.५ | ३.९ | ४.९ | १०.४ | ४.९ | ३.८ | ४.८ |
| ७ | धुळे | १.८ | ०.७ | १.२ | १.१ | २.४ | १.० | १.२ | १.२ |
| ८ | नंदूरबार | १.८ | ०.३ | ०.६ | ०.६ | १.२ | ०.४ | ०.६ | ०.६ |
| ९ | जळगांव | ५.७ | २.० | २.६ | २.७ | ४.३ | २.० | २.५ | ३.६ |
| १ | अहमदनगर | ५.४ | १.९ | २.८ | २.८ | ५.१ | २.६ | २.७ | २.९ |
| | उत्तर महाराष्ट्र | २३.० | १०.४ | ११. | १२.२ | २३.४ | ११.० | १०.७ | १२.२ |
| ११ | पुणे | ७.२ | १५.५ | ९.७ | ११.१ | ६.९ | १५.९ | १०.२ | ११.४ |
| १२ | सातारा | ४.६ | २.१ | २.० | २.३ | ३.८ | २.० | १.९ | २.२ |
| १३ | सांगली | ४.५ | १.४ | २.० | २.१ | ४.५ | २.० | २.० | २.३ |
| १४ | सोलापूर | ४.५ | २.३ | २.९ | २.९ | ३.७ | ३.० | २.८ | २.९ |
| १५ | कोल्हापूर | ५.५ | ३.२ | ३.२ | ३.५ | ४.८ | ४.२ | ३.१ | ३.६ |
| | पुणे विभा (पश्चिम महाराष्ट्र) | २६.३ | २४.४ | १९.९ | २१.९ | २३.८ | २७.१ | २०.१ | २२.४ |
| १६ | औरंगाबाद | २.९ | ४.३ | २.२ | २.९ | ३.७ | ३.७ | २.१ | २.७ |
| १७ | जालना | २.० | ०.६ | ०.८ | ०.९ | ३.२ | ०.७ | ०.८ | १.० |
| १८ | परभणी | १.८ | ०.४ | ०.९ | ०.८ | २.४ | ०.४ | ०.९ | ०.९ |
| १९ | हिंगोली | १.३ | ०.२ | ०.४ | ०.५ | १.० | ०.२ | ०.४ | ०.४ |
| २० | बीड | २.८ | ०.६ | १.१ | १.२ | २.७ | ०.७ | १.१ | १.२ |
| २१ | नांदेड | २.८ | ०.८ | १.७ | १.५ | ३.३ | ०.९ | १.६ | १.६ |
| २२ | उस्मानाबाद | १.७ | ०.४ | ०.८ | ०.८ | २.५ | ०.५ | ०.७ | ०.९ |
| २३ | लातूर | २.३ | ०.६ | १.२ | १.२ | ३.९ | ०.७ | १.२ | १.४ |
| | मराठवाडा | १७.८ | ७.८ | ९.२ | ९.७ | २२.७ | ७.९ | ८.९ | १०.२ |
| २४ | बुलडाणा | २.१ | ०.६ | १.३ | १.२ | २.८ | ०.८ | १.२ | १.३ |
| २५ | अकोला | १.१ | ०.७ | १.२ | १.१ | १.८ | ०.८ | १.१ | १.१ |
| २६ | वाशिम | १.३ | ०.२ | ०.७ | ०.६ | २.१ | ०.३ | ०.६ | ०.७ |
| २७ | अमरावती | ३.३ | ०.८ | १.९ | १.७ | २.८ | १.० | २.० | १.८ |
| २८ | यवतमाळ | २.५ | १.३ | १.३ | १.४ | २.५ | १.१ | १.३ | १.४ |
| | अमरावती विभाग (पश्चिम विदर्भ) | ०.३ | ३.७ | ६.३ | ८.० | १२.० | ४.० | ६.१ | ६.२ |
| २९ | वर्धा | २.० | ०.७ | ०.९ | १.० | १.३ | ०.८ | ०.९ | ०.९ |
| ३० | नागपूर | ३.१ | ५.६ | ४.९ | ४.९ | १.७ | ५.४ | ४.८ | ४.६ |
| ३१ | भंडारा | १.३ | ०.९ | ०.७ | ०.८ | १.२ | ०.७ | ०.६ | ०.७ |
| ३२ | गोंदीया | ०.८ | ०.६ | ०.७ | ०.७ | ०.९ | ०.७ | ०.६ | ०.७ |
| ३३ | चंद्रपूर | २.० | २.७ | १.५ | १.९ | १.६ | २.१ | १.४ | १.६ |
| ३४ | गडचिरोली | १.० | ०.२ | ०.५ | ०.५ | १.१ | ०.३ | ०.४ | ०.५ |
| | नागपूर विभाग (पूर्व विदर्भ) | १०.२ | १०.६ | ९.१ | ९.७ | ७.८ | १०.० | ८.९ | ९.० |
| | महाराष्ट्र: | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० | १०० |


# २४ x ७ अखंड पाणी पुरवठा न होण्याची कारणे - २

**डॉ. संजय दहासहस्त्र**


**मो : ९९८७०३००८०**




पाणी पुरवठा यंत्रणा कार्यान्वित करण्याच्या पहिले लोकांना कमी पाणी वापराची सवय होती. आणि पाणी पुरवठा यंत्रणेला सुद्धा थोड्या काळासाठी, सकाळी आणि संध्याकाळी संपूर्ण झोनला पाणीपुरवठा (आकृती ४ अ) करणे शक्य होते. मात्र जादा पाणी वापरामुळे लवकरच त्यांना समजले की आता पूर्वीची व्यवस्था प्रभावी राहिली नाही, दिवसातून एकदा पाणीपुरवठा (आकृती ४ अ) केला जातो, तो देखील आता शक्य होत नाही, तेव्हा त्यावेळी दुसरा झोन सुद्धा तयार केल्या जातो (आकृती ४ ब), त्यांनतर सुद्धा जेव्हा पाण्याचा वापर खूप प्रमाणात वाढल्यावर तिसरा झोन सुद्धा तयार करण्याची वेळ येते (आकृती ४ क).




(अ) पूर्ण झोन ला एकदम पाणी पुरवठा होत असतो




(ब) मूळ झोन सबझोन १ आणि सब झोन २ मध्ये विभागला





(क) मूळ झोन सबझोन १, सब झोन २ आणि सबझोन ३ मध्ये विभागला

**आकृती ४: खंडित (इंटरमिटंट) यंत्रणेमधील पाणी वितरण प्रणालीचे झोनिंग**

झोनिंग व्यवस्थे मधील कार्यपद्धती: अशा परिस्थितीत समजा, झोन –१ मध्ये पाणीपुरवठा केला जाईल, तर ऑपरेटर फक्त सकाळच्या वेळीस (पीक अवर्स ) पाणी सोडतो आणि संबंधित झडप बंद करून झोन –२ आणि झोन–३ चा पाणीपुरवठा बंद करतो. झोन –१ ची मागण्या पूर्ण करीत असताना, टाकी रिकामी होते आणि पुरवठा नसलेल्या कालावधीमध्ये ती टाकी भरावी लागते . झोन –१ ची मागणी पूर्ण झाल्यानंतर, ऑपरेटर झोन –१ आणि झोन –३ बंद करतात जेणेकरुन झोन –२ मध्ये पाणीपुरवठा होत असतो. अशाप्रकारे झोनिंग पद्धती सध्या जवळजवळ सर्वच शहरांच्या पाणी केंद्रांमध्ये वापरली जाते.

वरील समस्यांमुळे परिस्तिथी खालील कारणांस्तव आणखी चिघळते:




**आकृती ५: बदलापूर शहरात (मुंबई जवळ) गुंतागुंतीरीत्या (हफाझार्ड) पाईप टाकल्या गेल्या होत्या**

(अ) हाफझार्ड पाईपलाइन्स : वरील व्यतिरिक्त, पीक फॅक्टरमध्ये वाढ झाल्यामुळे विद्यमान पाईपलाईन जर पाण्याच्या मागणीची पूर्तता करू शकली नाही तर त्या रस्त्यांवर समांतर पाईपलाईन्स टाकल्या जातात. महाराष्ट्रातील बदलापूर शहराची अशीच एक घटना आकृती ५ मध्ये दर्शविली आहे. यामुळे असमान वितरण, असमान दाब आणि

अपुरी व्यवस्था असलेल्या नेटवर्कला जन्म दिल्या जातो. बदलापूर मध्ये नंतर ही पाईपलीने दुरुस्त करण्यात आली.

(ब) बुटक्या व लहान क्षमता असलेल्या टाक्या: महाराष्ट्रातील औरंगाबाद शहरात सुमारे १९९० च्या दरम्यान शहराची वितरण व्यवस्था कार्यान्वित सुरू झाल्यानंतर शहर प्रशासनाने न्याय्य वितरणाच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी नगरसेवकांच्या सूचनेनुसार लहान क्षमतेचे पाण्याच्या बटू टाक्या उभारल्यात . अशाप्रकारे, वितरण यंत्रणेत केवळ ८ ते १० मीटर स्टेज उंची आणि २५,००० ते ५०,००० लिटर लहान क्षमतेची सुमारे २१ टाक्यांची निर्मिती करण्यात आली. या टाक्यांची उंची कमी असल्याने, स्वाभाविकतः पाईपलाईन मध्ये पुरेसा दाब निर्माण होऊ शकला नाही आणि परिणामतः त्या सर्व टाक्या नवीन डिझाईनमध्ये रद्द करण्यात आल्यात.

(क) खूप मोठे झोन: वरील प्रमाणे २ मध्ये नमूद केल्याचा विपरीत, पिंपरी–चिंचवड येथे, सुमारे ७९,७९० लोकसंख्या असणारा एक अत्यंत मोठा झोन कार्यरत आहे. हा ऑपरेशनल झोन टाकीच्या आ स पासच्या भागाजवळ एका तासासाठी पाणीपुरवठा करतो परंतु या ऑपरेशनल झोनच्या सर्वात दूरच्या हद्दीतील लोकांना अवघ्या ३० मिनिटांचा पाणी पुरवठा होतो.

(ड) खंडित (इंटरमिटंट) पाणी पुरवठ्याची इतर कारणे: इतर प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

- पाणी वितरण प्रणाली त्याच्या डिझाइन आयुष्यापेक्षा पुढे वापरणे
- स्रोतामधील पाणी योग्य प्रमाणात उपलब्ध नसणे
- डिझाइन कालावधी दरम्यान शहरातील लोक्संख्येमध्ये अनपेक्षित किंवा असंतुलित वाढ
- मोठ्या गळत्या
- अयोग्य लेआउट
- पाण्याचे मिटर न वापरता पाणी पुरवठा
- अयोग्य नियोजन आणि अयोग्य नेटवर्कचे डिझाइन आणि खराब परिचालन (ऑपरेशन अँड मेंटेनन्स)

**५. सारांश व निष्कर्ष**

अशा रीतीने पाणी पुरवठा यंत्रणेचे खंडित (इंटरमिटंट ) व्यवस्थेमध्ये कालौघात रूपांतर होत असते. अशी स्थिती भारतातील जवळपास सर्वच शहरांवर येत असते. मात्र आधुनिक जीआयएस व पाईप नेटवर्क प्रणालीचा वापर करून वाढत्या लोक्संख्येकरिता योग्य डिझाईन केले तर पुन्हा २४ x ७ पाणी पुरवठा करता येतो. यासाठी अभियंत्यांना योग्य ट्रेनिंग ची आवश्यकता आहे व त्यांना आधुनिक तंत्रज्ञान शिकावे लागणार आहे व त्यांनतर ते उपयोगात सुद्धा आणावे लागणार आहे. शहरी प्रशासनाला सुद्धा हे सर्व घडवण्यासाठी इच्छाशक्ती आवश्यक आहे.

**या झाडाला मिळतंय २४ तास संरक्षण, एक पानही गळलं तरी प्रशासनात उडते खळबळ**

भारतात एक असं झाड आहे, ज्याला २४ तास (24 hour protection to a tree) संरक्षण दिलं जातं. मध्यप्रदेशातील रायसेनच्या सलामतपूरमध्ये हे झाड उभं आहे. या झाडाचं एक पान जरी हललं तरी प्रशासनात खळबळ उडते. हे झाड इतकं महत्त्वाचं आहे की दर १५ दिवसांनंतर त्याचं मेडिकल चेकअप केलं जातं. या झाडाच्या देखभालीसाठी वर्षाला साधारण १५ लाख रुपये खर्च केले जातात. २१ सप्टेंबर २०१२ या दिवशी श्रीलंकेचे तत्कालीन राष्ट्रपती महिंद्रा राजपक्षे यांनी या बोधीवृक्षाचं रोपण केलं होतं.

रायसेन जिल्ह्यात सांची हे एक पर्यटनस्थळ आहे. अनेक वर्षांपूर्वी इथं बौद्ध युनिव्हर्सिटीची स्थापना करण्यात आली होती. याच विद्यापीठाच्या डोंगरावर हा वृक्ष लावण्यात आला आहे. त्यावेळी श्रीलंकेच्या तत्कालीन अध्यक्षांसोबत तत्कालीन मुख्यमंत्री शिवराज सिंह चौहानदेखील उपस्थित होते. या झाडाच्या सुरक्षेवर सरकारकडून आतापर्यंत लाखो रुपये खर्च करण्यात आले आहेत

सांचीला जाऊन कुणीही हे झाड पाहू शकतो. भोपाळमार्गे इंदूरवरून सांचीला जाता येतं. भोपाळवरून सांची जवळपास ५० किलोमीटर अंतरावर आहे.





## तक्ता : गवत आणि इतर पिकांची तुलना (गवत पुराण लेखः पृष्ठ क्रमांक : ९)
## (उत्पादन, उत्पादन खर्च, उत्पन्न आणि होणारा नफा)

| | सोयाबीन | उडीद | कापूस | गवत |
|---|---|---|---|---|
| कालावधी/महिने | चा-खरीप | चार-खरीप | अकरा | आठ |
| काडी कचपट | २०० | २०० | २०० | ० |
| वखर पाळी | ६०० | ६०० | ६०० | ० |
| नांगरणी | १०५० | ७०० | ७०० | ० |
| वखरणी | ५०० | ६०० | ६०० | ० |
| फुली पाडणे | ० | ० | २०० | ० |
| पेरणी | १२०० | १२०० | ६०० | ० |
| रासनी | ६०० | ६०० | ० | ० |
| कोळपणी | ६०० | ६०० | ५०० | ० |
| निंदनी | १४०० | १४०० | ४५०० | ० |
| फवारणी | १६०० | १००० | ४००० | ० |
| कापणी | २२०० | ६०० | ४५०० | २७०० |
| मळणी | १६२० | ८०० | ० | ० |
| बियाणे | २५०० | ३००० | ७५० | ० |
| खत खर्च | २६०० | १२०० | ५००० | ० |
| घरापर्यंत वाहतूक | ० | १०० | ० | ० |
| वाहतूक | १८० | १३० | १५०० | ० |
| हमाली | १०० | १०० | ९०० | ० |
| कुंपण | ० | ० | ० | २०० |
| उत्पादन भाव | ९०० किलो | ५००किलो | ९०० किलो | १५०० पेंडी |
| रुपये प्रति किलो | २५ | ४७ | ५० | ८ (प्रती पेंढी) |
| आर्थिक कमाई | २२५०० | २३५०० | ४५०० | १२००० |
| खर्च (रू) | १६९५० | १२८३० | २५६५० | २९०० |
| निव्वळ नफा | ५५५० | १०६७० | १९३५० | ९१०० |

जलसंवाद REGISTERED PERIODICAL
Postal license no.PCW/108/2021-2023/2020 (Posting at Ganeshkhind SO on 10th of every month)
RNI No. MAHMAR/2012/41686.DECL No. SDM/HAVELI/SR/07/2018 ISBN No. 978-81-924949-0-6


# जलसंवाद परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा

आमच्या परिवाराचे सभासद:

**Jalasamvad व जलसंवाद मासिक:**

पाणी या विषयावर महाराष्ट्रात प्रकाशित होणारे एकमेव मासिक.
मराठी (प्रिंट व इंटरनेट) आणि इंग्रजी अश्या महिन्यात तीन आवृत्ती प्रकाशित
वर्ष १७ वे. वार्षिक वर्गणी: रुपये ५०० फक्त. वर्गणी www.payyoursubscription.com वर भरा

**जलोपासना दिवाळी अंक:**

पाणी या विषयावर सखोल चिंतन. दिवाळी अंक ७ वर्षांपासून प्रकाशित

Radio जलसंवाद

**जलसंवाद रेडियो:**

पाणी या विषयावर २४ तास चालणारा एकमेव रेडियो.
Jalasamvad Radio ॲप आपल्या मोबाइलवर डाऊनलोड करा आणि ऐका, विनामूल्य

YouTube

**यू ट्यूब वर जलसाक्षरता:**

पाणी या विषयावर १० मिनिटांची भाषणे. यू ट्यूबवर जाऊन Jalasamvad टाइप करा व
ऐका आणि इतरांनाही ऐकण्यासाठी प्रोत्साहित करा

**जलसंवाद वेब साइट:**

जलसंवाद मासिकाचे अंक, जलोपासनाचे अंक,
डॉ. दत्ता देशकर यांनी पाणी या विषयावर लिहिलेल्या पुस्तिका, आदी
www.jalsamvad.com

## जलसंवाद

पाणी प्रश्नावर मंथन घडवून आणण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करुन देणारे मासिक
संपादक: डॉ. दत्ता देशकर: 9325203109, dgdwater@gmail.com


प्रकाशक व मुद्रक: डॉ. दत्ता देशकर
फोन: 09325203109
jalasamvad@gmail.com
dgdwater@gmail.com
जलसंवाद प्रकाशन
अे-201, व्यंकटेश मीराबेल अपार्टमेंट्स, पॅनकार्ड क्लबजवळ,
बाणेर हिल्स, बाणेर, पुणे 411 045